रविवार
3
ऑगस्ट २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १५४
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग


केएल राहुल इंग्लंडमध्ये चमकला!
(पान ७ वर)

## पीएम किसान सन्मान निधी : २० वा हप्ता बँक खात्यात जमा!

**नवी दिल्ली, दि. २** वृत्तसंस्था

देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांसाठी शनिवारी (दि. २ ऑगस्ट) मोदी सरकारने खुशखबर दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसीतून एका क्लिकद्वारे पीएम किसान सन्मान निधीचा २० हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित केला. यावेळी शेतकऱ्यांना २ हजार रुपयांच्या हप्त्यासाठी काही दिवस प्रतीक्षा करावी लागली.

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांच्याहस्ते आज वाराणसीमध्ये सुमारे २,२०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन झाले. पीएम मोदी यांनी आज वाराणसी येथील कार्यक्रमातून योजनेचा २० वा हप्ता जारी केला. २०१९ मध्ये पीएम-किसान योजना सुरू झाल्यापासून, १९ हप्त्यांमध्ये ३.६९ लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात आले आहेत. २० व्या हप्त्यात, ९.७ कोटी शेतकऱ्यांच्या



### शेतकऱ्यांच्या प्रश्नांची अचूक उत्तरे

**■ २०२३ मध्ये पीएम किसान योजनेसाठी एआयं चॅटबॉट लाँच करण्यात आला. हा एआय चॅटबॉट शेतकऱ्यांना त्यांच्या प्रश्नांची त्वरित, स्पष्ट आणि अचूक उत्तरे देऊन मदत करतो.**

बँक खात्यात २० हजार ५०० कोटी रुपये डीबीटीद्वारे हस्तांतरित करण्यात आले. पीएम किसान योजना ही शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्याच्या उद्देशाने फ ब्रुवारी २०१९ मध्ये सुरू करण्यात आलेली मोदी सरकारची महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेअंतर्गत, दरवर्षी ६ हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य तीन समान हप्त्यांमध्ये थेट लाभार्थी हस्तांतरण पद्धतीने शेतकऱ्यांच्या आधारशी जोडलेल्या बँक खात्यात हस्तांतरित केले जाते. याआधी, पीएम मोदींनी २४ फ ब्रुवारी रोजी बिहारमधील भागलपूर येथून पीएम किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता जारी केला होता. यातून देशभरातील सुमारे ९.८ कोटी शेतकऱ्यांना २२ हजार कोटी हस्तांतरित करण्यात आले आहेत. दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या सुमारे ८५ टक्के भारतीय शेतकऱ्यांसाठी पीएम किसान योजना ही मोठी आधार ठरली आहे. पेरणी अथवा कापणीच्या वेळी, रोख रकमेची गरज भासते. अशावेळी हे पैसे उपयोगी पडतात.

## बलात्कार आणि अश्लील व्हिडिओप्रकरणी दोषी
# माजी खासदार प्रज्ज्वल रेवण्णाला जन्मठेप!

**बंगळुरू, दि. २** वृत्तसंस्था

कर्नाटकच्या बंगळुरू येथील जनता दल सेक्युलर पक्षाचे माजी खासदार आणि पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू प्रज्ज्वल रेवण्णा यांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा आणि १० लाख रुपयांचा दंड सुनावला आहे. बलात्कार आणि अश्लील व्हिडीओ काढल्याप्रकरणी न्यायालयाने शुक्रवारी त्याला दोषी ठरवले होते. दरम्यान, हा निर्णय जनता दल सेक्युलर पक्षाला (जेडीयू) हा मोठा झटका मानला जात आहे.

कर्नाटकमधील हसन जिल्ह्यातील होलेनारसीपुरा येथील गन्निकाडा फार्महाऊसमध्ये घरकाम करणाऱ्या ४८ वर्षीय महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी प्रज्ज्वल रेवण्णाला दोषी ठरविण्यात आले होते. २०२१ मध्ये पीडितेवर दोनदा बलात्कार झाल्याचा आरोप असून, प्रज्ज्वल रेवण्णाने हे कृत्य चित्रित केले होते. सरकारी वकिलांनी



रेवण्णा हा निर्ढावलेला आरोपी असून त्याने बलात्कारासारखे अत्यंत घृणास्पद आणि निंदनीय कृत्य वारंवार केल्याचे म्हणत त्याला जन्मठेपेची शिक्षा द्यावी, अशी मागणी केली.

रेवण्णा याला कठोर शिक्षा झाली तर असा गुन्हा करण्यापूर्वी कोणीही दहावेळा विचार करेल आणि समाजात योग्य तो संदेश जाईल, असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. पीडित महिलेच्या बाजूने युक्तिवाद करताना विशेष सरकारी वकील बी. एन. जगदीश यांनी सांगितले की, गरीब आणि अशिक्षित असलेली ही महिला घरकाम करून दरमहा १०,००० रुपये कमवते. तिच्यावर वारंवार बलात्कार करण्यात आला, तिला ब्लॅकमेल करण्यात आले आणि तिला घर सोडून पळून जाण्यास भाग पाडले. गुन्हेगार हा प्रभावशाली व्यक्ती असून त्याने तिला सहजपणे लक्ष्य केले. आपला अश्लील व्हिडिओ पाहिल्यानंतर तिने आत्महत्येचा विचारही केला होता, असे सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले.

### प्रज्ज्वल रेवण्णा हा निर्ढावलेला गुन्हेगार

**■ प्रज्ज्वल हा खासदार म्हणून निवडून आला, त्याला कायद्याची पूर्णपणे जाण आहे. मात्र असे असतानाही आरोपीने लैंगिक अत्याचाराचे व्हिडीओ रेकॉर्ड करणे ही त्याची मानसिकता काय आहे हे दर्शवण्यासाठी पुरेसे आहे. प्रज्ज्वल रेवण्णा हा निर्ढावलेला गुन्हेगार असून त्याने असली कृत्ये वारंवार केली आहेत. यातल्या एकहा कृत्याबद्दल त्याला पश्चाताप झालेला नाही, हे न्यायालयाने लक्षात घेणे गरजेचे आहे, असा युक्तीवाद सरकारी वकिलांनी केला.**

## भारताचा नारा संपूर्ण स्वदेशी!



### वाराणसीतून मोदींनी ट्रम्प यांना दाखविला आरसा

**वाराणसी, दि. २** वृत्तसंस्था

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतून आयातीसाठी २५ टक्के कर लावण्याची भाषा केली आहे. आता आम्ही त्या वस्तू खरेदी करू, ज्यामुळे काही भारतीयांचा घाम गाळला गेला आहे. जगाची अर्थव्यव्यवस्था अस्थिर बनली आहे. पण आमचे शेतकरी, आमचे लघु उद्योग, आपल्या तरुणांचे रोजगार, त्यांचे हित आपल्या अव्वल आहेत. आम्ही या सर्व वर्गाला केवळ स्वदेशी वस्तू विकण्याचे आवाहन केले आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.

आपला मतदारसंघ असलेल्या वाराणसीमध्ये विराट जनसमुदायाला संबोधित करताना मोदी बोलत होते. पंतप्रधान मोदी म्हणाले की, जेव्हा आपण आज आर्थिक प्रगतीबद्दल बोलत असतो तेव्हा मला जागतिक परिस्थितीकडे आपले लक्ष वेधून घ्यायचे आहे. आज जगाची अर्थव्यवस्था स्थिर नाही. अशा परिस्थितीत, (पान २ वर)

### महत्त्वाचे

### शरद पवारांचा मुख्यमंत्र्यांना फोन



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाचे अध्यक्ष आणि राज्यसभा खासदार शरद पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन केला. शरद पवार आणि मुख्यमंत्री यांच्या एका मुद्यावर सविस्तर चर्चा झाली असे वृत्त वृत्तवाहिन्यांनी दिले आहे. यवतमध्ये झालेल्या हिंसेबाबत शरद पवारांनी मुख्यमंत्र्यांनी फोनवर चर्चा केल्याचे वृत्त वृत्तवाहिन्यांनी दिले. शरद पवारांनी यवत मधील परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर मुख्यमंत्र्यांशी फोनवर सविस्तर चर्चा केली. या चर्चेचे तपशील अद्याप समजलेले नाहीत. विशेष म्हणजे पवारांनी फोन करण्याच्या आधीच शरद पवार आणि रोहिणी खडसे यांचीही सविस्तर चर्चा झाली होती. पुण्यातील खराडी परिसरातल्या रेव्ह पार्टीवर पोलिसांनी धाड टाकली. घटनास्थळावरुन अमली पदार्थ जप्त केले. या प्रकरणात शरद पवार समर्थक रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर याला अटक झाली. कोर्टाने प्रांजलची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. यानंतर रोहिणी खडसे यांनी शरद पवारांची भेट घेतली होती. रोहिणी खडसे आणि शरद पवार भेटीनंतर शरद पवारांनी मुख्यमंत्र्याशी फोनवर चर्चा केली.

### प्रज्ञा ठाकूर यांचा मोठा खुलासा



**नवी दिल्ली :** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातून निर्दो ष सुटल्यानंतर भाजपच्या माजी खासदार प्रज्ञा ठाकूर यांनी तपास अधिकाऱ्यांवर मोठा आरोप केला आहे. त्यांनी असा दावा केला आहे की या प्रकरणाचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आरएसएस प्रमुख मोहन भागवत आणि इतरांची नावे घेण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता. एनआयएच्या विशेष न्यायालयाने गुरुवारी (३१ जुलै २०२५) प्रज्ञा सिंह ठाकूर आणि लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सर्व सात आरोपींना निर्दोष मुक्त केले. न्यायालयाने म्हटले आहे की त्यांना (आरोपींना) दोषी सिद्ध करण्यासाठी पुरेसे पुरावे नाहीत. या प्रकरणात एकूण १४ जणांना अटक करण्यात आली होती.

## मद्यप्रेमींना रिकाम्या दारूच्या बाटलीवर मिळणार 'कॅशबॅक'!

**नवी दिल्ली, दि. २** वृत्तसंस्था

मद्यसेवन आरोग्यास हानिकारक असतं असं प्रत्येक मद्याच्या बाटलीवर लिहिण्यात येऊनही मद्यप्रेमी नेमके याच ओळीला बगल देतात. एकिकडे या मंडळीची चांदी असतानाच दुसरीकडे त्यांच्यामुळं मद्यविक्रेत्यांचीही चांदी होते. आता मात्र मद्य खरेदी करणाऱ्यांना बाटलीतील पेय संपल्यानंतर थोडाथोडका का असेना फायदा मिळणार आहे.

उत्पादन शुल्क विभागाने प्लास्टिकपासून होणाऱ्या कचऱ्यामुळे पर्यावरण वाचवण्यासाठी २ निर्णय घेतले आहेत. पहिल्या निर्णयात केरळ स्टेट बेव्हरेजेस कॉर्पोरेशन (बेव्हको) च्या आउटलेटमध्ये विकली जाणारी प्रीमियम दारू आता प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये उपलब्ध होणार नाही. राज्यात ८०० रुपयांहून अधिक दारूची बाटली काचेच्या बाटलीत विक्री केली जाईल. त्याशिवाय दुसऱ्या



निर्णयात दारू खरेदी करणाऱ्या ग्राहकांकडून २० रूपये अतिरिक्त घेतले जातील. ही रक्कम बाटली परत केल्यानंतर ग्राहकाला परत मिळतील. प्रत्येक बाटलीवर क्यूआर कोड लावला जाईल, ज्यामुळे रिफंड प्रक्रिया ट्रॅक करण्यास मदत होईल. परंतु रिफंड केवळ तिथूनच मिळेल जिथून बाटली खरेदी केली असेल असं सरकारने स्पष्ट केले आहे. सध्याच्या घडीला तिरुवअनंतपूरम आणि कन्नूर इथं या योजनेची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी केली जात असून, सरकारच्या दारुविक्री आणि पॅकेजिंगशी संबंधित उपक्रमाची सुरुवात सप्टेंबर २०२५ पासून सुरू होणार आहे. (पान २ वर)

## यवत हिंसाचार प्रकरणात १७ जणांना केली अटक

**पुणे, दि. २** वृत्तसंस्था

समाजमाध्यमात आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी शुक्रवारी पुणे-सोलापूर महामार्गावरील यवत गावात तणाव निर्माण झाला होता. दोन गटाकडून दगडफेक करण्यात आली. या प्रकरणी पाच वेगवेगळे गुन्हे दाखल करुन १७ जणांना अटक करण्यात आली आहे. तोडफोड प्रकरणात आरोपींची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. यवतमध्ये शांतता असून, मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

पुणे-सोलापूर महामार्गावरील यवत गावात समाजमाध्यमात आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्यानंतर शुक्रवारी तणाव



निर्माण झाला. शुक्रवारी सकाळी अकराच्या सुमारास दोन गट समोरासमोर आले. दोन्ही गटांकडून दगडफेक करण्यात आली. जमावाने वाहनांची तोडफोड केली, तसेच घरांवर दगडफेक करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. शुक्रवारी सायंकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गावास भेट दिली. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, तसेच शांतता पाळावी, (पान २ वर)

## राजकारणापासून शाळांना दूर ठेवण्याचे निर्देश!

**अमरावती, दि. २** वृत्तसंस्था

आंध्र प्रदेश सरकारने शाळा परिसरा संदर्भात एक मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे शाळा परिसरात राजकीय पक्ष किंवा संघटनांशी संबंधित झेंडे, बॅनर किंवा पोस्टर यासह कोणतेही राजकीय चिन्ह किंवा साहित्य प्रदर्शित करण्यास मनाई असणार आहे, याबाबतचे आदेश जारी करण्यात आल्याची माहिती राज्याचे शालेय शिक्षण संचालक विजय राम राजू यांनी दिली आहे.

याशिवाय, कोणतीही अनोळखी व्यक्ती परवानगीशिवाय



शाळा परिसरात प्रवेश करू शकणार नाही. राज्यातील सर्व प्रादेशिक सहसंचालक आणि जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना पालक किंवा शाळा व्यवस्थापन समिती (एसएमसी) सदस्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्ती किंवा समुहाला कोणत्याही परिस्थितीत शाळेच्या आवारात प्रवेश दिला जाणार नाही, असे निर्देश दिले आहेत. जर एखाद्या व्यक्तीला काही योगदान अथवा साहित्य वाटप करायचे असेल तर त्यांना मुलांशी न बोलता, वर्गात प्रवेश न करता थेट शाळेच्या प्राध्यापकांकडे जमा करावे लागेल. त्याशिवाय कुठल्याही अज्ञात व्यक्तीला मुलांसोबत फोटोही घेता येणार नाही असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे. कोणत्याही तक्रारी किंवा विनंती केवळ प्रशासकीय कार्यालयातच सादर केला जाईला. कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी कोणत्याही तक्रारींशी (पान २ वर)

### रामदास सोरेन यांची प्रकृती गंभीर

**जमशेदपूर :** झारखंडचे शिक्षणमंत्री रामदास सोरेन यांची प्रकृती अचानक बिघडली आहे. शनिवारी बाथरूममध्ये घसरून पडल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. सध्या रामदास सोरेन यांना जमशेदपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. इरफान अन्सारी ही माहिती दिली. अन्सारी यांनी सांगितले की, मंत्री रामदास सोरेन यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवले जात आहे आणि डॉक्टरांची टीम त्यांना चांगल्या उपचारांसाठी दिल्लीला विमानाने नेण्याची तयारी करत आहे.

**मोहिम सुरू** | **लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा पुढाकार**

# महाराष्ट्रात ४.१७ कोटींची बेनामी मालमत्ता उघड!

**मुंबई, दि. १** वृत्तसंस्था

महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने यावर्षी भ्रष्ट लोकसेवक आणि खाजगी व्यक्तींविरुद्ध चार बेहिशेबी मालमत्ता प्रकरणे दाखल केली आहेत, ज्यात एकूण ४.१७ कोटी रुपयांची मालमत्ता गुंतलेली आहे. एसीबीच्या आकडेवारीनुसार, दोन वर्ग-१ अधिकारी, एक वर्ग-२ आणि एक वर्ग-३ अधिकारी या प्रकरणांमध्ये सामील आहेत.

या बेहिशेबी मालमत्ता प्रकरणांपैकी बहुतेक, म्हणजेच तीन, पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध दाखल करण्यात आली आहेत, तर एक प्रकरण महानगरपालिका



अधिकाऱ्याविरुद्ध आहे. एकूण ४.१७ कोटी रुपयांपैकी, ३.८२ कोटी रुपये पोलीस अधिकाऱ्यांशी संबंधित आहेत, तर ३५.१६ लाख रुपये महानगरपालिका अधिकाऱ्याशी संबंधित आहेत.

लाचखोरीच्या प्रकरणांबद्दल बोलायचे झाल्यास, महाराष्ट्र एसीबीने जानेवारी ते २९ जुलै दरम्यान ४१८ प्रकरणे दाखल केली आहेत. आकडेवारीनुसार, महसूल आणि भूमी अभिलेख विभागाच्या (११७) अधिकाऱ्यांविरुद्ध सर्वाधिक लाचखोरीचे खटले दाखल झाले आहेत, त्याखालोखाल पोलीस (६६) आणि पंचायत समिती (४२) यांचा क्रमांक लागतो. सविस्तर विश्लेषण असे दर्शवते की, लाचखोरीच्या प्रकरणात पकडलेले बहुतेक अधिकारी वर्ग-३ सरकारी कर्मचारी (२९२) आहेत, तर वर्ग-२ (७५), वर्ग-१ (४८) आणि वर्ग-४ (२२) अधिकारीही सामील आहेत. या भ्रष्टाचार प्रकरणांमध्ये गुंतलेली एकूण रक्कम १.५० कोटी रुपये आहे. मुंबई विभागात अशी सर्वाधिक प्रकरणे (४) आहेत, त्यानंतर पुणे (२) आणि नाशिक, छत्रपती संभाजी नगर आणि नांदेड विभागातून प्रत्येकी एक प्रकरण आहे, जिथे एसीबी मालमत्ता गोठवण्याची मागणी करत आहे.

### माहिती राज्य सरकारकडे पाठवली

**■ महाराष्ट्र एसीबीने नऊ भ्रष्टाचार-संबंधित प्रकरणांची माहिती राज्य सरकारकडे पाठवली आहे, ज्यात आरोपींच्या १६.८८ कोटी रुपयांच्या मालमत्ता गोठवण्याची परवानगी मागितली आहे. सर्वाधिक मालमत्ता शहरी विकास विभाग (३.१३ कोटी रुपये), जलसंपदा विभाग (२.८२ कोटी रुपये) आणि सार्वजनिक बांधकाम विभाग (२.४८ कोटी रुपये) यांच्याशी संबंधित अधिकाऱ्यांशी जोडलेली आहे.**



## पान 1 वरून...

### भारताचा नारा संपूर्ण स्वदेशी...

जगातील देश आपापल्या हितावर लक्ष केंद्रित करीत आहेत. आता भारतही जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनणार आहे. म्हणूनच भारतानेसुद्धा आपल्या आर्थिक हितसंबंधांबद्दल जागरुक असले पाहिजे. आमचे शेतकरी, आमचे छोटे मूळ, आमच्या तरुणांचे रोजगार, त्यांचे हित आमच्यासाठी सर्वोपरि आहेत. सरकार या दिशेने सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. परंतु देशातील नागरिक म्हणून आमच्याकडेही काही जबाबदाऱ्या आहेत.

### मद्यप्रेमींना रिकाम्या दारूच्या...

पर्यावरणात होणारा प्लास्टीक कचरा कमी करण्याचा उद्देश केंद्रस्थानी ठेवल्याचं राज्य शासनाकडून सांगण्यात आलं आहे. नव्या योजनेसह केरळ सरकारनं केलेल्या घोषणेनुसार ८०० रुपयांहून कमी किमतीचं मद्य प्लास्टीकच्या बाटल्यांमध्ये विकलं जाईल. तर बेवकोच्या दुकानांवर विक्री केल्या जाणाऱ्या महागड्या मद्याच्या किमती ८०० रुपयांहून अधिक राहणार असून, त्यांची विक्री मात्र काचेच्या बाटलीमध्ये केली जाणार आहे.

### राजकारणापासून शाळांना दूर...

संबंधित बाबींमध्ये थेट बाहेरील व्यक्ती किंवा संघटनांशी संपर्क साधण्याऐवजी प्रशासकीय कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आदेशात सांगण्यात आले आहे. राज्यातील सर्व प्रादेशिक संयुक्त संचालक शालेय शिक्षण आणि जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व संस्थांच्या प्रमुखांना आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांना या मार्गदर्शक तत्त्वांचे कठोरपणे पालन करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून येत्या काळात कोणत्याही समस्येला सामोरे जावे लागू नये. दरम्यान, आंध्र प्रदेश सरकारने घेतलेल्या या निर्णयाचे अनेकांकडून कौतुक केले जात आहे.

अनोळखी व्यक्तींना प्रवेश बंद

पालक किंवा शाळा व्यवस्थापन समिती (एसएमसी) सदस्यांव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्ती किंवा गटाला कोणत्याही परिस्थितीत शाळा परिसरात प्रवेशाची परवानगी दिली जाणार नाही. संचालकांनी सांगितले की, त्यांना माहिती मिळाली आहे की, अनोळखी व्यक्ती आणि गट शाळेच्या मुख्याध्यापकांची परवानगी न घेता शाळा परिसरात प्रवेश करत आहेत. त्या पार्श्वभूमीवर पालक आणि एसएमसी सदस्यांव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांना किंवा शाळांना भेटवस्तू किंवा दान देण्यासाठीही अनोळखी व्यक्तींना प्रवेशाची परवानगी नाही, कारण असे केल्याने सुरू असलेल्या शैक्षणिक कार्यात व्यत्यय निर्माण होतो.

### यवत हिंसाचार प्रकरणात...

असे आवाहन करण्यात आले आहे. कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे, गणेश बिरादार, उपविभागीय अधिकारी बापूराव दडस यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. समाजमाध्यमात आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्यानंतर यवत गावात तणाव निर्माण झाला. आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्या तरुणाला पोलिसंनी शुक्रवारी ताब्यात घेऊन त्याला अटक केली. तरुणाला शनिवारी दौंड येथील न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपी तरुणाला पाच ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

यवत गावात जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. गावात शांतता प्रस्थापित झाली आहे. ग्रामस्थांशी संवाद साधण्यात आला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, तसेच कायदा-सुव्यवस्थेला बाधा आणू नये.

- संदीपसिंग गिल (पोलीस अधीक्षक)

## ...तर हिमाचल प्रदेश नकाशावरून नाहीसा होईल



### सुप्रीम कोर्टाने सरकारला फटकारले

नवी दिल्ली : हिमाचल प्रदेशातील वाढत्या पर्यावरणीय संकटाबाबत चिंता व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाने गंभीर इशारा दिला आहे. न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने २८ जुलै रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान सांगितले की, जर तातडीने योग्य कारवाई केली नाही, तर हिमाचल प्रदेश हा संपूर्णपणे भारताच्या नकाशावरून नाहीसा होण्याचा धोका आहे.

या प्रकरणात, जून २०२५ मध्ये हिमाचल सरकारने काही भागांना ग्रीन झोन म्हणून जाहीर केल्यानंतर त्यास विरोध करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. परंतु कोर्टाने ही अधिसूचना पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक असल्याचे मान्य केले. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, हवामान बदलाचे हिमाचल प्रदेशावर ''दृश्यमान आणि गंभीर परिणाम'' झाले आहेत. जर सध्याच्या प्रमाणेच कारभार चालू राहिला, तर हिमाचल प्रदेश देशाच्या नकाशावरून नाहीसा होईल. देव करो तसे होऊ नये, असे तिखट शब्दांत न्यायालयाने सरकारला फटकारले. न्यायालयाने स्पष्ट केले की, अशा प्रकल्पांना मंजुरी देताना भूगर्भशास्त्रज्ञ, पर्यावरणतज्ज्ञ आणि स्थानिक नागरिकांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे. हिमाचलची ६६% भूमी ही जंगलांनी व्यापलेली आहे, पण मानवी हव्यास आणि दुर्लक्षामुळे ती नैसर्गिक श्रीमंती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे, असेही कोर्टाने नमूद केले. हिमाचलसारख्या पर्यावरणसंवेदनशील राज्यासाठी पर्यटन अत्यंत महत्त्वाचे आहे, पण त्याचवेळी पर्यावरणस्नेही पर्यटन धोरणही आवश्यक असल्याचे कोर्टाने नमूद केले. अनियंत्रित पर्यटनामुळे पर्यावरणीय आणि सामाजिक समतोल बिघडू शकतो, असे न्यायालयाचे स्पष्ट मत आहे.

विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास

कोर्टाने राज्य सरकार आणि केंद्र सरकार दोघांनाही स्पष्टपणे सांगितले की, फक्त महसूल मिळवण्याच्या नादात पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये. न्यायालयाने दाखवून दिले की सततच्या भूस्खलन, रस्ते कोसळणे, इमारतींचे पडणे हे निसर्गाचे नव्हे तर माणसाच्या चुकीच्या धोरणांचे परिणाम आहेत. जलविद्युत प्रकल्प, रस्ते विस्तार, जंगलतोड, आणि अनियंत्रित बांधकाम यांमुळे पारंपरिक हिमालयीन परिसंस्था धोक्यात आली आहे.

## अण्णा भाऊ साठे मिरवणुकीतील घटना | दोन आरोपी अटक

# पोलीस कर्मचाऱ्यावर प्राणघातक हल्ला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



वाशिम :दि. २ : गुन्हेगारी वृत्तीची पार्श्वभूमी असलेल्या एका गाव गुंडाला सण उत्सवाच्या दरम्यान शहरांमध्ये वावरण्यासाठी बंदी घालण्यात आलेली होती. बंदी घालण्यात आलेल्या या गाव गुंडाला पोलिसांनी अण्णाभाऊ साठे जयंतीच्या मिरवणुकीमध्ये पकडले असता त्याने पोलिसावरच धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात पोलीस कर्मचारी राजेश ताराचंद राठोड गंभीर जखमी झाले.. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे तर इतर दहा साथीदार पसार झाले आहेत. ही घटना १ ऑगस्ट रोजी घडली .

दि.१ ऑगस्ट रोजी वाशीम शहरात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान ही मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी वाशिम शहर हद्दीमधील रेकॉर्डवरील गुन्हेगारांना ३१ जुलै ते २ ऑगस्ट पर्यंत वास्तव्यास प्रवेश बंदी आदेश पारित करण्यात आले होते.मात्र तरी रिकॉर्डवरील गुन्हेगार मुकेश उर्फ बबलू राजू गायकवाड हा दिघेवाडी चौकात अण्णा भाऊ साठे मिरवणुकीत नाचतांना दिसून आला.त्यामुळे त्याला पकडण्यासाठी गेलेल्या डीबी पथकासोबत बबलू गायकवाड याचा भाऊ विक्की हा वाद विवाद करू लागला.

दरम्यान त्या ठिकाणाहुन बबलू गायकवाड हा पडून जात असल्याने त्याला पकडण्यासाठी पोलीस कर्मचारी राजेश राठोड त्याच्या दिशेने जात होते.त्याचवेळी कर्मचारी राजेश राठोडला कोणी तरी पाठीवर चाकू मारून गंभीर जखमी केले.मागे पाहीले असता,तेथे विक्की गायवाड याच्यासह ७ ते ८ जण दिसून आले.तसेच ''तुम्ही आमच्या बबलूला कसे काय पकडता हे आम्ही पाहून घेतो'' असे म्हणून राजेश राठोड आणि त्यांच्या पथकातील सहकाऱ्यांना धक्काबुक्की केली.तेव्हा मुकेश उर्फ बबलू गायकवाड सोबत त्याचा भाऊ विक्की गायकवाड,ऋषिकेष कांबळे,रोहीत तुपसौंदर व त्याच्या सोबत ७ ते ८ मुले त्या ठिकाणी आले होते.तेव्हा बबलू गायकवाड म्हणत होता तू मला पकडण्यासाठी आला ना थांब तुला जिवानेच मारून टाकतो असे म्हणून बबलू गायकवाडने एका मुलाच्या हातातील चाकू घेत जिवाने मारण्याच्या उद्देशाने कर्मचारी राजेश राठोडवर वार केला.

तो वार त्यांनी चुकवला असता,ते खाली पडले आणि तो वार त्यांच्या उजव्या पायाच्या मांडीवर लागला.दरम्यान त्या ठिकाणी आरडा ओरड झाल्याने मारहाण करण्यासाठी जमा झालेल्या मुलांपैकी मुकेश उर्फ बबलू गायवाड आणि त्याचा भाऊ विक्की गायकवाड याला पोलिसांनी पकडले.तसेच त्याच्या सोबत असलेले ऋषिकेश कांबळे, रोहित तुपसौंदर आणि इतर ७ ते ८ मुले पडून गेले. दरम्यान जखमी पोलीस राजेश राठोडला उपचारासाठी एका खाजगी दवाखान्यात भरती करण्यात आले आहे.

याप्रकरणी पोलीस कर्मचारी राजेश ताराचंद राठोड यांच्या फिर्यादीवरून सर्व आरोपी विरुद्ध कलम १०९,१३२,१८९(२)१९१(२)१९१(३)१९०,४९ भारतीय न्याय संहिता अन्वये वाशीम शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउनि. सुनिल गिरी हे करत आहे.

## मध्य प्रदेशहून निघून आलेली महिला २४ तासात परतली कुटुंबाकडे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**सखी वन स्टॉप सेंटरचे कौतुक!**




अकोला :दि. २ : कधी कधी अतूट प्रेमामुळेच काही क्षणिक गैरसमज निर्माण होतात. मध्य प्रदेश येथून कौटुंबिक वादामुळे निघून गेलेली ४० वर्षीय महिला अकोला रेल्वेस्थानकावर आढळल्यानंतर अवघ्या २४ तासांत तिचे कुटुंबाशी पुन्हा नाते जुळवून देण्याचे मोलाचे काम सखी वन स्टॉप सेंटर अकोला आणि रेल्वे पोलिसांनी केले आहे.

रेल्वे स्थानकाच्या बुकिंग काउंटरजवळ ही महिला गोंधळलेल्या अवस्थेत आढळून आली. पोलिसांनी तत्काळ माहिती सखी वन स्टॉप सेंटरच्या केंद्र प्रशासकांना दिली. त्यानंतर महिलेला सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. येथे तिला तात्पुरता निवारा, वैद्यकीय तपासणी, भोजन व समुपदेशनाची सुविधा देण्यात आली.

महिलेच्या बोलण्यातून मिळालेल्या क्षीण माहितीच्या आधारावर तिच्या पतीपर्यंत संपर्क साधण्यात आला. विशेष म्हणजे, पती आणि सासरे स्वतः तिला घेण्यासाठी अकोल्यात दाखल झाले. दोघांच्या भेटीच्या क्षणी दोघेही एकमेकांच्या गळ्यात पडून अश्रू अनावर झाले.

प्रेमाचे हे अनोखे नाते पाहणाऱ्यांचे डोळेही पाणावले. काही क्षणांचं गैरसमजामुळे आलेलं अंतर सखी वन स्टॉप सेंटरच्या प्रयत्नाने मिटलं. संपूर्ण कागदपत्रांची पडताळणी करून, महिलेच्या संमतीने तिला पतीच्या स्वाधीन करण्यात आले. या यशस्वी उपक्रमामुळे महिला व बालविकास विभागाच्या कार्यपद्धतीचे कौतुक होत आहे.

## तिळाच्या भावात झपाट्याने वाढ

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला :दि. २ : अकोल्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीत शुक्रवारी (दि. १ ऑगस्ट) आलेल्या बाजार भावानुसार काही शेतमालाच्या दरात चढ-उतार पाहायला मिळाला. विशेषतः तिळाचे दर ७४०० ते ८३०० रुपये दरम्यान राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाची भावना आहे.

गहू २२०० ते २५७० रुपये दरम्यान विकला गेला, तर ज्वारीचे दर १८०० ते २३२५ रुपये होते. मुग व उडीदच्या दरात फारसा बदल दिसून आला नाही. मुग ६९१० ते ७२५५ रुपयांपर्यंत विकला गेला तर उडीदचा दर मात्र ६४१० रुपयांवर स्थिर राहिला. चण्याच्या दरातही वाढ दिसून आली असून तो ५४०० ते ६२९५ रुपयांपर्यंत गेला.

तुरीचा दर ६१०० ते ६७६० रुपयांपर्यंत पोहोचला. तर सोयाबीनचा दर ३६०० ते ४६७० रुपयांपर्यंत जाऊन शेतकऱ्यांमध्ये आशावाद निर्माण झाला आहे.

## मुलीला अश्लील बोलून दिला मानसिक त्रास; गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



अकोला :दि. २ : इंटरनेट एशिया कंपनीच्या अकोला येथील शाखेत प्रशिक्षणार्थी म्हणून काम करणाऱ्या एका १९ वर्षीय युवतीला अश्लील, लज्जास्पद बोलून अपमानित केल्याप्रकरणी प्रसन्न वानखडे, राहुल गंजिर आणि इतर दोघांविरोधात खदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी गु.र.नं. ६३०/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ७९, ३५१(२), ३५१(४) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

घटना २६ जुलै २०२५ रोजी सकाळी ११.३० वा च्या सुमारास न्यू खेतान नगर, कौलखेड येथील इंटरनेट एशिया कंपनीच्या ब्रँचमध्ये घडली. फिर्यादी युवती वाशिम जिल्ह्यातील असून, ती कंपनीमध्ये नवीन प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत होती. त्याचवेळी आरोपी प्रसन्न वानखडे आणि राहुल गंजिर यांनी ''पैसे कमवायचे तर वेगवेगळे मार्ग आहेत, इथे बऱ्याच मुली काहीही करतात'', तसेच ''कुछ पाने के लिए कुछ खोना पड़ता है'' असे लज्जास्पद आणि अपमानास्पद वक्तव्य केले. याच दरम्यान, पीडितेच्या आईलाही आरोपींनी फोन करून अश्लील शिवीगाळ करत धमकीचे मॅसेजेस पाठवले, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकारामुळे पीडितेला मानसिक धक्का बसला असून तिने ३१ जुलै रोजी रात्री ८.४० वा. पोलिसात तक्रार दाखल केली.खदान पोलिसांनी तिन्ही आरोपींविरोधात गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. कार्यस्थळी महिलांवरील अशा वर्तणुकीला लगाम घालण्यासाठी पोलिसांकडून कारवाईचे प्रयत्न सुरू आहेत.

## डाटा च्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



अकोला :दि. २ :डॉ. बाबासाहेब आंबेडकर टीचर्स असोसिएशन (डाटा)अमरावती विभाग आणि जिल्हा शाखा अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने काल दि ३१ जुलै २०२५ रोजीमा. जिल्हाधिकारी यांना संविधान विरोधी लोकांनी ''संविधान का बदलावे'' या पुस्तकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या पुस्तकाच्या लेखकाने आणि त्याच्या प्रकाशक व प्रकाशन समारंभ आयोजित करणाऱ्या लोकांनी संविधानाचा अवमान करून देशद्रोही कृत्य केले आहे.करिता आपण सदर पुस्तकाच्या लेखकावर, प्रकाशकावर आणि प्रकाशन समारंभ आयोजित करणाऱ्या लोकांवर कडक कायदेशीर कारवाई करावी यासंदर्भात निवेदन दिले आहे. भारतात संविधानावर अशाप्रकारचे हल्ले सध्या नेहमीचं होत आहे. लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी आज सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे असे प्रतिपादन यावेळी डाटा संघटनेचे विभागीय सचिव डॉ एम आर इंगळे यांनी केले.याप्रसंगी डाटा संघटनेचे जिल्हाध्यक्षडॉ प्रसेन्नजीत गवई, मार्गदर्शक डॉ. संदिप भोवते, प्रा एस आर दामोदर, कोषाध्यक्षडॉ अशोक इंगळे, उपाध्यक्ष प्रा. राहुल माहुरे, कार्यकारी सदस्य प्रा. अनिल निंबाळकर, प्रा. हरिचंद नरेटी, डॉ प्रिती इंगळे, डॉ कैलास वानखडे, डॉ भास्कर धारणे, डॉ ज्ञानशील खंडेराव, डॉ अविनाश पवार, प्रा प्रभू भारसाकळे, प्रा दिलीप कुमरे, प्रा आकाश हराळ, नागसेन अंभोरे उपस्थित होते.

## पिंप्री खुर्द येथील केळी पोहोचली इराणमध्ये

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



अकोट:दि. २ : तालुक्यातील पिंप्री खुर्द येथील कास्तकार सोपान रावणकार यांना केळी उत्पादक संघ महाराष्ट्र राज्याच्यावतीने सन २०२४-२५ च्या राज्यस्तरीय केळीरत्न कार्य गौरव पुरस्काराने सोलापूर माढा येथे सन्मानित करण्यात आला.सोपान रावणकार त्यांच्या शेतातील केळी परदेशात इराण येथे निर्यात करण्यात आली.त्यावेळी स्वप्निल रावणकार यांच्या शेतात कृषी विभागाचे अधिकारी व गावातील केळी उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

उपविभागीय कृषी अधिकारी तुषार ढगारे यांनी यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आपल्या गावातील केळी परदेशात निर्यात होणे ही आपल्या सर्व शेतकऱ्यांसाठी अभिमानाची बाब असून इतर आणखी शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या देशात जण्या साठी आणखी प्रयत्न करन्यास शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा केळी उत्पादक शेतकऱ्यांना सुद्धा सुधारित लागवड तंत्रज्ञानाचा अवलंब करून निर्यातक्षम केळी उत्पादन करण्यामध्ये पुढाकार घ्यावा. त्यासाठी कृषी विभागाकडून मार्गदर्शन केले जाईल असे पण त्यांनी सांगितले तसेच तालुका कृषी अधिकारी आश्विनी बिराजदार यांनी देखील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले की आपल्या शेती मालाला बाजारपेठ उंच प्रतीचा दर्जा मिळावा आज आपल्या तालुक्यातील एका शेतकऱ्याचा माल गेला आणखी काही शेतकऱ्यांनी वे वेगळ्या देशात माल जाण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन यांनी केले या कार्यक्रमाला सहाय्यक कृषी अधिकारी गजानन शिंगणे सहाय्यक कृषी अधिकारी संकेत पाटील संकेत पाचपोर गजानन रावणकर मोहन रावणकर केशव रावणकार पत्रकार शरद भेंडे प्रतीक चिकटे अजय शेंडे विनोद तेलगोटे अक्षय रावणकर रोशन मानकर व तसेच गावातील शेतकरी उपस्थित होते.

## मुख्याध्यापक संघाचे विलास भारसाकडे यांचे कार्य प्रेरणादायी -आ. लिंगाडे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला :दि. २ : विदर्भ मुख्याध्यापक संघाचे सचिव आणि राज्य पोषण समितीचे अध्यक्ष, तसेच आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास भारसाकडे यांचा सेवानिवृत्ती सोहळा शनिवारी उत्साहात पार पडला. त्यांच्या दीर्घकालीन सेवेला आमदार धीरज लिंगाडे यांनी 'प्रेरणादायी' असे संबोधून गौरव केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिक्षक आमदार किरण सरनाईक होते.

प्रमुख अतिथी म्हणून राज्य उपाध्यक्ष शत्रुघ्न बीडकर, विदर्भ अध्यक्ष सतीश जगताप, कार्याध्यक्ष बळीराम झामरे, अकोला जिल्हाध्यक्ष विलास खुमकर, शहर सचिव दीपक बिरकड, बुलढाणा जिल्हा संघाचे सचिव मधुकर पाटील, गटविकास अधिकारी भरत हिवाळे, विश्व मंदिर संस्थेचे उपाध्यक्ष राऊत यांची उपस्थिती होती.

प्रथम दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यानंतर पाहुण्यांनी पुष्पहार अर्पण करून स्वागत केले.

आमदार सरनाईक यांनी भाषणात सांगितले की, विलास भारसाकडे सरांचे कार्य विदर्भातील शिक्षकांसाठी दिशा दर्शक ठरले.

या वेळी विविध शैक्षणिक संस्थांनी आणि शिक्षक संघटनांनी त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास जिल्ह्यातील पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जनजागृती** | गुढधीतील शेतकऱ्यांना विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन

## फवारणी सुरक्षिततेसाठी कृषी महाविद्यालयाचा पुढाकार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



अकोला :दि. २ : कृषी महाविद्यालय, अकोला यांच्या ग्रामीण कार्यानुभव २०२५ अंतर्गत ग्राम गुढधी येथे विद्यार्थ्यांनी कीडनाशक फवारणी दरम्यान घ्यावयाच्या सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत प्रभावी जनजागृती उपक्रम राबवला.

दिनांक १ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना विषारी रसायनांपासून होणाऱ्या धोका टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या सेफ्टी किटच्या वापराबाबत प्रात्यक्षिकासह सविस्तर माहिती दिली. मास्क, हातमोजे, गॉगल्स, ॲप्रन यासारख्या सुरक्षा साधनांचा योग्य वापर कसा करावा, हे प्रत्यक्ष दाखवून देण्यात आले.

या उपक्रमास महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर, कीटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गिरीश जेऊघाले आणि डॉ. प्रेरणा चिकटे यांचे मार्गदर्शन लाभले.

शेतकऱ्यांमध्ये फवारणीच्या वेळी सुरक्षेची जाणीव वाढावी यासाठी विद्यार्थ्यांनी घेतलेला पुढाकार ग्रामस्थांमध्ये विशेष कौतुकास्पद ठरला. उपक्रमात पश्चिम विभाग व गुढधी विभागातील २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.या उपक्रमामुळे गुढधी गावात कृषी सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांचे हे सामाजिक भान आणि योगदान वाखाणण्याजोगे ठरले आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांचा आणखी एक दावा फोल | भारताचे धोरणात्मक पाऊल

# भारताची रशियाकडून तेल खरेदी सुरूच

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सातत्याने भारतावर टीका करत आहेत. अशात ट्रम्प यांनी नुकताच दावा केला होता की, भारत रशियाकडून तेल खरेदी थांबवणार असल्याचे त्यांच्या कानावर आले आहे. मात्र, एएनआय या वृत्तसंस्थेला सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भारतीय तेल कंपन्यांची रशियाकडून तेल खरेदी चालूच आहे. त्यांच्या पुरवठ्याचे निर्णय किंमत, कच्च्या तेलाचा दर्जा, इन्व्हेंटरीज, लॉजिस्टिक्स आणि इतर आर्थिक घटकांवर अवलंबून असतात, असे सूत्रांनी सांगितले आहे.



### काय म्हणाले होते डोनाल्ड ट्रम्प?

''भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही, असे मला कळाले आहे. हे खरे आहे की नाही हे मला माहित नाही, परंतु हे एक चांगले पाऊल आहे.'' वृत्तसंस्था एएनआयने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना डोनाल्ड ट्रम्प यांनी हा दावा केला होता. दरम्यान, रशियाकडून तेल खरेदी थांबवायची की नाही याबाबत केंद्र सरकारकडून अद्याप कोणतेही अधिकृत विधान आलेले नाही.

❑ रशियन पुरवठादारांकडून तेल खरेदी करण्याच्या भारताच्या निर्णयाचा संदर्भ देत सूत्रांनी सांगितले की, रशिया जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा कच्चे तेल उत्पादक देश आहे. त्यांचे उत्पादन जागतिक मागणीच्या जवळजवळ १०% आहे. ते दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे तेल निर्यातदारदेखील आहेत.

## महत्त्वाचे

### गाझामधील शांततेसाठी पॅलेस्टाइन देशनिर्मितीचा ठराव



**न्यूयॉर्क :** पश्चिम आशियात शांततेसाठी एक नवा प्रस्ताव पुढे आला असून, युद्धविरामासाठी अमेरिका आणि इस्रायलवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न याद्वारे करण्यात आला आहे. गाझा आणि पश्चिम किनारपट्टीवरून इस्रायलची माघारी, हमास संघटनेवर बंदी आणि एकत्रित पॅलेस्टाइन देशाची स्थापना असा हा नवा शांततेचा प्रस्ताव या आठवड्यात तयार करण्यात आला आहे. न्यूयॉर्कमध्ये २९ जुलै रोजी हा प्रस्ताव तयार करण्यात आला असून, यासाठी नियोजित उच्च स्तरावरील परिषदेला युरोपीय संघ, अरब लीग यांच्यासह १७ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आशियातील इंडोनेशिया, आफ्रिकेतून सेनेगल आणि अमेरिका खंडातून ब्राझील, कॅनडा आणि मेक्सिको या देशांचा समावेश होता.

### कबुतरांना खाद्य घातल्याप्रकरणी मुंबईत पहिला गुन्हा दाखल



**मुंबई :** माहीम परिसरातील दोन कबुतरांन्यांमध्ये कबुतरांना खाद्य घातल्याप्रकरणी मुंबईत पहिला गुन्हा दाखल झाला आहे. माहीम पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.
माहीम येथील एल. जे. मार्ग येथील डॉमिनोज पिझ्झा कबूतर खाना आणि हिंदूजा रुग्णालयाजवळील कबूतरखान्यात कबुतरांसाठी खाद्य टाकण्यात आल्याचा आरोप आहे. दुचाकीवर आलेल्या अज्ञात व्यक्तीने या कबुतरखान्यांमध्ये खाद्य टाकल्यामुळे उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचा आरोप आहे. सदर दुचाकीस्वाराविरोधात महानगरपालिकेने तक्रार केली.

### 'सल्तनत-ए-बांग्ला' समूहावरून वादंग



**नवी दिल्ली :** 'सल्तनत-ए-बांग्ला' समुहाकडून तयार करण्यात आलेल्या 'ग्रेटर बांगलादेश' नकाशात भारताच्या काही हिस्स्यांना सामील करण्यात आले होते. हा नकाशा ढाका विद्यापीठात प्रदर्शित करण्यात आला होता. यासंबंधी काँग्रेसचे खासदार रणदीप सिंह सुरजेवाला यांनी राज्यसभेत विदेशमंत्री एस. जयशंकर यांना या दुष्प्रचाराला सामोरे जाण्यासाठी सरकारने उचललेल्या पावलांविषयी विचारणा केली होती. देशाची सुरक्षा आणि त्याचे हित सर्वोपरि असल्याचे म्हणत केंद्र सरकारने बांगलादेशला त्याच्या भूमीवर 'सल्तनत-ए-बांग्ला' समूह सक्रिय असल्याचे कुठलेच पुरावे मिळालेले नसल्याची माहिती शुक्रवारी दिली.ढाका येथे 'सल्तनत-ए-बांग्ला' नावाच्या एका धार्मिक कट्टरवादी समुहाने कथित स्वरुपात 'ग्रेटर बांगलादेश'चा एक नकाशा जारी केला असून यात भारताचे काही हिस्से दाखविण्यात आले आहेत. या धार्मिक कट्टरवादी सुमहाला तुर्कियेच्या 'तुर्की यूथ फेडरेशन' नावाच्या संघटनेचे समर्थनप्राप्त आहे. बांगलादेश सरकारच्या 'फॅक्ट चेक प्लॅटफॉर्म' 'बांग्लाफॅक्ट'ने बांगलादेशात 'सल्तनत-ए-बांग्ला' सक्रिय असल्याचे कुठलेच पुरावे नसल्याचा दावा केला असल्याची माहिती जयशंकर यांनी संसदेत दिली आहे.

### आयर्लंडमधील भारतीयांसाठी सतर्कतेचा इशारा

**लंडन :** आयर्लंडमध्ये रहात असलेल्या भारतीय नागरिकांसाठी तेथील दूतावासाने सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. राजधानी डब्लिन आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये भारतीय नागरिकांवर हल्ल्याच्या घटना घडल्यानंतर हा इशारा जारी करण्यात आला आहे.अलिकडच्या काळात भारतीयांवरच्या हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या हल्ल्यासंदर्भात भारतीय प्रशासनाकडून आयर्लंडच्या प्रशासनाशी संपर्क साधला गेला असून भारतीयांवरील हल्ले थांबवण्यासाठीच्या उपाययोजनांबाबत चर्चा केली जाते आहे.भारतीय नागरिकांनीही सतर्कता बाळगावी आणि निर्जन ठिकाणी एकट्याने जाणे टाळावे, असे भारतीय दूतावासाने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

## दहशतवाद्यांना मारण्यापूर्वी तुम्हाला फोन करून विचारू का? मोदींचा अखिलेश यादव यांना सवाल

वाराणसी, दि.२ वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी लोकसभा मतदारसंघ वाराणसी येथून समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील आरोपींना ठार मारण्याच्या वेळेवरून अखिलेश यादव यांनी प्रश्न उपस्थित केल्याने पंतप्रधान मोदींनी तीव्र नाराजी व्यक्त केली.
''दहशतवाद्यांना मारण्यासाठी तुम्हाला फोन करून विचारायचं का? त्यांना पळून जाण्याची संधी द्यायची का?'' अशा थेट आणि बोचऱ्या शब्दांत मोदींनी अखिलेश यादव यांच्यावर टीका केली.
पंतप्रधान मोदी शनिवारी वाराणसीमध्ये होते. येथे विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. या कार्यक्रमानंतर उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी समाजवादी पक्षाच्या व्होट बँकेच्या राजकारणावर सडकून टीका केली.

❑ पंतप्रधान मोदींनी अखिलेश यादव यांच्या संसदेतील वक्तव्याचा संदर्भ देत म्हटले की, ''समाजवादी पक्षाचे नेते संसदेत विचारतात की, पहलगामच्या दहशतवाद्यांना आत्ताच का मारले? मग आम्ही काय करायला हवं. त्यांना मारण्यापूर्वी समाजवादी पक्षाच्या लोकांना फोन करून विचारायचं का? तुम्हाला विचारू का, की त्यांना कधी मारायचं आहे? दहशतवाद्यांना मारण्यासाठी मुहूर्त शोधावा लागेल का? त्यांना पळून जाण्याची संधी द्यायची आहे का?''पंतप्रधानांनी आपला हल्ला अधिक तीव्र करत समाजवादी पक्षाच्या पूर्वीच्या सरकारवर गंभीर आरोप केले. ते म्हणाले, ''हे तेच लोक आहेत, जे सत्तेत असताना दहशतवाद्यांना क्लीन चिट देत होते. बॉम्बस्फोट करणाऱ्या दहशतवाद्यांवरील खटले मागे घेत होते. आता त्यांना दहशतवादी मारले गेल्याने त्रास होत आहे, ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्याने त्रास होत आहे.''



❑ ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत पंतप्रधान मोदी भावूक झाले. ते म्हणाले, ''ऑपरेशन सिंदूरनंतर मी पहिल्यांदा काशीला आलो आहे. पहलगाममध्ये २६ निष्पाप नागरिकांची दहशतवाद्यांनी निर्घृण हत्या केली होती. माझे हृदय दु:खाने भरले होते.मी माझ्या लेकींच्या सिंदूरचा बदला घेण्याची शपथ घेतली होती आणि महादेवाच्या आशीर्वादाने मी ती पूर्ण केली. ऑपरेशन सिंदूरचे यश मी महादेवाच्या चरणी समर्पित करतो.''या राजकीय टीकेसोबतच पंतप्रधान मोदींनी वाराणसीला विकासाची मोठी भेट दिली. त्यांनी एकूण ५२ प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली, ज्यांची एकूण किंमत २१८३.४५ कोटी रुपये आहे.

### अमेरिकेतून दररोज ८ भारतीयांची होतेय हकालपट्टी

बंगळूर : दि. २ वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यावर्षी जानेवारीत पुन्हा अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्यानंतर भारतीयांच्या हकालपट्टीत लक्षणीय वाढ झाली आहे, हे आता लपून राहिलेले नाही. मात्र, ही वाढ बायडेन प्रशासनाच्या आणि ट्रम्प यांच्या मागील कार्यकाळाच्या तुलनेत कितीतरी अधिक आहे, हे आता समोर आले आहे. या वर्षापासून दररोज सरासरी किमान ८ भारतीयांना परत पाठवण्यात आले आहे, तर यापूर्वीच्या काळात (जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२४) हे प्रमाण दररोज सुमारे ३ होते.
परराष्ट्र मंत्रालयानदिलेल्या माहितीनुसार, जानेवारी २०२० ते जुलै २०२५ या साडेपाच वर्षांच्या कालावधीत विविध कारणांमुळे ७,२४४ भारतीयांची हकालपट्टी करण्यात आली. धक्कादायक बाब म्हणजे, यापैकी जवळपास एक चतुर्थांश म्हणजेच १,७०३ जणांना ट्रम्प दुसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतरच्या अवघ्या काही महिन्यांत परत पाठवण्यात आले आहे.

## ... तर मोदी पंतप्रधान नसते! राहुल गांधींचा निवडणूक आयोगावर प्रहार

नवी दिल्ली , दि. २ वृत्तसंस्था




काँग्रेसचे नेते आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीवर गंभीर आरोप करत ती निवडणूक ''बनावट'' असल्याचा दावा केला आहे.
दिल्ली येथे झालेल्या 'वार्षिक कायदा संमेलन २०२५' मध्ये बोलताना गांधींनी भारतीय निवडणूक आयोगावर थेट प्रहार केला आणि संपूर्ण निवडणूक यंत्रणेलाच ''मृत'' घोषित केले.
राहुल गांधी म्हणाले, ''भारताची निवडणूक प्रणाली आता मृत झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी खूपच कमी बहुमतावर सत्तेवर आहेत. जर १५ जागा बनावटपणे जिंकल्या गेल्या नसत्या, तर आज ते पंतप्रधान असतेच नाहीत. आम्ही लवकरच देशासमोर पुरावे सादर करू.'' त्यांनी दावा केला की काँग्रेसकडे यासंबंधी ''ओपन-अँड-शट'' प्रकारचे स्पष्ट पुरावे आहेत आणि लवकरच देशासमोर ते ''अणुबॉम्ब'' प्रमाणे स्फोटक स्वरूपात सादर केले जातील.
राहुल गांधींनी भारतीय निवडणूक आयोगावरही थेट आरोप करत म्हटले की, ''मतं चोरली जात आहेत आणि त्यात आयोग स्वत: सहभागी आहे.'' त्यांनी सांगितले की, काँग्रेसने आपल्या स्तरावर सहा महिन्यांची सखोल चौकशी केली असून आयोगाच्या भूमिकेवर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.
''आमच्या तपासात अनेक बाबी समोर आल्या आहेत ज्या देशाच्या लोकशाहीसाठी अतिशय धोकादायक आहेत. निवडणूक आयोगाने सहकार्य न केल्यामुळे आम्ही आमच्याच मार्गाने तपास केला. त्यातून जे निष्कर्ष समोर आले, ते अणुबॉम्बसारखे आहेत. हे पुरावे समोर आल्यावर लोकशाहीवरचा विश्वास हादरेल,'' असे ते म्हणाले.
राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगातील दोषी अधिकाऱ्यांना थेट इशारा देताना म्हटले की, ''कोणताही दोषी अधिकारी कार्यरत असो वा निवृत्त वाचणार नाही. हे कृत्य देशद्रोहासारखे आहे. आणि आम्ही हे सोडणार नाही.''राहुल गांधींच्या या आरोपांवर निवडणूक आयोगाने त्वरित प्रतिक्रिया देत सर्व दावे ''निराधार, अतिशयोक्त व जबाबदारीशून्य'' असल्याचे म्हटले आहे.

## मुंबईहून कोलकात्याला जाणाऱ्या इंडिगो विमानात प्रवाशाला मारहाण

कोलकाता : दि. २ वृत्तसंस्था

मुंबईहून कोलकात्याला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात एका प्रवाशाला पॅनिक अ‍ॅटॅक आल्याने शेजारच्या प्रवाशाने त्याला कानशिलात लगावल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या घटनेनंतर सहप्रवाशाला कानशिलात मारणाऱ्या प्रवाशाबद्दल इतर प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली. यादरम्यान, व्हिडिओमध्ये एअरहोस्टेस त्या प्रवाशाला असे कृत्य न करण्याचे आवाहन करताना दिसत आहे. दरम्यान, व्हिडिओमध्ये ज्या प्रवाशाला मारहाण झाली तो मोठ्याने रडताना दिसत आहे. इंडिगो फ्लाइट क्रमांक ६१३८ लँड झाल्यानंतर ही घटना घडली. दरम्यान, प्रवाशाला कानशिलात मारणाऱ्याला कोलकाता विमानतळावरील सुरक्षा पथकाच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही घटना उघडकीस आल्यानंतर इंडिगोने एका अधिकृत निवेदनात प्रसिद्ध केले आहे. त्यामध्ये म्हटले आहे.

## पाकिस्तानमध्ये भीषण रेल्वे अपघात: रेल्वेचे डब्बे रुळावरुन घसरल्याने १० हून अधिक जखमी



इस्लामाबाद : दि.२ वृत्तसंस्था

पाकिस्तानमध्ये एक भीषण रेल्वे दुर्घटना घडली आहे. पाकिस्तानच्या लाहोरजवळ इस्लामाबाद एक्सप्रेस ट्रेनचे डब्बे पटरीवरुन घसरले आहेत. या अपघातात ३० प्रवासी जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली असून मत कार्य सुरु करण्यात आले आहे.
पाकिस्तानी पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (१ ऑगस्ट) लाहोरजवळ शेखुपुरा जिल्ह्यातील काला शाह काकू भागात हा अपघाता घडला. इस्लामाबाद एक्सप्रेसचे १० हून अधिक डब्बे अचानक रुळावरुन घसरली. इस्लामाबाद एक्सप्रेस लाहोरहून रावळपिंडीला निघाली होती. या दपम्याम शुक्रवारी (१ ऑगस्ट) संध्याकाळच्या सुमाराहा लाहोरुपासून ५० किमी अंतरावर ही दुर्घटना घडली.
पाकिस्तानच्या रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या बचाव कार्य सुरु आहे. बचाव पथके घटनास्थळी पोहोचली असून जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



## सौरऊर्जा निर्मितीत भारत बनला जगातील तिसरा सर्वांत मोठा देश

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

गेल्या काही वर्षांपासून भारत हा देश विविध क्षेत्रात प्रगती करताना दिसत आहे. त्यात सौर ऊर्जा निर्मितीतही भारताचे एक पाऊल पुढेच आहे. सौरऊर्जा उत्पादनात भारत जपानला मागे टाकत तिसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी गुरुवारी ही माहिती दिली. या मोठ्या यशानंतर भारताचा जागतिक स्तरावरील मान वाढला आहे. केंद्रीयमंत्री प्रल्हाद जोशी यांनी आंतरराष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा एजन्सी च्या आकडेवारीचा हवाला दिला आहे. त्यामध्ये त्यांनी माहिती दिली.

भारताने १,०८,४९४ गिगावॅट तास सौरऊर्जा उत्पादन केली आहे, तर जपानने ९६,४५९ गिगावॅट तास सौरऊर्जा उत्पादन केली आहे. या आकडेवारीनुसार, भारताने जपानला मागे टाकल्याचे दिसून येत आहे. आयआरईएनए ही ऊर्जा परिवर्तनासाठी एक जागतिक संस्था आहे, जी आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करते. ती देशांना त्यांच्या ऊर्जा प्रक्रिया परिवर्तनात मदत करते. याशिवाय, ते तंत्रज्ञान, नवोपक्रम, धोरण, वित्त आणि गुंतवणुकीवरील डेटासह विश्लेषण देखील प्रदान करते.

केंद्रीय मंत्री जोशी यांनी '' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरही माहिती पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी सौरऊर्जा उत्पादनात भारताने जपानला मागे टाकले आहे. भारताने १,०८,४९४ गिगावॅट तास सौरऊर्जा उत्पादन केले तर जपानचे उत्पादन ९६,४५९ गिगावॅट तास आहे. भारत आता जगातील तिसरा सर्वात मोठा सौरऊर्जा उत्पादक देश बनला आहे.

## आगळे-वेगळे | भारतीय वन्यजीव संस्थेचा अहवाल

## देशातील १८ व्याघ्र प्रकल्पांत नऊ प्रजातींच्या लहान जंगली मांजरी

नागपूर : दि. २ वृत्तसंस्था

केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाने जागतिक व्याघ्र दिनानिमित्त 'स्टेटस ऑफ स्मॉल कॅट-इन द टायगर लँडस्केप ऑफ इंडिया' अहवाल प्रकाशित केला. हा अहवाल भारतातील वाघांच्या अधिवासात आढळणाऱ्या नऊ लहान जंगली मांजरांच्या प्रजातींचे पहिलेच देशव्यापी मूल्यांकन आहे.
२०१८ आणि २०२२ मध्ये आयोजित व्याघ्रगणनेच्या अभ्यासातील तपशिलावर आधारित हा अभ्यास आहे. २०१८ ते २०२२ दरम्यान देशातील १८ राज्यांमध्ये ५७ हजारांहून अधिक कॅमेरा ट्रॅप स्थानांचे सर्वेक्षण करण्यात आले. यात लहान जंगली मार्जार कुळातील प्रजातींची एकूण २४ हजार ८०० छायाचित्रे टिपली गेली. या सर्व छायाचित्रांच्या अभ्यासातून १७ हजार लहान जंगली मार्जार कुळातील प्रजातींची वैयक्तिक ओळख पटवण्यात आली. या तपशिलामुळे संशोधकांना जंगली मांजर, वाघाटी (रस्टी स्पॉटेड कॅट), बिबट मांजर(लेपर्ड कॅट), मासेमारी मांजर (फिशिंग कॅट) आणि इतर प्रजातींच्या व्याप्तीचे मूल्यांकन करण्याची परवानगी मिळाली. यात जंगली मांजरीची संख्या (जंगल कॅट) वाढलेली दिसून आली. अंदाजे ९६ हजार २७५ चौरस किलोमीटर एवढे तिचे अधिवास क्षेत्र आढळले. याउलट वाघाटीचे(रस्टी स्पॉटेड कॅट) अधिवास क्षेत्र जास्त असूनही २०१८ आणि २०२२ या दोन्ही गणनेदरम्यान त्यांची संख्या कमी झालेली दिसून आली. ओलसर जंगलात आढळणाऱ्या बिबट मांजरचे (लेपर्ड कॅट) अधिवास क्षेत्र ३२ हजार ८०० चौरस किलोमीटर इतके नोंदवले गेले. हिमालयाच्या पायथ्याशी, ईशान्य भारत आणि सुंदरबन व पश्चिम घाटात ती आढळली. यापूर्वी ज्या अधिवास क्षेत्रात तिचा आढळ होता, त्यापैकी जवळपास अर्ध्या भागात तिची उपस्थिती आढळली.
वाळवंटातील मांजर (डेझर्ट कॅट) प्रामुख्याो पश्चिम आणि मध्य भारतातील कोरड्या व अर्ध शुष्क प्रदेशात १२ हजार ५०० चौरस किलोमीटरमध्ये आढळली.





❑ **अशा आहेत नऊ प्रजाती**
या अभ्यासाच्या माध्यमातून भारतातील व्याघ्र प्रकल्पामधून कॅराकल (शशकर्ण), फिशिंग कॅट (मासेमार मांजर), गोल्डन कॅट (सोनेरी मांजर), मारबल्ड कॅट, लेपर्ड कॅट, क्लाऊडेड लेपर्ड, रस्टी स्पोटेड कॅट (वाघाटी), वाइल्ड कॅट (जंगली मांजर) आणि डेझर्ट कॅट अशा नऊ प्रजातींची नोंद करण्यात आली.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✲ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✲पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271



## संवाद

ज्योती चव्हाण (राठोड)
७५८८५९०९९८




आजच्या जगात दया, धर्म आणि माणुसकी कमी होत आहे. नैतिकतेचे अवमूल्यन होत आहे. भाऊ-भाऊ एकमेकांचे वैरी बनत आहेत. मुले आपल्या वृद्ध आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवत आहेत. अशा काळात पुण्यातील एक दांपत्य आशेचा किरण बनले आहे. ते म्हणजे डॉ. अभिजित आणि डॉ. मनीषा सोनवणे. निराधार, भिकारी आणि अनाथांसाठी हे दांपत्य देवासारखे धावून आले आहेत. त्यांच्या याच कार्यामुळे आज संपूर्ण जग त्यांना 'भिक्षेकऱ्यांचे डॉक्टर'म्हणून ओळखते.

डॉ. अभिजित हे मूळचे साताऱ्याचे आहेत. त्यांनी बी.ए.एम.एस.चे शिक्षण घेतले आहे. त्यांना एका प्रतिष्ठित संस्थेत चांगल्या पगाराची नोकरीही होती. मात्र, त्यांच्या वैद्यकीय व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात एक मोठी अडचण आली. तेव्हा त्यांना एका परोपकारी बाबाजींनी मदत केली होती. खडकवासला येथील एका मंदिरात त्या बाबाजींनी डॉ. अभिजित यांना धीर दिला. त्यांनी स्वत:च्या भिक्षापात्रातील पैसे देऊन त्यांना मदत केली. काही काळाने डॉ. अभिजित त्या बाबाजींना भेटायला गेले. तेव्हा त्यांना बाबाजींच्या निधनाची बातमी समजली. ज्यांनी आपल्याला कठीण काळात मदत केली, त्यांच्यासाठी आपण काहीच करू शकलो नाही, या विचाराने त्यांना खूप दु:ख झाले. याच भावनेतून त्यांनी एक मोठा निर्णय घेतला. त्यांनी आपली नोकरी सोडली. आपले संपूर्ण आयुष्य भिकारी आणि दु:खी लोकांच्या सेवेसाठी समर्पित करण्याचा त्यांनी निश्चय केला. या कार्यात त्यांच्या पत्नी, डॉ. मनीषा यांनीही त्यांना खंबीर साथ दिली.

सुरुवातीला त्यांचा मार्ग सोपा नव्हता. भिकारी त्यांच्यावर विश्वास ठेवत नव्हते. 'हा माणूस आपल्या किडन्या काढायला आला आहे,' अशी भीती त्यांना वाटत होती. पण, डॉ. अभिजित यांनी आपले काम सोडले नाही. त्यांची सेवा आणि सचोटी पाहून हळूहळू भिक्षेकऱ्यांचा विश्वास बसू लागला. डॉ. अभिजित मंदिर, मशीद आणि चर्चच्या ठिकाणी जात असत. ते भिक्षेकऱ्यांची विचारपूस करत. त्यांच्यावर उपचार करत. त्यांच्या जखमा स्वच्छ करून मलमपट्टी लावत. गरज पडल्यास त्यांना दवाखान्यात दाखल करत. त्यांनी अनेक भिक्षेकऱ्यांच्या नेत्रशस्त्रक्रिया करून त्यांचे अंधत्व दूर केले. पुण्यातील एका सर्वेक्षणानुसार, शहरात सुमारे ३५०० भिकारी आहेत. त्यापैकी ११००हून अधिक भिक्षेकऱ्यांशी डॉ. सोनवणे थेट जोडले गेले आहेत. ते रोज सकाळी आपल्या बाईकवर औषधांच्या बॅगा घेऊन त्यांच्या वस्तीत जातात.

गरज पडल्यास ते त्यांची दाढी-कटिंग करण्याचे कामही करतात. सोहम ट्रस्ट: स्वावलंबनाचा प्रयत्न या कार्याचा विस्तार वाढत गेला, तसतशी पैशांची गरज भासू लागली. यासाठी त्यांनी 'सोहम ट्रस्ट'ची स्थापना केली. या ट्रस्टद्वारे त्यांनी मदतीसाठी आवाहन केले. त्यांचे ध्येय केवळ उपचार करण्यापुरते मर्यादित नव्हते. त्यांना भिक्षेकऱ्यांना स्वावलंबी बनवायचे होते. यासाठी त्यांनी विविध उपक्रम सुरू केले. मंदिरातून निर्माल्यासारखी फुले गोळा करून त्यापासून पावडर आणि औषधी द्रव्ये बनवणे. वाया गेलेल्या कापडापासून पिशव्या तयार करणे. भिक्षेकऱ्यांना त्यांच्या कौशल्यानुसार काम मिळवून देणे. त्यांच्या या कार्याला मोठी मदत मिळाली. दानिश शहा नावाच्या एका दानशूर व्यक्तीने बिबवेवाडी येथे २५०० चौरस फुटांची जागा दिली. यामुळे त्यांच्या कामाला मोठी गती मिळाली. या जागेत एक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. येथे ५०-६० कर्मचारी भिक्षेकऱ्यांना विविध कौशल्ये शिकवतात. डॉ. अभिजित यांनी ५२ मुलांना दत्तक घेतले आहे. त्यांनी त्यांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी उचलली आहे. याचा परिणाम आज दिसत आहे. यापैकी काही मुलांना सरकारी नोकऱ्या मिळाल्या आहेत. एक मुलगी तर 'यूपीएससी'ची तयारी करत आहे. डॉ. अभिजित आणि डॉ. मनीषा यांच्या या नि:स्वार्थ कार्याची शासनानेही दखल घेतली. त्यांचा अनेक वेळा सत्कार करण्यात आला. त्यांना २५०० पेक्षा जास्त पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये लोकमान्य टिळक, संत गाडगेबाबा आणि मदर तेरेसा यांसारख्या महत्त्वपूर्ण पुरस्कारांचा समावेश आहे.

डॉ. अभिजित यांचे कार्य (एका दृष्टिक्षेपात) : -२८५ भिक्षेकऱ्यांना स्वतंत्र व्यवसाय सुरू करून दिला.
-५२ मुलांना दत्तक घेऊन शिक्षण दिले; काहींना चांगल्या नोकऱ्याही मिळाल्या.
-२५०० नेत्रशस्त्रक्रिया करून अंधत्व दूर केले.
-३०व्यक्तींना श्रवणयंत्रे मिळवून दिली.
-१४४ व्यक्तींवर मोठ्या शस्त्रक्रिया (५ लाखांवरील) केल्या. -१०० लोकांची टीम तयार करून पुण्यातील सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ केली जात आहेत. त्याबदल्यात त्यांना वेतन दिले जात आहे.

अंतिम स्वप्न : पुरस्काराबद्दल बोलताना डॉ. अभिजित म्हणतात, 'मला कितीही बक्षिसे मिळाली, तरी खरे बक्षीस तेव्हाच मिळेल, जेव्हा मी भिक्षेकऱ्यांना स्वावलंबी करून त्यांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देईन. हेच माझे अंतिम स्वप्न आहे.'

# 'गाडी तो तेरा भाई चलाएगा!'



वैशाली ठाकरे
अमरावती

मैत्री आयुष्याच्या प्रत्येक वळणावर साथ देणारा अढळ हात... फ्रेंडशिप डे म्हणजे फक्त एक दिवस नव्हे ती आठवण आहे त्या नात्याची, जे जन्माने मिळत नाही, पण हृदयाने जपलं जातं. प्रत्येक ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी जगभरात फ्रेंडशिप डे साजरा केला जातो. यावर्षी ३ ऑगस्ट २०२५ रोजी हा दिवस साजरा होणार आहे.

फ्रेंडशिप डे ची सुरुवात कशी झाली? फ्रेंडशिप डेची कल्पना १९५८ मध्ये जॉय हॉल या व्यक्तीने मांडली. ते हॉलमार्क कार्ड कंपनीशी संबंधित होते. त्यांना वाटत होतं की, मैत्रीचं नातं अधिक दृढ व्हावं, लोकांनी एकमेकांबद्दल प्रेम व आपुलकी व्यक्त करावी यासाठी एक खास दिवस असावा. आज ही कल्पना जगभर पोहोचली आहे आणि लाखो-कोट्यवधी लोक दरवर्षी हा दिवस साजरा करतात. मैत्री म्हणजे कृष्ण आणि सुदाम्याचं अजरामर नातं श्रीमद्भगवतातील कृष्ण-सुदाम्याची मैत्री आजही प्रेरणादायी आहे. राजा असूनही कृष्णाने आपल्या गरीब मित्राचं प्रेमाने स्वागत केलं, त्याच्या दु:खावर फुंकर घातली. ही मैत्री आपल्याला शिकवते नाती संपत्तीने नव्हे, समर्पणाने निभावली जातात. ''आज गाडी तो तेरा भाई चलाएगा!'' बालपणापासून जपलेली मैत्री बालपणातील अनेक मित्र आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग होतात.
''भले शाळा वेगळी झाली, पत्ते बदलले, पण ती सायकलवरून फिरलेली गाडी, शेवटच्या डब्यात बसलेली मैत्री, अजूनही आठवतेच.''मैत्री म्हणजे कुणावरही हटके विश्वास ठेवणे, चुकले तरी न बोलता समजून घेणे, आणि अगदी स्वत:पेक्षा त्याला आधी सापडणं. उन्हात सावलीसारखा मित्र मैत्रीचं खरं मोल आणि मैत्रीत गोडवा असतो, पण खऱ्या अर्थानं मैत्रीची किंमत जेव्हा आयुष्यात वाईट वेळ येते, तेव्हाच समजते. दु:खात खांद्यावर हात ठेवणारा, तुमचं बोलणं न ऐकता भाव ओळखणारा, आणि तुम्ही गप्प असताना तुमचं मन समजणारा हा खरा मित्र. मैत्रीची परिभाषा प्रत्येकासाठी वेगळी असते काहींसाठी मित्र म्हणजे मजा-मस्तीचा साथीदार, काहींसाठी तो दु:खात पाठीशी उभा असलेला आधार, आणि काहींसाठी तो एकमेव व्यक्ती, ज्याच्यासोबत आपलं खरं स्वत: जगता येतं. मैत्री ही केवळ भावना नाही, ती एक जबाबदारी असते. फ्रेंडशिप डे साजरा कसा करावा?तर आपल्या जुन्या मित्रांना फोन करा, त्यांना आठवा. एखादा पत्र, मेसेज, किंवा भेटवस्तू देऊन नातं अधिक दृढ करा. मैत्रीचे क्षण पुन्हा जिवंत करा एकत्र फोटो, आठवणी शेअर करा.आणि सर्वात महत्त्वाचं कधीच विसरू नका, की तुमच्या आयुष्यात त्या व्यक्तीने काय स्थान घेतलं आहे. ''मैत्रीत झोल असतो, पण त्यातच जिव्हाळाही असतो!'' शेवटी एवढंच म्हणावंसं वाटतं मैत्री ही प्रेमाची अशी छटा आहे, जी जन्माची नसेल कदाचित, पण आयुष्यभर लक्षात राहते. यंदाचा फ्रेंडशिप डे एक द्याः ''आयुष्याच्या प्रत्येक वळणावर, 'गाडी तो तेरा भाईच चलाएगा!'''

# आरोग्यक्षेत्रातील अनेक यमदुतांचे समाजस्वास्थावरच आक्रमण...!



## प्रासंगिक

संजय एम. देशमुख
9881304546

समाजातला माणूस संकटातून,असाध्य व्याधीतून वाचला पाहिजे,त्याला उत्तम स्वास्थ लाभले पाहिजे.कारण त्याचे शरीरस्वास्थ ही त्याची संपत्ती तर असतेच, तो राष्ट्रसंपदेचाही सहयोगी सभासद असतो.म्हणून त्याला जीवनसुरक्षा देण्याच्या उदात्त उध्दीष्टाने विज्ञान,तंत्रज्ञान,प्राचिन योगविद्या,अलोपथी आणि आयुर्वेद औषधोपचार आहेत.त्या माध्यमातूनच अनेक मानवतावादी सेवाव्रती त्याला दिर्घायुष्य बहाल करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतात.मात्र दुसरीकडे नियतीकडून मानवी जीवनाच्या प्राप्त संधीचं सोनं करण्याची सद्बुध्दी अनेकांकडे नसते.म्हणून असे अनैतिक नराधम मानवी जीवनमुल्ल्यांना हरवून भौतिक आयुष्याचा प्रवास करत असतात. त्यांना समाजातला माणूस मेला तरी चालेल परंतू त्यांच्या ऐशोरामासाठी पापाच्या कमाईतून त्या प्रेतांच्या टाळूवरील लोणी त्यांना खाता आलं पाहिजे. या कुविचारांनीच चालणाऱ्या त्या अमानुष प्रवृत्ती असतात.असे काही लूटारू गल्लेभरू आरोग्य क्षेत्रात निर्माण झाल्याने नकली औषधांचा पुरवठा करणारे काळे यमदुत सुध्दा या कळपात सहभागी आहेत.

वाममार्गाने पैसा कमावण्यासाठी स्वत:चे माणूसपण विसरून मानवतेशी प्रतारणा करणाऱ्या आरोग्य क्षेत्रातील अपप्रवृतींनी समाजातील लोकांच्या आयुष्याची सौदेबाजी सुरू केलेली आहे.या क्षेत्रातील औषधांचे शासकीय पुरवठादार,विक्रेते आणि आर्थिक महत्वांकांक्षांनी आरोग्य क्षेत्राचा बाजार करणारे काही डॉक्टरही सहभागी आहेत. शासनाच्या सेवेत असणाऱ्या अनेक डॉक्टरांचे सरकारी दवाखाण्यात येणाऱ्या रुग्णांकडे लक्ष नाही .कारण ते नियमांचे उल्लंघन करून खाजगी रूग्णालयात भागिदारी करीत आहेत. खाजगीमध्ये खोऱ्याने पैसा ओढण्याचे व्यवसाय करीत आहेत.लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाकडून परभणी येथील अशा खाजगी व्यवसाय करणाऱ्या शासन सेवेतील १४ वैद्यकीय अधिकाऱ्यांची महामहिम राज्यपाल,आरोग्य मंत्री आरोग्य सचिव आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी गेलेल्या आहेत. या असंवेदनशील डॉक्टरांविरूध्द कार्यवाहीसाठी तेथीलपदाधिकाऱ्यांनी मागण्या केलेल्या आहेत.समाजाशी बेइमानी करत लोकांच्या खिशांवर आर्थिक डल्ले मारण्याचे काळे कारनामे काही अनैतिक डॉक्टर्स आणि औषधांचे पुरवठादार तथा विक्रेत्यांनी सुरू केलेले आहेत. देशात अस्तित्वात नसलेल्या अनेक बनावट कंपन्यांकडून या नकली औषधांचे पुरवठे होत असून ही अत्यंत संतापजनक बाब आहे.शासन आणि सर्वसामान्यांना लूटून आडमार्गाने पापाची माया कमावण्यासाठी रूग्णांचे स्वास्थ संकटात आणण्याचे क्रूर फंडे या अनैतिक साखळीने सुरू केल्याची माहिती पुढे येत आहे. औषध कंपन्याकडून पुरवठादार आणि सरळ मार्गाने डॉक्टरांना सुध्दा औषधांच्या पॅकेटवर आणि बॉटल्सवर पाहिजे त्या दरांची एम.आर.पी प्रिन्टसह देण्याची आश्वासने दिली जातात.यासाठी आर्थिक हितसंबंधांपासून तर परदेशात वेगवेगळ्या सोई सुविधा पुरविल्या जातात याचेही शोध आरोग्य क्षेत्रातील माहितगारांकडून मिडीया प्रतिनिधींनी लावलेले आहेत.अवाजवी किंमतीची आणि नकली औषधे बाजारात,शासकीय आणि खाजगी रूग्णालयांना पाठविली जातात. यामध्ये प्रचंड किंमतीतून लूटमार तर होत आहेच. परंतू प्रत्येक जिल्ल्ह्याच्या ठीकाणी उतरणाऱ्या औषधांचे नमुने घेऊन ते लबमधून प्रमाणित करून घेण्याची कर्तव्य बांधिलकी सुध्दा पार पाडली जात नाही. दक्षता घेण्याचीही संवेदनशिलता अन्न व औषध प्रशासन विभागाकडे उरली नसल्याने पैसे खर्च करून वरून मृत्यूलाही निमंत्रण देण्याची संकटे समाजावर ओढवलेली आहेत. अनेक ठीकाणी नकली औषधांचे साठे रूग्णालयातून आणि गोडाऊनमधून हस्तगत करण्यात आल्याच्या खळबळजनक घटना घडलेल्या आहेत.औषधांचे पुरवठादार आणि राज्यभरातील अन्न व औषध प्रशासनाचे मतलबी साटेलोटे हे या भयानक प्रकरणातील मुख्य कारण असलेच पाहिजे. त्याशिवाय अशाप्रकारे लोकांची आर्थिक लूबाडणूक करून हरामाच्या पैशांसाठी त्यांच्या स्वास्थ्याशी खेळण्याचे प्रकार एवढे बिनदिक्कत चालू शकत नाहीत. काही खाजगी कंपन्या, ठेकेदार, डॉक्टर्स आणि प्रशासनातील अनैतिक प्रवृत्ती समाजजीवनाचे मारेकरी ठरत आहेत.असे माणसांना मारणारे लूटारू जागोजागी निर्माण होणे हे एक मोठे सामाजिक दुर्दैव आहे.म्हणून महाराष्ट्र शासनाने घडलेल्या साऱ्या प्रकरणांची गंभीर दखल घेऊन अन्न व औषधे प्रशासन विभाग, पुरवठादार, आणि बेकायदेशीर कंपन्यांच्या चौकशा करून तातडीने कार्यवाही केल्या पाहिजेत. ज्या आरोग्यमंत्र्यांच्या कार्यकाळात असे नीतिमत्ताहिन ठेकेदार नेमण्यात आले,त्या मंत्र्यांची आणि संबंधित अधिकाऱ्यांच्याही चौकशा झाल्या पाहिजेत.प्रत्येक विभाग आणि जिल्ह्याच्या ठीकाणी ही औषधे बाजारपेठा आणि रूग्णालयांमध्ये पसरण्याअगोदर त्यांचे नमुने घेऊन प्रमाणिकरण का केले जात नाही याचा शोध घ्यावा.समाजस्वाथ्यावरील भयानक संकटाचे निराकरण करण्यासाठी या प्रकरणी प्राधान्याने लक्ष घालावे. अशीच मागणी लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ या समाजाभिमुख राष्ट्रीय संघटनेने सुध्दा मुख्यमंत्री आणि आरोग्य मंत्री तथा राज्य आयुक्तांकडे मागील काळात केलेली आहे.त्यानंतर काय कार्यवाही झाली याची माहिती शासनाच्या अन्न व ओषध प्रशासन आणा अरोग्य विभागाने दालि पाहिजे.

रूग्णांच्या जीवांचा खेळ मांडणाऱ्या या भरमसाट किंमतीच्या आणि काही नकली औषधांचे साठे राज्यात अजून कुठे कुठे पसलरले आहेत,याची शोधमोहिम आता जलदगतीने राबविली गेली पाहिजे.उघडीकीस आलेली ही प्रकरणे आता पुढे आली.परंतू आरोग्यक्षेत्रातून नेहमीच होत असलेली लूटमारीचे कारनामे औषधी व आरोग्य व्यवसायातील अशा काही क्रूर यमदुतांच्या चोरट्या मार्गाचे काळे वास्तव दर्शविणारी आहेत.याची पाळेमुळे शासनाने खोदून काढली पाहिजेत.पैसा कमावण्याच्या अघोरी वाममार्गाने समाजातील लोकांची आयुष्येच हिरावण्याचे राक्षसी हे प्रयोग सुरू आहेत.त्यात मानवी जीवनमुल्ल्ये हरविलेल्या काही डॉक्टर नामक माणसांचाही मोठा सहभाग आहे. अशा या संकटजनक परिस्थितीला नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न अविरत सुरू राहिले पाहिजेत. ऐशोरामी भौतिक जीवनात वासनांध होऊन बिघडलेली माणसं ईतरांच्या स्वास्थाला हानी पोहचवून पापाची माया ओरबाडण्यात किती लिप्त असतात याच्या अनेक क्रूर घटना आरोग्य क्षेत्रात आज घडत आहेत.हा आडमार्गाचा प्रवास करणारांना मानवतावाद आणि त्यातील अंतर्भूत जीवनमुल्ल्यांचे प्रबोधन करणे म्हणजे पालथ्या घडयावर पाणी टाकण्यासारखे असते. म्हणून अशा अपप्रवत्तींवर वारंवार कायद्यांचे बडगे उगारून त्यांना गारद करणे, प्रशासनातील बेईमान प्रवृत्तींना हाकलणे क्रमप्राप्त आहे. मुलभूत सुविधांमध्ये आरोग्यसेवा आणि तिला सहाय्यभूत ठरणारी औषधी निर्माण आणि पुरवठा सेवा तेवढीच महत्वाची आहे.त्याठीकाणी आता काही उघड झाले म्हणून एवढ्यापुरतेच नको,तर शासन प्रशासनाचे अविरत लक्ष असले पाहिजे.आरोग्य आणि औषधी क्षेत्राच्या,खाजगी आणि सरकारी रूग्णालयांच्या कठोर तपासण्या सुरू राहिल्या पाहिजेत.उपचारांचे दर,सेवाप्रणाली,स्वच्छता आणि प्रशासनिक अंमलबजावण्यांसाठी कठोर निकष लावले पाहिजेत.त्याच्या अंमलबजावणीवरही सुक्ष्म अवलोकनासाठी स्वतंत्र यंत्रणा असली पाहिजे. तरच आरोग्य सेवेसाठी खर्च होणाऱ्या करोडो रूपयांचा खर्चाचा योग्य विनायोग होईल आणि समाजही शासनाच्या कल्याणकारी सेवेवर समाधानी राहिल...!



## कथा

प्रा. मोहन काळे
७०३८२७६५५८




''मित्रांनो, गुड मॉर्निंग. सगळ्यांचा चहा नाश्ता झाला का?'' माधवीताईंनी मोठ्या आनंदाने व उत्साहाने दररोज सकाळच्या भेटीतील नेहमीचा पहिला प्रश्न विचारला.
''हो. सर्वांचा चहा नाश्ता झाला.'' सर्वजण एका सुरात म्हणाले. ''पण आमचा कालचा दिवस चांगला नाही गेला.'' माधवकाका तक्रारीच्या सुरात बोलले. ''का बरं? काही घडलं का काल?'' माधवीताईंच्या चेहऱ्यावर अचानक बदल दिसायला लागला. प्रसन्न दिसणाऱ्या चेहऱ्यावर अचानक चिंतेचे ढग जमा झालेले दिसले. ''तुम्ही काल आम्हांला भेटायला आल्या नाहीत. म्हणून आम्हांला काल दिवसभर करमलं नाही.'' मुळेकाकांनी मिश्कीलपणे म्हटलं.

माधवीताईंनी मोठा सुस्कारा टाकत म्हटलं. त्या काल महत्त्वाच्या कामासाठी बाहेरगावी गेल्या होत्या. सर्वांनाच माधवीताईंचा लळा लागला होता. त्यांच्याशिवाय कुणालाच करमत नसायचं. माधवीताई होत्याच तशा लाघवी, मायाळू व काळजी घेणाऱ्या. त्या दररोज जाणीवपूर्वक सर्वांची चौकशी करायच्या. त्यांना हवं नको ते बघायच्या. कुणी आजारी वगैरे आहे का म्हणून चौकशी करायच्या. कुणी आजारी असलं तर स्वतः लक्ष घालून उपचार करवून घ्यायच्या. त्यामुळे त्या माधवी वृद्धाश्रमात नेहमीच प्रसन्न वातावरण राहायचं. जवळपास तीस बत्तीस व्यक्ती त्या वृद्धाश्रमात होत्या. कुणाला मूलबाळ नाही, कुणाची मुलं परदेशात स्थायिक झालेले आहेत, कुणाला मुलं वागवत नाहीत, तर कुणाची आणखी काही समस्या. सर्वजण आपापल्या घरांपासून, कुटुंबांपासून, मुलाबाळांपासून, नातवांपासून दूर शहराच्या गावाबाहेर असलेल्या
वृद्धाश्रमात राहत होते. सर्वजण जवळपास समदु:खी असल्यामुळे व माधवीताईंच्या आदेशानुसार त्यांना सर्व सुखसोयी मिळत असल्यामुळे त्यांचा वेळ चांगला जायचा. चहा, नाश्ता, जेवण, कपडे सर्व चांगल्या दर्जाचं मिळत होतं. दररोज डॉक्टर येऊन सगळ्यांची आरोग्य तपासणी करायचे. मनोरंजनासाठी हॉलमध्ये मोठा ५६ इंची कलर टीव्ही लावलेला होता. बैठे खेळांचं साहित्य होतं. वृद्धाश्रमाबाहेरचा परिसर प्रसन्न होते. हिरवी झाडे, वेली, हिरवळ होती. बसण्यासाठी सिमेंट कॉंक्रीटचे ओटे तयार केलेले होते. पायी फिरण्यासाठी ट्रॅक तयार करण्यात आलेला होता. तसं पाहिलं तर सर्व सोयी व बोलायला बाकी व्यक्ती तिथे होत्या. मात्र वरून ते सर्व वृद्ध आनंदी व समाधानी दिसत असले तरी आतून त्यांना एकटेपण, तुटलेपण जाणवत होतं. त्यांना ह्या सोयी नसत्या तरी चालल्या असत्या पण त्या त्यांच्या कुटुंबात, मुलाबाळांमध्ये असत्या तर त्या मनातूनही आनंदी झाल्या असत्या. माधवीताई सर्वांची चौकशी करून कार्यालयात आल्या. जशा त्या खुर्चीवर बसल्या तशा त्यांच्या मोबाईलची रिंग वाजली. त्यांनी कॉल उचलला.
''हॅलो, माधवी वृद्धाश्रमात फोन लागला ना?'' तिकडून एका पुरूषाचा आवाज आला. ''हो.'' माधवीताई म्हणाल्या. ''माधवी मॅडम आहेत का?'' त्या पुरूषाचा दुसरा प्रश्न.
''हो. मी माधवीच बोलते. बोला, काय काम आहे?'' ''मॅडम, आपल्या वृद्धाश्रमात एक ॲडमिशन करायची होती. एक जागा खाली आहे का? मला एका मित्राकडून आपल्या वृद्धाश्रमाबद्दल समजले. त्यांनीच मला आपला मोबाईल नंबर दिला.'' ''होय. जागा खाली आहे ना. कुणासाठी जागा हवी आहे? आपले कुणी नातेवाईक आहेत का?'' माधवीताईंनी अगत्यपूर्वक विचारलं. ''नातेवाईक नाही. माझ्या आईसाठी जागा हवी आहे.'' ''तुमच्या आईसाठी?'' माधवीताईंना आश्चर्य वाटलं. ''हो. माझ्या आईसाठी.'' ''तुम्ही काय काम करता?'' ''मॅडम, मी एका कंपनीत मॅनेजर आहे.'' ''बरं, तुम्हांला पगार किती आहे?'' ''तसा मला दीड लाख रुपये महिना पगार आहे. पण काटून कुटून हाती सव्वा लाख रुपये येतात. ''तुम्ही खेड्यात राहता की खेड्यात?'' ''नाही. मी येथेच शहरातच राहतो.'' ''भाड्याने राहता का?'' ''नाही. स्वत:चा मोठा ऐसपैस थ्री बी एच के फ्लॅट आहे. पॉश एरियात.''
''अरे व्वा, म्हणजे चांगले श्रीमंत आहात तुम्ही. शेती वगैरे? आणि हा फ्लॅट तुम्ही होमलोन वर घेतला आहे का?''
''हो आहे ना. गावाकडे चांगली पस्तीस एकर शेती आहे. बागायती आहे. आणि हा फ्लॅट मला वडिलांनी त्यांच्या पैशातून घेऊन दिलेला आहे.''. ''बरंच उत्पन्न मिळत असेल शेतीतून?'' ''हो, ईश्वराच्या कृपेने भरपूर उत्पन्न मिळते शेतीतूनही.'' ''ही शेती तुम्ही स्वतः स्वतःच्या नोकरीच्या पैशातून घेतली असेल.'' ''नाही, मॅडम. शेतीचे भाव आजकाल गगनाला भिडलेले आहेत. पगारातून शेती घेणे शक्य होत नाही. ''
'' मग इतकी शेती कशी काय?''
'' वडिलांनी कमावलेली आहे सर्व शेती.''
'' बरं, तुमच्या आईंचं वय किती आहे?''
''साठ वर्षे.'' ''त्या आजारी असतात का?''
''नाही हो. चांगली धडधाकट आहे.''
''मग तुम्ही आईला वृद्धाश्रमात का टाकत आहात?'' ''मॅडम, बायकोचं आणि आईचं पटत नाही. त्या दोघींची सतत भांडणं होत राहतात. माझ्या डोक्याला नुसता ताप झालाय.
''आईचं काही चुकते का?''
''कधी आईचं चुकलेलं असते, कधी बायकोचं चुकलेलं असते. पण चूक कोणाचीही असो मला घरात वाद नकोय.''
''बरं, तुम्हांला मुलं आहेत का?''
''हो, मॅडम. दोन आहेत. एक मुलगा, एक मुलगी. मुलगा दहावीत आहे. मुलगी सातवीत आहे.'' ''तुमच्या मुलांचं आणि तुमच्या आईंचं पटत नसेल. त्यांचीही भांडणं होत असतील.''
''नाही, मॅडम. आजी नातवांचं खूप चांगलं ट्यूनिंग आहे. त्यांचं खूप चांगलं पटते. माझ्या मुलांना आजीशिवाय करमत नाही. आईला पण नातवांशिवाय करमत नाही.

''मग तुम्ही आईला वृद्धाश्रमात ठेवलं तर मुलांना करमेल का? त्यांना काय सांगाल?''
''मुलांना माझी बायको समजावून सांगेल.''
''आणि तुमच्या आईला काय सांगाल?''
''अहो,सर, बोला की. तुमच्या आईला काय सांगाल? सांगा ना.'' ''तुम्ही आईची ॲडमिशन करून घ्या. तुमची मासिक फीची रक्कम जितकी असेल तितकी द्यायला मी तयार आहे.''
''सर, आम्ही पैसे घेत नाही. आम्ही मोफत सेवा करतो वृद्धांची. आमचा ट्रस्ट आहे. खूप श्रीमंत लोक देणगी देतात वृद्धाश्रमाला. तुमच्या पैशाची आम्हांला गरज नाही. ''माझ्या मित्राने तर सांगितले की तुम्ही वर्गणी घेता म्हणून.''
''नाही. तुम्हांला खोटी माहिती पुरवण्यात आलेली आहे.'' ''मग तुम्ही आईला ठेवणार आहेत ना? मासिक वर्गणीचं जाऊ द्या. मी तुम्ही मागाल तेवढे डोनेशन देतो वृद्धाश्रमाला. तुम्ही आकडा सांगा फक्त.'' ''अहो, सर, तुमच्या पैशाची आम्हांला गरजच नाही. आम्ही वृद्धाश्रम चालवायला समर्थ आहोत. बरं, मी एक सुचवू का?'' ''बोला, मॅडम.''
''तुमच्या आईच्या ऐवजी बायकोला ठेवा ना तुम्ही वृद्धाश्रमात. तुमची बायको घरी नसणार म्हणजेच भांडणं पण होणार नाहीत आणि तुमच्या डोक्याला ताप पण होणार नाही.''
''असं कसं बोलता, मॅडम, तुम्ही? हे कसं शक्य आहे?'' ''का शक्य नाही? तुम्ही जन्मदात्या आईला जर वृद्धाश्रमात ठेवू शकता तर पत्नीला का नाही ठेवू शकत?''
''बायकोला वृद्धाश्रमात ठेवले तर ती मुलांशिवाय कशी राहील आणि मुलं तिच्याशिवाय कशी राहतील?''
''व्वा, सर, जर तुमची बायको तिच्या मुलांशिवाय राहू शकत नाही तर तुमची आई तिच्या मुलाशिवाय कशी राहील? तुमची मुलं जर त्यांच्या आईशिवाय राहू शकत नाही तर तुम्ही तुमच्या आईशिवाय कसं राहू शकाल?''
''ते आम्ही पाहून घेऊ. तुम्ही आईला ठेवायला तयार आहात का?''
''आम्ही तर ठेवूच तुमच्या आईला वृद्धाश्रमात. पण स्वतःचा मुलगा मात्र सख्ख्या आईला, जिनं त्याला जन्म दिला, पालणपोषण केलं, लहानाचं मोठं केलं, त्याची जीवापाड काळजी घेतली, त्याला त्याच्या पायावर उभं राहण्यासाठी सक्षम केलं, प्रसंगी स्वतःच्या ईच्छा मारून त्याच्या ईच्छा पुरवल्या, ज्याच्यावर माया केली, ज्याला आपलं सर्वस्व मानलं, तोच जर वृद्धाश्रमात ठेवत असेल तर त्या आईचा त्याग काय कामाचा? तिला जर आधीच माहीत असतं की आपण ज्याच्यासाठी खस्ता खातो, ज्याच्यासाठी आपलं जीवन जगतो, ज्याची आपण खूप काळजी घेतो, त्यालाच जर तो तिची गरज असताना काळजी घेत नसेल तर तो मुलगा काय कामाचा? तिने त्याला वागवायचे, त्याच्या चुका पोटात घालायच्या आणि तो मोठा झाला की त्याने तिला घरात थोडीशीही जागा द्यायची नाही. वृद्धाश्रमात ठेवायचे. इतका कृतघ्न फक्त माणूसच होऊ शकतो. बरं, मला एक सांगा, तुम्ही खूप श्रीमंत आहात असं तुम्ही म्हणता. पैशाचा तुम्हांला खूप गर्व आहे. मी काय म्हणते,की तुमची शेतजमीन आमच्या वृद्धाश्रमाच्या नावे करता का?'' '' मॅडम, हे जरा अतीच होते आहे. तुम्ही काही पण बोलत आहात. मी माझी जमीन तुमच्या वृद्धाश्रमाला का देऊ?''
''का बरं, तुमची आई तुम्ही आम्हांला देऊ शकता तर तिची व तिच्याच पतीची असलेली जमीन का नाही देऊ शकत? म्हणजे तुम्हांला आई नको पण आईची प्रॉपर्टी मात्र पाहिजे. आईनं दिलेलं घर पाहिजे पण तिला त्या घरात ठेवायचं मात्र नाही. म्हणजे तिच्याच घरावर तिचाच हक्क नाही. तुम्हांला जी नोकरी लागली व त्यामुळे तुम्हांला ऐशोआरामाचं जीवन जगता येत आहे ती तुमच्या आईवडिलांमुळे. तुम्हांला तर लाज वाटायला पाहिजे. तुमच्यासारख्या कृतघ्न व बेईमान माणसांमुळे वृद्धाश्रमांची संख्या वाढत चालली आहे. तुम्हांला लहान असताना आईवडिलांनी वागवलं नसतं, अनाथाश्रमात टाकलं असतं तर? किंवा तुम्ही म्हातारे झाल्यावर तुमच्या मुलाने तुम्हांला वृद्धाश्रमात ठेवले तर? थोडी जनाची नाही तर मनाची तरी थोडी लाज बाळगा. अहो सर, तुमच्या आईला तुमच्या घराची किवा शेतीची किंवा तुमच्या इस्टेटीची गरज नाही. तिला गरज आहे आपल्या माणसांच्या सोबतीची. नातवांसोबत, मुलासोबत राहण्याची. त्यांना महाग कपडे किंवा पंचपक्वान्न खायला नाही पाहिजे तर पाहिजे फक्त तुमचं सुख. तुम्ही तिची घेतलेली काळजी, तिचं मार्गदर्शन, तिच्यासोबत प्रेमपूर्वक साधलेला संवाद. एवढंच हवं असते हो कोणत्याही म्हाताऱ्या आईवडिलांना. आई तुम्हांला नऊ महिने पोटात वागवते, हजारो हाडे तुटताना जितक्या वेदना होतात तितक्याच वेदना प्रसूतीच्या वेळी होतात. बाळ झालं की, त्यातल्यात्यात मुलगा झाला की आईला कित्ती आनंद होतो! तुमच्या सुखासाठी ती देवाकडे प्रार्थना करते. आणि तुम्ही? बायकोचं ऐकून आईला वृद्धाश्रमात ठेवता? अरे, बायकोला ठणकावून सांगा की आई आपल्यासोबतच राहणार आहे, नव्हे आपणच आईजवळ राहणार आहोत म्हणून. तुमच्यात बायकोला समजावून सांगण्याची हिंमत नसेल तर थू तुमच्या पुरूषपणावर! तुम्हांला तर जगण्याचाच अधिकार नाही. घेऊन या तुमच्या आईला येथे. आम्ही वागवू तिला. तसेही अशा नीच विचारांच्या मुलाबरोबर तिनेच राहू नये. ....''
माधवीताई त्यांच्याच तंद्रीत बोलत होत्या. त्यांचा चेहरा रागाने लाल झाला होता. त्यांचे हात थरथरत होते.
''क्षमा करा, ताई. मी आता आईला कधीही वृद्धाश्रमात ठेवणार नाही. तुम्ही मोठ्या बहिणीसारख्या बोलल्या. मला पश्चात्ताप होत आहे. तुम्ही माझे डोळे उघडले. मला आता स्वत:चीच लाज वाटत आहे. मी जन्मभर आईची काळजी करीन, तिची सेवा करीन, तिला कधीच अंतर देणार नाही.'' फोनवर माधवीताईंना त्या पुरूषाचा रडवेला आवाज जाणवला. त्यांनी समाधानाने फोन बंद केला.

# 'सम्या सम्या मैफलीत माझ्या' मध्यमवर्गाच्या मनातली जपून ठेवलेली कुपी

प्रासंगिक

डॉ. विनय दांदळे



मराठी रंगभूमीवर हास्याची खास ओळख निर्माण करणारा, पण त्या हास्यामागे एक तपशीलवार, संवेदनशील आणि सखोल विचार असलेला कलाकार म्हणजे समीर चौगुले. त्यांचे अभिनय, लेखन आणि सादरीकरण यामध्ये एक वेगळी सच्चाई असते ती सच्चाई जी नकळतपणे आपल्याला आपलीच कथा ऐकवते.

त्यांचा एकपात्री कार्यक्रम ''सम्या सम्या मैफलीत माझ्या'' हा केवळ मनोरंजन म्हणून सादर होणारा प्रयोग नाही, तर हा कार्यक्रम म्हणजे आपल्या आजूबाजूच्या मध्यमवर्गीय जीवनाचं एक सत्य भाष्य आहे. प्रेम, लग्न, अपेक्षा, अपुऱ्या गोष्टी, समाजाची बंधनं आणि स्वतःच्या भावना या सगळ्यांची सांगड समीर अत्यंत सहज आणि परिणामकारक भाषेत घालतात.

या कार्यक्रमात ''सम्या'' हा व्यक्तिरेखा आहे, पण तो कुणी एक ठराविक व्यक्ती नसतो. तो मी, तू, आपण सारे असतो.

समीर चौगुले यांनी हा संपूर्ण कार्यक्रम स्वतः लिहिला आहे आणि स्वतःच सादर करतात. एकाच व्यक्तीकडून लेखन, अभिनय आणि सादरीकरण ही सोपी गोष्ट नाही. पण समीर हे इतक्या अभ्यासपूर्ण पद्धतीने करतात की, प्रेक्षक केवळ कार्यक्रम बघत नाही, तर त्यात सहभागी होतो.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच त्यांच्या सहज बोलण्यातून एक ओढ निर्माण होते. हसवत हसवत ते आपल्याला आपल्या आयुष्यातल्या कधीतरी अनुभवलेल्या प्रसंगांची आठवण करून देतात. आणि जिथे हसू थांबतं, तिथे नकळत डोळ्यात पाणी येतं. कारण हे सगळं कुठे तरी आपल्या अंतर्मनात घडत असतं.

''प्रेम म्हणजे नेमकं काय?''

''लग्न ही संकल्पना खरंच आपल्यासाठी योग्य आहे का?''

''समाजाच्या अपेक्षांची आपण गळफास घालून घेतलेली आहे का?''

या आणि अशा असंख्य प्रश्नांना ते केवळ प्रश्न म्हणून मांडत नाहीत, तर त्यावर प्रेक्षकांना विचार करायला लावतात. 'सम्या सम्या मैफलीत माझ्या' या कार्यक्रमाचं विशेष म्हणजे त्यात एक विशिष्ट ''साधेपणा'' आहे. सेट्स नाहीत, प्रकाशझोत नाहीत, केवळ एक कलाकार आणि प्रेक्षक. आणि त्या दोघांमधील एक अबोल संवाद. समीर चौगुले यांची शब्दांची मांडणी, उपरोध, नर्मविनोद, आणि भाषेवरचं प्रभुत्व हे सगळं इतकं परिपक्व आहे की, त्यांच्या प्रत्येक ओळीतून एक अनुभव झिरपत असतो.हा कार्यक्रम आजवर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सादर झाला आहे. प्रत्येक ठिकाणी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेला आहे. प्रेक्षकांच्या मनात हा कार्यक्रम खोलवर रुजलेला आहे. कारण हा कार्यक्रम ''त्यांच्या'' विषयी आहे सामान्य मध्यमवर्गीय माणसांविषयी.समीर चौगुले हे केवळ अभिनेता नाहीत, ते एक सूक्ष्म निरीक्षक आहेत. त्यांच्या नजरेतून समाजाकडे पाहिलं की त्या नजरेत कधी मिश्कील विनोद असतो, तर कधी भेदक प्रश्न. त्यांचं लेखन आणि सादरीकरण हे मराठी साहित्यात आणि नाट्यविश्वात एक वेगळी दिशा दाखवणारे ठरत आहे.आज जेव्हा दर्जेदार एकपात्री प्रयोगांची संख्या कमी होत चालली आहे, तेव्हा समीर चौगुले यांच्यासारखा प्रयोगशील, अभ्यासू आणि समाजाभिमुख कलाकार आपल्या अस्तित्वाची खूण ठसठशीतपणे उमटवतोय, ही नक्कीच मराठी रंगभूमीसाठी आणि प्रेक्षकांसाठी आनंदाची बाब आहे.

## आकाश साप्ताहिकी

सूर्य सान्निध्यात ग्रह आल्याने अस्त व अंतर वाढल्यामुळे उदय हे आपण नेहमी अनुभवतो.परंतू दक्षिण आकाशात अधिराज्य गाजवणारी अगस्त्य तारका मात्र १५ मे ते ८ ऑगस्ट पर्यंत अकरा आठवडे अस्त झालेला अगस्त्य आपल्या भागातून दिसायला लागेल.या दक्षिण आकाशातील तेजस्वी व रंगीबेरंगी ताऱ्याचे महत्व अधिक असल्याने रात्रीचे वेळी दक्षिण दिशा दर्शक म्हणून ओळखतात.ही तारका ९ ऑगस्ट पासून दक्षिणेस बघता येईल.




***अशी असेल आकाश स्थिती***

दि.३ ते ९ऑगष्ट २०२५.

दि.३.चंद्र विशाखा नक्षत्रात. इंटरनॅशनल स्पेस स्टेशन दर्शन रात्री ८-०२ ते८-०७ पश्चिमेकडून दक्षिणेकडे.

दि.४.चंद्र अनुराधा नक्षत्रात.

दि.५.चंद्र आणि ज्येष्ठा युती अगदी जवळ दिसतील.

दि.६.चंद्र मूळ नक्षत्रात.

दि.७.चंद्र पूर्वाषाढात.

दि.८.चंद्र उत्तर आषाढा नक्षत्रात.बुध ग्रहाचा पूर्वेस उदय.

दि.९.चंद्र श्रावण पौर्णिमेला श्रवण नक्षत्रात.दक्षिण आकाशात अगस्त्य ताऱ्याचा उदय.

***असे असेल ग्रह दर्शन***

सध्या काहीसे खुल्या झालेल्या आकाशात रात्रीचे प्रारंभी मंगळ ग्रह मिथून राशीत पश्चिमेस, शनी ग्रह रात्री साडे दहा नंतर मीन राशीत पूर्वेस आणि पहाटे तेजस्वी शुक्र व जरा खाली गुरु ग्रह व दि.८ पासून बुध ग्रह दर्शन देईल.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 120



### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः–**

**दोन अक्षरी**
आळ, ईद, कटी, गट, गडू, घन, घाला, जड, जप, जव, जाऊ, टका, डाग, दर, नड, पंथ, बुटी, मावा, रवि, लव, लाल, लीला, वार, शाल, षष्ठी, सग, सर्ग, हात, हेवा

**तीन अक्षरी**
अवाक, इलाज, कळस, कमाल, कानन, कासार, चालक, जमाव, डवरा, नवाडा, रबर, लगट, विविध, शुभांक, सळई, सावध, संपदा

**चार अक्षरी**
अपकार, अनुदान, अवधान, कालमान, कासाविस, जिजाबाई, तिलांजली, धनगर, पलायन, बिजवर, बुलबुल, वनवास, सहवास, सीमाशुल्क, हवामान

**पाच अक्षरी**
अनुपयोग, कर्णपिशाच्च, धडधाकट, प्रथमोपचार, सरसावणे, सीमोल्लंघन

**सहा अक्षरी**
इजा बिजा तिजा, बहाल करणे

**अन्य अक्षरी**
कपिलाषष्ठीचा योग

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 501



**आडवी विधानेः–** 1) विवाह समारंभात सासुने सुनेचा चेहरा आरश्यात बघावयाचा विधी
3) कायदे मंडळात पास करुन घेण्यासाठी मांडावयाचे बील
5) विमानाचा चालक
8) समोरचे तोंड, सुरवातीचे
9) नमस्कार, प्रणिपात
11) दंत
12) केवळ एकच
14) अन्यायाविरुद्ध लढतांना मरणाची सुद्धा भीती न बाळगता सत्याची बाजू मांडत केलेले आंदोलन
15) स्वभाव, वर्तणूक
16) लोखंडाला आपल्याकडे आकृष्ट करणारा दगड
18) स्वतःच्या मताबद्दल आग्रही असलेला, अहंकारी
19) लोखंड
20) बहुसंख्य लोकांचे एकमत
22) नवरी मुलगी
23) समाधान, आनंद
24) हानी, नुकसान
25) पूर्ण करणारे
27) सूर्य, ताप देणारे
28) सूट, सवलत, उणीव
30) समुद्राची अधिष्ठात्री देवता
32) बाल कथेतील पंख असलेली काल्पनिक सुंदर स्त्री
33) देणारा 35) महिना
37) रत्नांची खरी ओळख असलेला
40) आंग्ल भाषेत उन्हाळा
41) शेतजमिनीवर आकारलेला कर
42) शेळी
43) वैद्यकीयदृष्टया रक्ताच्या घटकावरुन ठरविलेला रक्ताचा गट
45) एक बहुमानदर्शक पदवी
46) बेंबी
47) टग्या, टवाळखोर
48) गर्व, उन्मत्तपणा
49) मनन, ध्यास
51) फांदी, ब्रान्च
53) पुरुषांच्या नावासमोर लावण्याची एक पदवी
56) संस्थेचा वाढदिवस, वर्धमान
57) अहं, बोलणारा स्वतः
58) धनवान, धनाढ्य
59) खालचा बूड, सैन्याचा मुक्काम
60) वेढा, फेरा
61) उदाहरण, नमुना, प्रत्यक्ष अनुभव
63) स्वतःशीच केलेले संभाषण
62) शेगांवीचा राणा
67) माफी
69) तेजोहीनता
71) शिजवून पातळ केलेली डाळ
72) शालेय अभ्यासक्रमातील एक विषय
73) कागदावर लिहिण्यासाठी उपयोगात येणारा एक पदार्थ
75) एक मराठी खासगी दूरचित्रवाहिनी
76) नृपति
77) मोठ्या बहिणीचे संबोधन
78) एकाग्र दृष्टी
79) सौभाग्यवतीचे संक्षिप्त उच्चारण
80) मृदू, मुलायम

**उभी विधानेः–** 1) लाक्षणिक अर्थाने सूर्योदयानंतर झोपून उठणारा
2) पक्षी
3) विजेच्या प्रवाहामुळे ज्यात विद्युत लहरी जागृत असा लोखंडाचा तुकडा
4) डाग, काळिमा, बट्टा
5) विविधता, आश्चर्य
6) ज्याला कोणतेही व्यसन नाही असा
7) गळ, हट्ट, मिनतवारी
8) वर्तमानपत्रातील मुख्य संपादकांचा लेख
10) अर्धा भाग, दल, सैन्य
11) आग, चटका 12) सर्वांचे सारखे मत
13) मौल्यवान, किंमती वस्तु
16) सरदार वल्लभभाई पटेल यांना मिळालेली पदवी
17) खुप, पुष्कळ
18) मौंज झालेल्या बटूने शिजलेल्या अन्नाची भिक्षा मागणे
21) नाकाने हुंगण्याची पूड
23) प्राचीनकालीन एक प्रसिद्ध अंध संत कवी
24) अतिशय नाजूक, थोड्याशा कारणाने बिघडणारी प्रकृती
26) युद्ध, युद्धभूमी
29) कावळ्याचे ओरडणे
31) प्रयत्न 34) मृत्यु देवता
36) निष्णात, पटाईत, सरावलेला
37) सुटी, परवानगी
38) पायी चालण्याचा मार्ग
39) दूध घालून तयार केलेला एक गोड पदार्थ
42) तळतळाटाचे भाषण, शाप
44) श्रीमंतीत जन्मलेला
48) एक शरीरावयव
49) चिंच–गुळ घालून तयार केलेला एक आंबट गोड पातळ पदार्थ
50) एक खनिज द्रव्यप्रकार
52) उच्च कूळ, कुटूंब (हिंदी)
54) हरविणे, जिंकणे
55) आस्था, चिंता, करुणा
58) प्रारंभ, शुभकार्याची सुरुवात
62) लक्षणांवरुन जाणावयाचा, अप्रत्यक्षरित्या
64) हिंमत, जोम 66) जाणणारा
68) बुद्धिबळात प्रतिस्पर्ध्याच्या राजाला आपल्या गोटीने केला असता होणारा डाव
70) हिंदीत कंबर 71) उणे, काढून टाकणे
72) समुदाय 74) मुसलमानांचा सण

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य


**मेष :** तुम्हाला सर्जनशील कामांमध्ये यश मिळेल. संगीत इत्यादींमध्ये तुम्हाला रस असेल. तुम्हाला स्वादिष्ट जेवणाचा आनंद मिळेल.


**वृषभः** तुम्ही नवीन काम सुरू करण्याची योजना कराल. तुम्ही जोखीम घेऊ शकाल. बेरोजगारी दूर करण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.


**मिथून :** कायदेशीर अडथळे दूर होतील आणि परिस्थिती अनुकूल असेल. तुम्हाला नफ्याच्या संधी मिळतील.


**कर्क :** राग आणि उत्साहावर नियंत्रण ठेवा. दुखापत आणि अपघातामुळे शारीरिक नुकसान होऊ शकते. व्यवहारात घाई करू नका. नोकरीत कामाचा ताण असेल.


**सिंह :** तुम्हाला घराच्या आत आणि बाहेर सर्वत्र यश मिळेल. विरोधक सक्रिय राहतील. बाहेर जाण्याची योजना असू शकते.


**कन्या :** कामाच्या ठिकाणी बदल आणि सुधारणा होऊ शकतात. योजना फलदायी ठरेल. तुम्हाला मित्र आणि नातेवाईकांचा पाठिंबा मिळू शकेल.


**तुळ :** व्यवसायिक सहल यशस्वी होईल. थकबाकी वसूल करण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. कामात वाढ होण्याची शक्यता आहे.


**वृश्चिक :** अनावश्यक खर्च वाढू शकतात. वादांना प्रोत्साहन देऊ नका. इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका. जुना आजार उद्भवू शकतो.


**धनु :** नवीन कपडे आणि दागिन्यांवर खर्च होईल. बेरोजगारी दूर करण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. उत्पन्नाचे नवीन स्त्रोत मिळू शकतात.


**मकर :** स्वाभिमान अबाधित राहील. तुम्हाला खूप दिवसांपासून हरवलेले मित्र भेटतील. कौटुंबिक गरजांवर खर्च होईल. नोकरीत शांती राहील. तुम्हाला उत्साहवर्धक माहिती मिळेल.


**कुंभ :** तुम्हाला आधी केलेल्या कष्टाचे फळ मिळेल. प्रलंबित कामे पूर्ण होतील. नफा वाढेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. आनंद राहील.तुम्हाला सर्व बाजूंनी यश मिळेल.


**मीन :** तुम्हाला काही वाईट बातमी मिळू शकते. नकारात्मकता असेल. तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. व्यवहारात सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

महत्त्वाचे

## भद्रावती येथे महसूल सप्ताहाचा शुभारंभ

**भद्रावती:** राज्य शासनाच्या निर्देशानुसार, भद्रावती तहसील कार्यालयात १ ऑगस्ट रोजी 'महसूल दिना'निमित्त 'महसूल सप्ताहा'चा शुभारंभ करण्यात आला. आमदार करण देवतळे यांच्याहस्ते झालेल्या या कार्यक्रमात, महसूल विभागातील उत्कृष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार राजेश भांडारकर होते. त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात, १ ते ७ ऑगस्ट या सप्ताहात राबवण्यात येणाऱ्या विविध लोकाभिमुख कार्यक्रमांची माहिती दिली. महसूल दिनाचे औचित्य साधून, आमदार देवतळे यांच्याहस्ते विभागातील उत्कृष्ट कार्याबद्दल अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये मंडळ अधिकारी अनिल दडमल, समीर वाटेकर, सहायक महसूल अधिकारी गजानन ढोबळे, देवानंद गावंडे, प्रमोदिनी रामटेके यांचा समावेश होता. तसेच, ग्राम महसूल अधिकारी खुशाल मस्के, विनोद चिकटे, रवी तल्लार, श्रीकांत गिते, प्रतिक्षा लोखंडे, महसूल सहायक अमर श्रीरामे, समिक्षा पडगेलवार, शिपाई शांताबाई मानुसमारे आणि महसूल सेवक सुरज शेंडे यांनाही प्रशस्तीपत्र देण्यात आले.

## उपविभागीय अधिकारी कार्यालय अकोला येथे महसूल सप्ताहाचे आयोजन

**अकोला:**आज दिनांक २/८/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी अकोला यांचे कार्यालयात महसूल सप्ताह चे आयोजन केले होते .यामध्ये अकोला तालुक्यातील अतिक्रमण मधील २०११ पूर्वीचे लाभार्थ्यांचे अतिक्रमण नियमितकरणाचे आदेश आ. रणधीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली घरकुल लाभार्थ्यांना अतिक्रमण नियमाकूलचे गावठाण नियमाकुल आदेश पत्र देण्यात आले. तसेच संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना, राशन कार्ड विषयी समस्या आ. सावरकर यांनी मार्गदर्शन केले.लाभार्थ्यांच्या समस्याचे निराकरण केले. या ग्रामपंचायतीमध्ये येळवण, बोरगाव मंजू , सांगळूद बुद्रुक, नैराट मधील ग्रामपंचायत घरकुल लाभार्थ्याचे गावठाण आदेश पत्र देण्यात आले त्यामध्ये ग्रामपंचायत येळवण येथील छाया कोवे, कैलास राऊत, नंदू मोहिते, सुभाष गावंडे ,पवन शर्मा, गोपाल काळसरपे ग्रामपंचायत बोरगाव मंजू मधील अकबर अब्दुल खान ,निरात मधील विष्णुदास पांडुरंग परनाटे ग्रामपंचायत सांगळूद बुद्रुक गजानन भांडे या घरकुल लाभार्थ्यांना नियमाकुलचे आदेश पत्र देण्यात आले.

## अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**अकोला:** राष्ट्रीय चर्मकार महासंघ अकोला व बि.आर. सी.एफ.संघटना अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५वी जयंती दिनांक १/०८/२०२५ ला सायंकाळी ६ वाजता महारुद्र हनुमान मंदिर खेडकर नगर अकोला येथे साजरी करण्यात आली.या जयंती कार्यक्रमाला अध्यक्ष पांडुरंग वाडेकर व प्रमुख पाहुणे म्हणून मधुकर वानेडकर लाभले होते.प्रमुख वक्ते पी.जी.भामोदे पी.के.रेवास्कर ,राम शेगोकार ,आर.के.ताजने यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित प्रसंगावर व त्यांनी लिहिलेल्या साहित्यावर, काव्यांवर भरपुर व वैशिष्ट्यपूर्ण माहिती कार्यक्रमात दिली.या कार्यक्रमाला लक्ष्मण पदमने, महादेव पदमने, गोविंदा चोपडे, महेंद्र बोडखे, निरंजन गव्हाळे, के.टी.पदमने, विठ्ठल शेगोकार, गजानन काकडे,पी.के. शेकोकार, विष्णू वाडेकर,ढाकरे इत्यादी समाज बांधवांनी उपस्थिती दर्शविली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुसूदन गव्हाळे यांनी व आभारप्रदर्शन अरुण भटकर यांनी केले.

# यवतमाळमध्ये 'जोडे मारो' आंदोलन

## पृथ्वीराज चव्हाणांविरोधात भाजप आक्रमक; सनातन धर्माला आतंकवादी संबोधल्याचा आरोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २ : काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सनातन हिंदू धर्माविरोधात केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ, भाजप युवा मोर्चाने शुक्रवारी यवतमाळमध्ये जोडे मारो आंदोलन केले. संविधान चौकात झालेल्या या आंदोलनात, चव्हाणांच्या पुतळ्याला जोडे मारून त्यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यात आला.



माजी मंत्री मदन येरावार आणि भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल चव्हाण यांच्या सूचनेनुसार, भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने हे निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी भाजप जिल्हा महामंत्री राजू पडगीलवार, रेखा कोठेकर, शहर अध्यक्ष नितीन गिरी, योगेश पाटील, युवा मोर्चा प्रदेश सचिव सुरज गुप्ता, शंतनु शेटे, करुणा तेलंग, लता ठोंबरे, प्रगती सुपलकर, चिंतामण पायघन, सुजित राय, भारत ब्राह्मणकर, अश्विन बोपचे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुरज जैन, स्वप्निल उलंगवार, शुभम सरकाळे, अजिंक्य शिंदे, बंटी श्रीवास, जय चौधरी, रोहन यादव, प्रथमेश बत्तलवार, नयन गुप्ता, परिक्षीत आडे, अभिलाष जाधव, शुभम चिंतलवार, पूर्वेश उपासनी, मयूर लोखंडे, शुभम चोरमले, गौरव कदम, राहुल गर्जे, बंटी भोंग, यश चव्हाण, भाविन पतिरा, आकाश ठोंबरे, इरफान मलनस, मनीष सुपलकर, पवन शेरे, लक्ष्मीकांत लोळगे आणि रमेश अर्जापुरे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### काय आहे नेमका आरोप?

काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी बेजबाबदारपणे वक्तव्य करून सनातन हिंदू धर्माचा अपमान केल्याचा आरोप भाजप युवा मोर्चाने केला आहे. सर्वसमावेशक असलेल्या सनातन हिंदू धर्माला त्यांनी आतंकवादी म्हणून संबोधले, असे निवेदनात म्हटले आहे. अशा नेत्याचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे युवा मोर्चाने म्हटले आहे.

### संविधान चौकात पुतळ्याला जोडे

माजी मंत्री मदन येरावार आणि जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल चव्हाण यांच्या सूचनेनुसार, भाजप युवा मोर्चाचे कार्यकर्ते संविधान चौकात एकत्र आले. त्यांनी पृथ्वीराज चव्हाणांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर, चव्हाणांच्या पुतळ्याला जोडे मारून त्यांनी हिंदू धर्माचा अपमान केल्याबद्दल तीव्र निषेध व्यक्त केला. या आंदोलनात मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## भरधाव ऑटो उलटला; महिला ठार, सहा जखमी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

नांदगाव पेठ: , दि. २ : अमरावतीवरून नेर-पिंगळाईकडे प्रवासी घेऊन जाणाऱ्या ऑटो चालकाचा भरधाव वाहनावरील ताबा सुटल्याने ऑटो पलटी होऊन झालेल्या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर सहा प्रवासी जखमी झाल्याची घटना शनिवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास बोरगाव धर्माळे नजीक ड्रीमलँड समोर घडली. दीपाली दिनेश लंगडे (वय २५, रा. वडगाव माहोरे) असे घटनेतील ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. घटनेची हकीकत अशी की, एमएच २७ बीडब्ल्यू ९८५२ क्रमांकाच्या ऑटोमध्ये अमरावती वरून तीन प्रवासी घेऊन जात असताना वडगाव फाट्यावरून दीपाली लंगडे त्यांच्या दोन मुलींना घेऊन तसेच कमल दिगंबर थोरात व दीक्षा दिगंबर थोरात (रा. वडगाव माहोरे) पुढील प्रवासासाठी ऑटोने निघाले असतांना ड्रीमलँड नजीक चालकाचा भरधाव वाहनावरून ताबा सुटल्याने ऑटोचा अपघात होऊन ऑटो पलटी झाला. यामध्ये दीपाली लंगडे यांचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांच्या दोन लहान मुलींसह गोपाल बापूराव थोरात रा. रामपुरी कॅम्प अमरावती (६०),कमल थोरात, दीक्षा थोरात यांचेसह सहा प्रवासी जखमी झाले असून, काहींची प्रकृती गंभीर आहे.अपघातानंतर चालकाने घटनास्थळ सोडून पळ काढला. स्थानिक नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. नांदगाव पेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.शवविच्छेदनानंतर दीपाली लंगडे यांच्यावर सायंकाळी वडगाव मोहोरे येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडले.

## पारधी समाजाला मिळाली आपल्या हक्काच्या घरासाठी जागा



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अंढेरा दि. २ : स्थानिक अंढेरा येथील आदिवासी बांधवांचा गेल्या पंचवीस वर्षापासून प्रलंबित असलेला घरकुलाचा प्रश्न अखेर आमदार मनोज कायंदे यांच्या आग्रही मागणीमुळे व पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांच्या धडाकेबाज निर्णयाने सुटला असून आदिवासी बांधवांच्या घरकुलासाठी वन विभागातील जवळपास पाच एकर जमीन घरकुलांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अंढेरा येथे पारधी समाजाची लोकसंख्या जवळपास एक हजाराच्या वर असून जागेअभावी पारधी समाज बांधव हे घरकुला च्या लाभापासून वंचित राहत होते. पारधी समाज बांधव हे वन विभाग हद्दीत राहत आहेत त्यामुळे त्यांना अडचण येत होती. मागील २५ वर्षांपासून पारधी समाज बांधव आग्रहाने घरकुला साठी वनविभागाकडे चकरा मारत होते व अनेक पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून सरकारकडे आपली दाद मागत होते. पण आज पर्यंत ते आपल्या हक्काच्या घरापासून वंचित होते. नेमकी हीच अडचण भगवान मुंढे व प्रा. दिलीप सानप यांनी आ. मनोज कायंदे यांचे कडे मांडली. मागील महिन्यात पालकमंत्री मकरंद आबा पाटील हे जिल्ह्यात आले, तेव्हा आ.मनोज कायंदे यांनी हा घरांचा प्रश्न मार्गी लावावा अशी विनंती पालकमंत्री यांचे कडे केली. तेव्हा ना.पाटील यांनीही अंढेरा येथे पारधी पाड्यावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली व सर्व कायदेशीर सोपस्कार बाजूला ठेवून तात्काळ पारधी समाज बांधवास जागा उपलब्ध करून द्यावी.. असे संबधित विभागास आदेश दिले.१ ऑगस्ट ला महसूल दिनी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत ना. पाटील यांनी निर्णय घेऊन मंजुरी आदेशाची प्रतच यावेळी भगवानराव मुंढे, प्रा.दिलीप सानप, सुनील पवार, मल्हारी भोसले व गावकरी यांचे कडे सुपूर्द करण्यात आली. आ. मनोज कायंदे यांचे सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश आले.सरकारी हद्दीतील गट न.१३ मधील १. हे ८१ आर. जमीन जिल्हाधिकारी यांचे आदेशाने घरकुला साठी मिळाली. यावेळी सर्व पारधी समाजाने ना.मकरंद पाटील व आ.मनोज कायंदे यांचे आभार मानले.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात ना. मकरंदआबा पाटील, आ. मनोज कायंदे, आ. संजय गायकवाड,आ. सिद्धार्थ खरात, उपविभागीय अधिकारी सि.राजा, तहसीलदार दे. राजा, भगवान मुंढे, प्रा. दिलीप सानप, नितीन कायंदे, गजानन काकड, दिपक चेके सुनील पवार, उदरू भोसले, मल्हारी भोसले यांचे सह पारधी समाज बांधव उपस्थित होते.

## कष्टकऱ्यांच्या संवेदनेतून अण्णाभाऊंचे साहित्य अजरामर- डॉ.पुरुषोत्तम देवकर

### लोकशाहीर अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त सामाजिक संघटनांचे चर्चासत्र

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



बुलढाणा:दि. २ :लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरी आणि साहित्यातून कामगार कष्टकऱ्यांमध्ये नवचैतन्य आणि लढण्याचे सामर्थ्य निर्माण झाले. जेमतेम चौथीपर्यंत शिक्षण घेतलेल्या अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या पस्तीस कादंबऱ्यामुळे आणि कार्यामुळे अण्णाभाऊ आजही अजरामर आहेत. कष्टकरी कामगार आणि जनसामान्यांच्या व्यथा आणि वेदनेतून साकारलेलं अण्णाभाऊंचं साहित्य सदैव प्रेरणादायी राहील.असा आशावाद यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे नेते डॉ.पुरुषोत्तम देवकर यांनी व्यक्त केला. स्थानिक जांभरून रोड, राऊत कॉम्प्लेक्स बुलढाणा येथील आझाद हिंदच्या संपर्क कार्यालयात लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या अनुषंगाने विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमानातून चर्चासत्र आणि अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन एक ऑगस्टला सायंकाळी करण्यात आले होते.यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून देवकर यांनी उपरोक्त मत व्यक्त केले. शाहीर परिषदेच्या जिल्हाध्यक्ष सिंधुताई अहेर यांच्या अध्यक्षतेत तर प्रबोधनकार ॲड.सतीशचंद्र रोठे पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नारायणराव भाकडे, संजय राका,रमाई ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सुरेखाताई निकाळजे,भारतीताई अवचार, राष्ट्रीय बजरंग दलाचे प्रांत उपाध्यक्ष भूपेश पाटील, जिल्हाध्यक्ष सुशांत पाटील,आझाद हिंद महिला संघटनेच्या अध्यक्ष आशाताई गायकवाड,पंचफुलाबाई गवई,ग्राम स्वराज्य समितीचे कमलाकर व्यवहारे,राम व्यवहारे, उल्हास काकर पाटील, निलेश ढकचवळे, महानायक विचार मंचचे योगेश तायडे, नितीन गवई,समर्थ तायडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व पुष्पांजली समर्पित करून चर्चासत्राला सुरुवात करण्यात आली. विचार पिठावर उपस्थित मान्यवरांनी चर्चासत्रामध्ये सहभाग घेत लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. प्रस्ताविक विशाल राणे यांनी केले.संचालन ॲड.प्रतीक देखणे यांनी तर आभार प्रदर्शन संजय येंडोले यांनी व्यक्त केले.

### सामाजिक संघटनांचे संयुक्त आयोजन

आझाद हिंद शेतकरी संघटना, किसान ब्रिगेड, रमाई ब्रिगेड, मातृतीर्थ रणरागिणी संघटना,राष्ट्रीय बजरंग दल, शाहीर परिषद, महानायक विचारमंच, छत्रपती स्वराज्य आदी संघटनांच्या संयुक्त विद्यमानातून आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चर्चासत्राचे आणि अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.यशस्वीतेसाठी आयोजक संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने चर्चासत्राची सांगता करण्यात आली.

## नागभीड तालुक्यात महसूल सप्ताहाचा शुभारंभ

### आमदार बंटी भांगडिया यांच्याहस्ते उद्घाटन




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

नागभीड:दि. २ : राज्य शासनाच्या निर्देशानुसार, नागभीड तालुक्यात १ ते ७ ऑगस्ट दरम्यान साजऱ्या होणाऱ्या 'महसूल सप्ताहा'चा शुभारंभ शुक्रवारी (दि. १) आमदार कीर्तिकुमार ऊर्फ बंटी भांगडीया यांच्याहस्ते करण्यात आला. या सप्ताहात 'तलाठी डिजिटल डायरी' आणि 'डिजिटल पंचनामा' यांसारखे अनेक अभिनव उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

नागभीड तहसील कार्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, तहसीलदार प्रताप वाघमारे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, कर्मचारी आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा महसूल सप्ताह जनतेसाठी फायदेशीर असून, सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार बंटी भांगडीया यांनी केले. त्यांनी तालुका प्रशासनाच्या अभिनव उपक्रमांचे कौतुकही केले. प्रास्ताविकात तहसीलदार प्रताप वाघमारे यांनी सांगितले की, या सप्ताहात तलाठी डिजिटल डायरी, डिजिटल पंचनामा, कर्मचाऱ्यांसाठी 'रेटिंग सिस्टीम' आणि 'भूमी साक्षरता अभियान' यांसारखे उपक्रम राबवले जातील. तसेच, दर शुक्रवारी सरपंच व पोलिस पाटलांशी व्हर्च्युअल संवाद साधला जाणार आहे. यावेळी लक्ष्मीमुक्ती, शिधापत्रिका, नैसर्गिक आपत्ती अनुदान आणि सामाजिक अर्थसहाय्य यांसह विविध योजनांच्या लाभाचे वितरण मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मंडळ अधिकारी बोड्डावार यांनी केले.

## 'ग्राम बाल संरक्षण' समिती कार्यशाळा संपन्न



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला :दि. २ :महिला व बालविकास विभाग महात्मा गांधी प्रशिक्षण संस्था व महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था पुणेयांचे संयुक्त विदयमाने अकोला तालुक्यातील निवडक गावतील अंगणवाडी सेवीका, ग्रामसेवक, शाळांचे मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, पोलीस पाटील यांची बाल संरक्षण विषयावरील कार्यशाळा दि.०१/०८/२०२५ रोजी संपन्न झाली कार्यशाळेला उदघाटक म्हणुन श्रीमती राजश्री कौलखेडे जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालकल्याण जि.प. अकोला तसेच महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षणआयोगाचे माजी सदस्य ॲड. संजयची सेंगर लाभले होते प्रमुख अतिथी म्हणुन ॲड. अनिता गुरव अध्यक्ष बाल कल्याण समिती, व सदस्य प्रांजली जैस्वाल, श्री. राजेश देशमुख, ॲड. शिला तोष्णीवाल तसेच ॲड.सारीका धिरणीकर सदस्य बाल न्याय मंडळ, होते. प्रमुख प्रशिक्षक ॲड. संजय सेंगर, श्री. अनिल राउत, श्री.चक्रनारायण हे होते.

ॲड. संजय सेंगर यांनी हसत खेळत सोप्या भाषेत सर्वांना समजेल अशा शब्दात बाललैंगीक अत्याचार अधिनीयम २०१२ व बालविवाह अधिनीयम २००६, जे. जे. ॲक्ट २०१५, मानवीतस्करी, दत्तक विधान या बाबत प्रशिक्षण दिले. अशोक जाधव वैदयकीय सामाजीक कार्यकर्ता आरोग्य व कर्मचारी यावर संवाद साधला जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालय अकोलाचे . जे. बी.अवघड यांनी तंबाखूचे दुष्परीणाम व मानवी स्वास्थ या कर माहीती दिली तर यशदाचे प्रविण प्रशिक्षक संतोश चकनारायण यांनी प्रशिक्षणार्थीना बालस्नेही ग्रामपंचायत, सक्षम बालक, बालकांचे हक्क व सुरक्षीतताया बाबत विषयाची मांडणी केली त्याच प्रमाणे श्री. अनिल राउत यांनी बालभिक्षेकरी, व्यसनमुक्ती, बालमजुरीयाबाबत प्रशिक्षण दिले. कार्यशाळेचे प्रास्तावीक श्री. गिरीश नुसदकर जिल्हा महिला व बालविकास अधिकारीअकोला यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्तावीका मध्ये कार्यशाळा घेण्यामागचा हेतु, उदेश या बाबत माहीतीदिली कार्यशाळेचे सुत्रसंचालन श्री. राजु लाडुलकर जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांनी केले तर आभारप्रदर्शन ॲसेस टु जस्टीस प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक श्री. शंकर वाघमारे यांनी केले सदरची कार्यशाळायशस्वी करण्याकरीता जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड लाईन, सखी वन स्टॉप सेंटर, ॲसेस टु.जस्टीसप्रकल्प अकोला, सुखाय फाउंडेशन, रेल्वे चाईल्ड लाईन येथील अधिकारी व कर्मचारी यांनी प्रयत्न केले

उपक्रम

निमगाव गुरु येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

# लाडक्या बहिणींना योगेश जाधव यांच्या हस्ते साडींचे वाटप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



अंढेरा दि. २ : थोर समाजसुधारक,वंचिताचा संघर्ष मांडणारी क्रांतीकारी लेखणी, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील बुलंद आवाज, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती निमगाव गुरु येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.निमगाव गुरु येथे शिवसेनेचे अनिल चित्ते बहुजन एकता फाउंडेशन ग्रुप देऊळगाव राजा यांच्या वतीने भव्य कार्यक्रमांचे आयोजन येथील समाज मंदिर येथे करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाई विकास गवई तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय मंत्री खासदार प्रतापराव जाधव यांचे पुतणे सिंदखेडराजा मतदार संघाच्या नेहमी सुख दुःखात सहभागी असणारे युवा नेते योगेश भाऊ जाधव होते. तसेच प्रमुख उपस्थिती मध्ये मा.जि.प.सदस्य डी.टी.शिंपणे, सामाजिक कार्यकर्ते अनिल चित्ते पाटील, समाधान काकड, सरपंच भिकाजी निलंख होते.

कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे विधीवत पुजन करुन सर्वांनी विनम्र अभिवादन केले.

> अण्णा भाऊ साठे यांच्या कार्यक्रमांला उपस्थित असलेल्या सर्व लाडक्या बहिनीनां अनिल चित्ते बहुजन एकता फाउंडेशन ग्रुप देऊळगाव राजा यांच्या वतीने योगेश भाऊ जाधव तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व गोरं गरीब लाडक्या बहिनीना साडीचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले युवा नेते योगेश भाऊ जाधव यांनी लोकशाही अण्णाभाऊ साठे यांचा संघर्ष डोळ्यासमोर ठेवून काम करा. अवघ्या दीड दिवस शाळेत गेलेले अण्णाभाऊ साठे साता - समुद्र पार जाऊन रशिया मध्ये जर छत्रपती शिवाजी महाराजांचे पोवाडे गाऊन असंख्य ग्रंथ लिहिले आणि साहित्यरत्न साहित्यसम्राट झाले.सर्व सामान्य जनतेसाठी काम करण्याची त्यांची प्रबळ इच्छाशक्ती होती. तिच इच्छा असली तर माणसाला कोणत्याही पदाची गरज लागत नाही.सामान्य जनसेवक आणि शिवसैनिक म्हणून काम करा असे यावेळी योगेश भाऊ जाधव यांनी सांगितले.

महत्त्वाचे

## जो रूटने सचिन तेंडुलकरला टाकले मागे



**नवी दिल्ली:** इंग्लंडचा सर्वात अनुभवी कसोटी फलंदाज जो रूट एकामागून एक मोठे विक्रमी आपल्या नावे करत आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील ओव्हल कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी रूटने सचिन तेंडुलकरला एका खास यादीत मागे टाकण्यात यश मिळवले. कसोटी क्रिकेटमध्ये घरच्या मैदानावर सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत रूट आता दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. याशिवाय त्याने अजून एक विक्रम आपल्या नावे केला आहे.जो रूट मोहम्मद सिराजच्या वेगवान चेंडूवर पायचीत झाला. यासह रूट २९ धावा करत बाद झाला.

## वेस्ट झोनच्या कर्णधारपदी शार्दुल ठाकूरची वर्णी!



बीसीसीआयने दुलीप ट्रॉफी २०२५ च्या वेळापत्रकाची घोषणा केल्यानंतर आता संघांच्या कर्णधार आणि खेळाडूंची नावे जाहीर होत आहेत. यंदाही पारंपरिक पद्धतीप्रमाणे चार झोनच्या संघांमध्ये ही स्पर्धा खेळली जाणार आहे. ताज्या घडामोडींनुसार, वेस्ट झोनच्या संघाची घोषणा झाली असून, शार्दुल ठाकूरला संघाचे कर्णधारपद देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, अनुभवी खेळाडू अजिंक्य रहाणे आणि चेतेश्वर पुजारा यांना या संघात स्थान मिळालेले नाही, जे एक मोठे संकेत मानले जात आहे.वेस्ट झोनच्या संघात शार्दुल ठाकूरच्या कर्णधारपदाखाली यशस्वी जैस्वाल, श्रेयस अय्यर, सर्फराझ खान, ऋतुराज गायकवाड आणि तुषार देशपांडे यांचा समावेश आहे. मात्र, अजिंक्य रहाणे आणि चेतेश्वर पुजारा यांना संघात स्थान न मिळाल्याने त्यांच्यासाठी दुलीप ट्रॉफीचे दरवाजे सध्या बंद झाल्याचे दिसते.

### यूएईमध्ये होणार सामने | अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि युएई संघामध्ये खेळविली जाणार मालिका

# आशिया कपपूर्वी तीन देशांमध्ये होणार ट्राय सिरीज

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

भारताचा संघ सध्या इंग्लडविरुद्ध कसोटी मालिका खेळत आहे, टीम इंडीयाचा आता शेवटचा सामना शिल्लक आहे. भारताच्या संघाने या मालिकेमध्ये १ सामना जिंकला आहे त्यामुळे भारताच्या संघाला या मालिकेचा शेवटचा सामना जिंकणे गरजेचे आहे. भारताचा संघ इंग्लड दौऱ्यानंतर आशिया कप २०२५ खेळणार आहे. त्याआधी आशिया कपमध्ये खेळणारे तीन संघ हे ट्राय सिरीज खेळताना दिसणार आहेत. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने युएईमध्ये होणाऱ्या टी तिरंगी मालिकेला मान्यता दिली आहे.बोर्डाने या टी तिरंगी मालिकेत सहभागी होण्याची पुष्टी केली आहे. अफगाणिस्तान व्यतिरिक्त, त्यात पाकिस्तान आणि युएईचा समावेश आहे. हे तिन्ही संघ गट टप्प्यातील सहा सामन्यांमध्ये एकमेकांसमोर येतील. गट टप्प्यातील अव्वल दोन संघांमध्ये अंतिम सामना खेळवला जाईल. टी-२० त्रिकोणी मालिका २९ ऑगस्टपासून सुरू होईल आणि अंतिम सामना ७ सप्टेंबर २०२५ रोजी खेळवला जाईल. ही मालिका तिन्ही संघांना ९ सप्टेंबरपासून यूएईमध्ये खेळल्या जाणाऱ्या आशिया कपच्या तयारीसाठी मदत करेल.



टी-२० त्रिकोणी मालिकेतील सर्व सामने शारजाहमध्ये खेळवले जातील. तिन्ही संघांनी यासाठी तयारी सुरू केली आहे. सध्या पाकिस्तान वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. जिथे ते तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. पहिला सामना जिंकून पाकिस्तानने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.आशिया कप ९ सप्टेंबरपासून खेळला जाईल हे लक्षात घेण्यासारखे आहे की आशिया कप ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान संयुक्त अरब अमिराती () मध्ये होणार आहे. ८ संघ जेतेपदासाठी स्पर्धा करतील. भारताने आयोजित केलेल्या या स्पर्धेत १४ सप्टेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना पाहता येईल.

# केएल राहुल इंग्लंडमध्ये चमकला!



नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

अँडरसन तेंडुलकर मालिका ही भारताचा सलामीवीर फलंदाज केएल राहुलसाठी अतिशय खास ठरली. विराट रोहितने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केल्यानंतर केएल राहुल हा भारतीय संघातील सर्वात अनुभवी खेळाडू होता. त्यामुळे त्याच्यावर मोठी जबाबदारी होती. ही जबाबदारी त्याने योग्यरित्या पार पाडली. संघ अडचणीत असताना तो खंबीरपणे उभा राहिला. यादरम्यान त्याच्याकडे सुनील गावसकरांचा एक मोठा विक्रम मोडून काढण्याची संधी होती. पण हा विक्रम अवघ्या ११ धावांनी हुकला.

केएल राहुल हा भारतीय संघातील सर्वात विश्वासू खेळाडू. ज्या क्रमांकावर आवश्यकता असेल त्या क्रमांकावर तो फलंदाजीला उतरतो. इंग्लंड दौऱ्यावर त्याला यशस्वी जैस्वालसोबत डावाची सुरूवात करण्याची संधी मिळाली. या संधीचा फायदा घेत त्याने २ शतकं आणि २ अर्धशतकं झळकावली.

इंग्लंड दौऱ्यावरील ५ कसोटी सामन्यांतील १० डावात फलंदाजी करताना त्याने ५३.२० च्या सरासरीने ५३२ धावा केल्या. मुख्य बाब म्हणजे त्याने १०६६ चेंडू खेळून काढले. त्याच्याकडे सुनील गावसकरांचा मोठा विक्रम मोडून काढण्याची संधी होती.इंग्लंडमध्ये कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करणाऱ्या आशियातील सलामीवीर फलंदाजाचा विक्रम हा सुनील गावसकरांच्या नावावर आहे.

सुनील गावसकर यांनी १९७९ मध्ये फलंदाजी करताना ५४२ धावा केल्या होत्या. आता २०२५ कसोटी मालिकेत केएल राहुलने ५३२ धावा केल्या आहेत. जर आणखी ११ धावा केल्या असत्या तर त्याने हा मोठा विक्रम मोडून काढला असता. पाकिस्तानचा आमीर सोहेल या यादीत तिसऱ्या स्थानी आहे. त्याने १९९२ मध्ये ४१३ धावा केल्या होत्या. तर मुरली विजयने २०१४ मध्ये ४०२ धावा केल्या होत्या. २०२१ मध्ये फलंदाजी करताना रोहित शर्माने ३६८ धावा केल्या होत्या.

## रोहित पोहोचला कसोटी पाहण्यासाठी

**नवी दिल्ली :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचवा कसोटी सामना ओव्हलच्या मैदानावर खेळवला जात आहे. तिसऱ्या दिवसाचा खेळ सुरू असून भारतीय संघ सध्या दुसऱ्या डावात फलंदाजी करत आहे. यादरम्यान नाईट वॉचमन म्हणून आलेल्या आकाशदीपने अर्धशतक झळकावलं आहे, तर यशस्वी शतकाच्या जवळ आहे. पण आता हा सामना पाहण्यासाठी भारताचा माजी कसोटी कर्णधार रोहित शर्मा ओव्हलच्या मैदानात पोहोचला आहे.भारतीय कसोटी संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा हा सामना पाहण्यासाठी ओव्हलमध्ये पोहोचला. स्टेडियममध्ये प्रवेश करताना तो गेटवर कॅमेऱ्यात कैद झाला.

## ईशान किशन बनला कर्णधार!

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

दुलीप ट्रॉफी २०२५ स्पर्धेला येत्या २८ ऑगस्टपासून सुरूवात होणार आहे. तर या स्पर्धेतील अंतिम सामना ११ सप्टेंबरला खेळवला जाईल. ही स्पर्धा पुन्हा एकदा आधीसारख्या फॉरमॅटमध्ये खेळवली जाणार आहे. या स्पर्धेत ४ संघ खेळताना दिसतील. ही स्पर्धा कसोटी फॉरमॅटमध्ये खेळवली जाणार आहे. शुक्रवारी या स्पर्धेसाठी ईस्ट झोन संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी यष्टीरक्षक फलंदाज इशान किशनकडे सोपवण्यात आली आहे.सध्या भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील चौथ्या सामन्यात ऋषभ पंत दुखापतग्रस्त झाला होता. त्यामुळे त्याची जागा भरून काढण्यासाठी इशान किशनला संपर्क केला गेला होता. पण तो दुखापतग्रस्त असल्याचं म्हटलं गेलं होतं. त्यामुळे ऋषभ पंतच्या जागी एन जगदीशनला संधी दिली गेली होती.



## अनाया बांगर हिची धडाकेबाज फटकेबाजी



नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

अनया बांगर हे नाव गेल्या सहा-आठ महिन्यांत खूप चर्चेत आलं. या नावामागचे कारण म्हणजे, भारतीय संघाचे माजी क्रिकेटपटू आणि समालोचक संजय बांगर यांचा मुलगा आर्यन बांगर हा लिंगबदल शस्त्रक्रिया करून मुलगी झाली. तिने अनया बांगर अशी नवी ओळख घेतली. आर्यन असताना ती लहानपणापासून क्रिकेट खेळायची. तिला हा खेळ तिचे वडील संजय बांगर यांच्याकडून शिकायला मिळाला. त्यामुळे मुलगा ते मुलगी हा प्रवास केल्यानंतर तिचे क्रिकेटवरील प्रेम कमी झालेले नाही. आजही ती जेव्हा बॅट हातात घेते, तेव्हा ती धुवाँधार फलंदाजी करताना दिसते.डावखुरी फलंदाज अनाया बांगर हिने नुकताच एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. तिचा व्हिडिओ तिने तिच्या इंस्टाग्रामवर शेअर केला आहे. अनाया बांगर यात अतिशय स्फोटक फलंदाजी करताना दिसते. ती आपल्या फलंदाजीचा सराव करतानाही दमदार फलंदाजी करताना दिसते. तिने शेअर केलेल्या व्हिडिओनुसार, अनाया एकूण ७ चेंडूंचा सामना करते. त्यापैकी ६ चेंडूंवर दमदार शॉट्स मारण्यात ती यशस्वी होते. अनाया बांगरच्या फलंदाजीत कव्हर ड्राइव्ह, स्ट्रेट ड्राइव्ह आणि पुल शॉट अशी एकाहून एक अप्रतिम फटकेबाजी दिसून येते.दरम्यान, अनाया बांगरने आणि कडे एक विशेष मागणी केली आहे. ही मागणी ट्रान्सजेंडर महिलांबद्दल आहे. उघडपणे आपली ओळख सांगणाऱ्या ट्रान्सजेंडर खेळाडू अनायाने क्रिकेटमधील समावेश आणि निष्पक्षतेबाबत मागणी केली आहे. तिने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला ट्रान्सजेंडर महिलांसाठी धोरणे तयार करण्याचे आवाहन केले आहे.

## भारताची अर्थव्यवस्था मुळीच मृतप्राय नाही -पियुष गोयल



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणतात त्याप्रमाणे भारताची अर्थव्यवस्था मुळीच मृतप्राय झालेली नाही. सध्या भारत जगातील पहिल्या पाच अर्थव्यवस्था स्वाभिमानाने उभा आहे. लवकरच भारताची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकाची होणार आहे, असे स्पष्टीकरण केंद्रीय उद्योग व वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी केले आहे. अमेरिकेने लावलेल्या २५% आयात शुल्काचा भारतावर किमान परिणाम होईल या दृष्टिकोनातून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचबरोबर अमेरिकेशी व्यापार कराराबाबत चर्चा करताना भारत राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.ट्रम्प यांच्या निर्णयावर संसदेत भाष्य करताना गोयल यांनी सांगितले की, भारत सरकार देशातील शेतकरी निर्यातदर, लघुउद्योजक आणि उद्योजकांच्या संघटनांची यासंदर्भात चर्चा करीत आहे.

# देशात महाराष्ट्र राज्यच नंबर १

### महाराष्ट्रातून ३०,५९० कोटी रुपयांचे जीएसटी संकलन




नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

देशाच्या वस्तू आणि सेवा करात (जीएसटी) महाराष्ट्राचे सर्वाधिक योगदान राहिले आहे. एकट्या महाराष्ट्रातून जुलैमध्ये ३०,५९० कोटी रुपयांचे जीएसटी संकलन झाले आहे, जे मागील वर्षाच्या तुलनेत ६ टक्क्यांनी अधिक आहे. तर सरलेल्या जुलै महिन्यात देशाचे वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलन १.९६ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे, जे मागील वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत ७.५ टक्क्यांनी अधिक आहे. देशांतर्गत व्यवहार आणि आयातीतून मिळणाऱ्या महसुलात वाढ झाल्याने ही वाढ झाली, जी स्थिर आर्थिक क्रियाकलाप दर्शवते आहे. मात्र वाढीचा वेग अलिकडच्या महिन्यांपेक्षा कमी नोंदवला गेला.या वर्षी एप्रिल ते जुलै दरम्यान, एकूण जीएसटी महसूल ८.१८ लाख कोटी रुपयांवर पोहोचला. जो २०२४ च्या याच कालावधीतील ७.३९ लाख कोटी रुपयांवरून १०.७ टक्क्यांनी वाढला आहे. जुलैमध्ये, एकूण एकूण जीएसटी संकलनात केंद्रीय जीएसटीमधून ३५,४७० कोटी रुपये, राज्य जीटीमधून ४४,०५९ कोटी रुपये, एकात्मिक जीएसटीमधून १,०३,५३६ कोटी रुपये (आयातीतून ५१,६२६ कोटी रुपये) आणि उपकरातून १२,६७० कोटी रुपये (आयातीतून १,०८६ कोटी रुपये) प्राप्त झाले आहे.

## जूनमध्ये सेवा निर्यातीत १२ टक्के वाढ

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

सरलेल्या जून महिन्यात भारताच्या सेवा क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय व्यापारात लक्षणीय वाढ दिसून आली. निर्यात आणि आयात दोन्हीमध्ये वार्षिक आधारावर वाढ झाल्याचे रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीवरून शुक्रवारी स्पष्ट झाले.

जून २०२५ मध्ये सेवा निर्यातीचे मूल्य (प्राप्ती) ३२.११ अब्ज अमेरिकी डॉलर नोंदविले गेले. जे मागील वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत १२ टक्क्यांची वाढ दर्शवते. दरम्यान, सेवा आयात १५.९० अब्ज अमेरिकी डॉलरवर पोहोचली आहे, जी जून २०२४ च्या तुलनेत ५ टक्क्यांनी वाढली आहे.जूनच्या आकडेवारीवरून, देशाच्या सेवा निर्यात उत्पन्नाचा कणा असलेल्या विशेषतः माहिती-तंत्रज्ञान (आयटी), व्यवसाय आणि वित्तीय सेवांमध्ये दमदार वाढ झाली आहे. एप्रिल आणि मे २०२५ या दोन महिन्यांच्या कालावधीत, सेवा निर्यात अनुक्रमे ३२.८४ अब्ज डॉलर आणि ३२.४५ अब्ज डॉलर इतकी नोंदवली गेली होती. ज्यामध्ये वार्षिक तुलनेत अनुक्रमे ८.८ टक्के आणि ९.६ टक्के वाढ नोंदवली होती. आयातीच्या बाबतीत, जूनमध्ये वाढीचा वेग किंचित वाढला. मे २०२५ मध्ये आयात १.१ टक्क्यांनी कमी झाली असली, तरी जूनमध्ये ती ५ टक्क्यांनी वाढली जी परदेशी व्यावसायिक आणि तांत्रिक सेवांच्या मागणीत वाढ होण्याची शक्यता दर्शवते.



जपानलाही टाकले मागे | ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांची माहिती

# सौरऊर्जा निर्मितीत भारत बनला जगातील तिसरा सर्वात मोठा देश

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

गेल्या काही वर्षांपासून भारत हा देश विविध क्षेत्रात प्रगती करताना दिसत आहे. त्यात सौर ऊर्जा निर्मितीतही भारताचे एक पाऊल पुढेच आहे. सौरऊर्जा उत्पादनात भारत जपानला मागे टाकत तिसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी गुरुवारी ही माहिती दिली. या मोठ्या यशानंतर भारताचा जागतिक स्तरावरील मान वाढला आहे. केंद्रीयमंत्री प्रल्हाद जोशी यांनी आंतरराष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा एजन्सी () च्या आकडेवारीचा हवाला दिला आहे. त्यामध्ये त्यांनी माहिती दिली. भारताने १,०८,४९४ गिगावॅट तास सौरऊर्जा उत्पादन केली आहे, तर जपानने ९६,४५९ गिगावॅट तास सौरऊर्जा उत्पादन केली आहे. या आकडेवारीनुसार, भारताने जपानला मागे टाकल्याचे दिसून येत आहे. आयआरईएनए ही ऊर्जा परिवर्तनासाठी एक जागतिक संस्था आहे, जी आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करते. ती देशांना त्यांच्या ऊर्जा प्रक्रिया परिवर्तनात मदत करते. याशिवाय, ते तंत्रज्ञान, नवोपक्रम, धोरण, वित्त आणि गुंतवणुकीवरील डेटासह विश्लेषण देखील प्रदान करते. केंद्रीय मंत्री जोशी यांनी '' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरही माहिती पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी सौरऊर्जा उत्पादनात भारताने जपानला मागे टाकले आहे.



भारताने १,०८,४९४ गिगावॅट तास सौरऊर्जा उत्पादन केले तर जपानचे उत्पादन ९६,४५९ गिगावॅट तास आहे. भारत आता जगातील तिसरा सर्वात मोठा सौरऊर्जा उत्पादक देश बनला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे, भारत जागतिक स्वच्छ ऊर्जा क्रांतीमध्ये आघाडीची भूमिका बजावत आहे, असे ते म्हणाले.

# हवामान बदलात नारळ शेतीच पर्याय

## विदर्भ इंडस्ट्रिज असोसिएशनतर्फे कार्यशाळा, नारळ पिकाची लागवड करण्यासंदर्भात चिंतन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २ : हवामान बदल, पीक पद्धती आणि शेतीतून दीर्घकाळ मिळणारे उत्पन्न लक्षात घेता विदर्भातील शेतकऱ्यांसाठी नारळ शेती एक शाश्वत व्यवसाय ठरू शकते, असे मत नारळ विकास मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. बी. हनुमंथे गौडा यांनी व्यक्त केले. ते विदर्भ इंडस्ट्रिज असोसिएशनअंतर्गत कृषी ग्रामीण विकास आणि अन्न प्रक्रिया फोरम आयोजित 'नारळ शेती आणि प्रक्रियेच्या शक्यता' या विषयावरील कार्यशाळेत बोलत होते.**



व्हीआयएचे उपाध्यक्ष सी.ए. नरेश जाखोटिया, व्हीआयए अंतर्गत कृषी ग्रामीण विकास आणि अन्न प्रक्रिया फोरमचे अध्यक्ष ओम जाजोदिया यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. डॉ. गौडा म्हणाले, की नारळाच्या शेतीसाठी विदर्भ हा अपारंपरिक भाग असला तरी, आता तो आमच्या लक्ष्यामध्ये आहे. आम्ही विदर्भातील शेतकऱ्यांना मदत, प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करण्यासाठी हातभार लावण्यात येईल. यात योग्य रोपे, आधुनिक शेती व्यवस्थापन पद्धती, तसेच नारळाच्या प्रक्रियेतील मूल्यवर्धन आणि उत्पादन विविधीकरणासाठी पुरेशी प्रोत्साहनपर मदत दिली जाईल.

**विविध जाती**

नारळ विकास मंडळाच्या महाराष्ट्र राज्य केंद्राचे उपसंचालक बी. चिन्नराज यांनी त्रिपुरासारख्या इतर अपारंपरिक भागांतील यशोगाथा सांगितल्या. विदर्भासाठी पश्चिम किनारपट्टीवरील उंच जाती आणि बनवळी उंच यासारख्या देशी उंच जाती, तसेच मलायन ग्रीन ड्वार्फ आणि गंगा बोदम यांसारख्या बुटक्या जातींची लागवड करण्याची शिफारस केली. उंच जाती पर-परागित, तर बुटक्या जाती स्व-परागित असतात. त्यांनी विदर्भासारख्या अपारंपरिक भागांसाठी लागू असलेल्या योजना आणि प्रोत्साहनांबद्दल सविस्तर माहिती दिली.

**मूल्यवर्धित उत्पादने**

नारळ विकास मंडळाने नारळाच्या बागेत पेरू, संत्रा, मोसंबी, सीताफळ, चिकू यांसारखी स्थानिक फळे आणि भाजीपाला आंतरपीक म्हणून घेण्याचा सल्ला दिला. नारळ विकास मंडळाचे तांत्रिक अधिकारी पी. विपिन यांनी विदर्भात शक्य असलेल्या मूल्यवर्धित उत्पादनांची माहिती दिली. यात सौंदर्यप्रसाधनांसाठी कोल्ड-प्रेस्ड/व्हर्जिन कोकोनट ऑईल, कोकोनट व्हिनेगर, कोकोनट क्रीम, स्प्रे-ड्राईड कोकोनट मिल्क पावडर, कोकोनट चिप्स, डेसिकेकेटेड कोकोनट, कोकोनट शेल पावडर यासह अन्य उत्पादनांचा समावेश आहे.

### शासकीय मदतीची ग्वाही

**उपसंचालक पल्लवी तलमले यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने विदर्भातील नारळ शेतीला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.यावेळी आर. बी. गोएंका, प्रवीण ठाकरे, संजय धुंदे या यशस्वी शेतकऱ्यांनी आपले अनुभव सादर केले आणि पुढील प्रगतीसाठी नारळ विकास मंडळाकडे आर्थिक सहाय्याचे आवाहन केले. व्हीआयए कृषी फोरमच्या निमंत्रक सांची मलिक यांनी संचालन केले. रिना साहा यांनी पाहुण्यांचा परिचय सादर केला. प्रकल्प संचालक कपिल चरण साहू यांनी आभार मानले. कार्यक्रमाला माही ग्रुपने सहकार्य केले. कार्यक्रमात लक्ष्मीकांत पडोळे, संजय सिन्हा, डॉ. कीर्ती सिरोठिया आणि नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, यवतमाळ येथील शेतकरी उपस्थित होते.**

# धोबी-परीट समाजाला लवकरच आरक्षण

## डी. डी. सोनटक्के यांच्या शिष्टमंडळाने घेतली सामाजिक न्यायमंत्र्यांची भेट



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि.2: धोबी-परीट समाजाला अनुसूचित जाती प्रवर्गात पूर्ववत समाविष्ट करण्याच्या मागणीला बळकटी देणारा 'बार्टी'चा सकारात्मक अहवाल राज्य सरकारने केंद्राकडे तत्काळ पाठवावा, या मागणीसाठी आज, शनिवारी (दि. 2) डी. डी. सोनटक्के यांच्या नेतृत्वातील एका शिष्टमंडळाने राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांची भेट घेतली. यावेळी शिरसाट यांनी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांना तत्काळ निर्देश दिल्याने आरक्षणाचा मार्ग मोकळा होण्याची आशा निर्माण झाली आहे.**

केंद्र सरकारने धोबी-परीट समाजाच्या आरक्षणासंदर्भात राज्य सरकारकडून अधिक माहिती मागवली होती. त्यानुसार, राज्याने ही जबाबदारी पुण्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडे (बार्टी) सोपवली होती.

### 'बार्टी'चा सकारात्मक अहवाल केंद्राकडे पाठवण्याची मागणी

धोबी-परीट समाज आरक्षण कृती समितीचे अध्यक्ष डी. डी. सोनटक्के यांच्या नेतृत्वाखालील आरक्षण समन्वय समितीने, ज्यात राजेंद्र खैरनार, सुधीर खैरनार आणि दत्तात्रेय पवार यांचा समावेश होता, 'बार्टी'सोबत सहा बैठका घेतल्या. समितीच्या युक्तिवादानंतर, 'बार्टी'ने 28 जून 2025 रोजी 200 पानांचा सकारात्मक अहवाल तयार करून राज्य सरकारला सादर केला. हाच अहवाल केंद्राकडे लवकर पाठविण्यासाठी, आशीष कदम यांच्या मार्गदर्शनात डी. डी. सोनटक्के, आशिकराव क्षीरसागर, आशीष निंबुरकर आणि निरंजन नाकाडे यांच्या शिष्टमंडळाने आज नागपूर येथील रविभवन येथे मंत्री संजय शिरसाट यांच्याशी सविस्तर चर्चा केली. मंत्र्यांनी प्रधान सचिवांना तत्काळ निर्देश दिल्याने शिष्टमंडळाने समाधान व्यक्त केले आहे.

# थोडक्यात

### गांजाची तस्करी करणारा जाळ्यात

**नागपूर:** तहसील पोलिसांनी गांजा बाळगणाऱ्या परप्रांतीय आरोपीला अटक केली ही कारवाई ३० जुलै रोजीच्या सायंकाळी आठ वाजताच्या सुमारास करण्यात आली. तहसील पोलिसांचे तपास पथक आरोपी शोध मोहीम राबवत असताना बगदादी शाह दर्गाजवळ संशयितरित्या पायी जाणारा जिलू प्रमोदकुमार नायर (कालिंगा इनर पो. जारधर, ता. तारसिंग, जि. गंजाम, ओडिशा) याची झडती घेण्यात आली त्याच्याजवळील सुटकेस तपासली असता ७ किलो ९६५ ग्रॅम गांजा मिळून आला. आरोपीच्या ताब्यातून गांजा, मोबाईल फोन असा एकूण अंदाजे १,६९,३०० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आल्याने तो जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध तहसील पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून, आरोपीस अटक करण्यात आली.

### लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**नागपूर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती दिनी नागपूर महानगरपालिकाकडून विनम्र अभिवादन करण्यात आले. आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते मनपा मुख्यालयातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., अजय चारठाणकर, उपायुक्त विजया बनकर, उपायुक्त राजेश भगत, सहायक आयुक्त श्याम कापसे व जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी उपस्थित होते.

### एमडी पावडर तस्कराला अटक

**नागपूर :** पाचपावली पोलिसांनी आज दुपारी एमडी पावडर तस्कराला अटक केली. पोलिसांचे पथक २ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.२० वाजताच्या सुमारास हद्दीतील लष्करी बाग परिसरात गस्त घालत असताना एका संशयास्पद व्यक्तीची हालचाल टिपली त्याला ताब्यात घेतले असता चौकशीत त्याने आपले नाव मनीष पप्पू समुद्रे (शीतला मंदिराजवळ) असे सांगितले. साक्षीदारांसमोर घेतलेल्या अंगझडतीत झिपलॉक पिशवीत ३ ग्रॅम १० मिलीग्रॅम एमडी पावडर आढळून आली. आरोपी हा अमित गजभिये याच्या मदतीने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी एमडी पावडर विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगताना आढळून आला. आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २२(ब) आणि २९ अंतर्गत गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली.

# एकाच दिवशी 'ऑपरेशन शक्ती' अंतर्गत दोन कारवाया

## सामाजिक सुरक्षा विभागाची छापामारी, पाच महिला अन्य राज्यातील

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २ :** पोलिस आयुक्त रविंद्र कुमार सिंगल यांनी मानवी तस्करी आणि व्यावसायिक लैंगिक शोषणाच्या विरोधात सुरू केलेल्या 'ऑपरेशन शक्ती' अंतर्गत नागपुरात दोन घटना उघडकीस आल्या. यात आरोपींकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांना संबंधित पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. तर, सात पीडिताना आरोपींच्या ताब्यातून सुटका करण्यात आली. ही छापामारी सामाजिक सुरक्षा विभागाच्या गुन्हे शाखाने केली.

पहिल्या घटनेत नवीन कामठी ठाणे अंतर्गत आजनी गावातील ड्वेल स्टे कॉकटेल कॅमल फार्म



हाऊस येथे १ ऑगस्ट रोजी दुपारी ३.५५ ते रात्री साडेनऊदरम्यान छापा टाकला असता आरोपी लता विजय बेलेकर (वय ६५ वर्षे, कुंभारे कॉलनी, नवीन कामठी) आणि ईशान प्रकाश भोयर (वय २१ वर्षे प्रगती नगर, रनाळा नविन कामठी) आणि अन्य एक (पाहिजे हवा असलेला अमोल विजय मानवटकर कामठी) हे पीडित महिलांना कमी वेळात अधिक पैसे कमावण्याचे आर्थिक लाभाचे प्रलोभन देवून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेताना मिळून आले. कारवाईदरम्यान दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. नमूद आरोपी व पीडित महिला यांची वैद्यकीय तपासणी करून मुद्देमालासह पुढील कारवाई करिता नवीन कामठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. जप्त मुद्देमाल पंटर पंचनाम्याप्रमाणे दिलेले १५०० रुपये, टेक्नो कंपनीचा मोबाईल एक हजार रुपये, विवो कंपनीचा मोबाईल १२ हजार रुपये, अन्य एक मोबाईल किंमत एक हजार रुपये, हजेरी रजिस्टर ४१३ रुपये आणि दोन नग कंडोमचे पॉकेट असा एकूण १५ हजार ४३३ रुपये.

**पाच पीडिता अन्य राज्यातील**

दुसरी धडक कारवाई १ ऑगस्ट रोजी सायंकाळी पावणे सहा ते मध्यरात्रीनंतर साडेबाराच्यादरम्यान गणेशपेठ पोलिस ठाण्याअंतर्गत स्वॅग स्टे (राहुल हॉटेलचा समोरील परिसर गणेशपेठ बसस्टॅन्ड चौक ) येथे केली. आरोपी सुमित ईश्वर घाटे (२८ वर्ष, शिवालिक अपार्टमेंट एसआरपी गेट क्रमांक एक हिंगणा रोड) आणि अन्य दोघे (पाहिजे असलेले आरोपी राहुल आणि सचिन) हे राज्याबाहेरील पाच महिलांकडून देहव्यापार करून घेताना मिळून आले. नमूद आरोपी व पीडित महिला यांची वैद्यकीय तपासणी करून मुद्देमालासह पुढील कारवाईसाठी गणेश पेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. कारवाईत पुढील जप्त मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात पंटर पंचनाम्याप्रमाणे दिलेले २१ हजार रोख आणि मोबाईलचा (७० हजार) समावेश आहे.

# प्रबोधनात्मक व्याख्यान

**नागपूर, दि. २ :** राष्ट्रीय महिला आयोगाच्या 'इग्निट' या दुसऱ्या ऑनलाईन व्याख्यानमालेत, पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार यांनी 'सायबर सुरक्षा जागरूकता आणि महिला युवा नेत्यांसाठी डिजिटल सुरक्षा' या विषयावर एक महत्त्वपूर्ण व्याख्यान सादर केले. महिलांच्या सर्वांगीण विकासाला आणि सक्षमीकरणाला चालना देण्याच्या मुख्य उद्देशाने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. पोद्दार यांनी आपल्या व्याख्यानात महिलांना लक्ष्य करणाऱ्या सायबर गुन्हेगारीचे विकसित स्वरूप, ऑनलाईन छळ, फिशिंग, ओळख चोरी आणि वैयक्तिक डेटाचा गैरवापर यासारख्या गंभीर धोक्यांवर प्रभावी मार्गदर्शन केले.

# मनपाचा 'एक तारीख, एक तास एक साथ' उपक्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २ :** स्वच्छ, सुंदर नागपूर साकारण्यासाठी महिन्याच्या पहिल्याच दिवशी नागपूर महानगरपालिका व नागपूर स्मार्ट सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने व घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'एक तारीख, एक तास एक साथ' या अभिनव उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या नेतृत्वात दहाही झोनच्या सहाय्यक आयुक्त यांच्या मार्फत शुक्रवारी सर्व झोनमध्ये आरोग्याच्या संदर्भात सहा मूलमंत्र यावर भर देणाऱ्या 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियान अंतर्गत 'एक तारीख, एक तास एक साथ' उपक्रम राबविण्यात





आला. मनपाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्वच्छता विभागामार्फत प्रत्येक झोनमध्ये स्वच्छता करण्यात आली. यात लक्ष्मीनगर झोनमधील प्रभाग क्रमांक ३८ मध्ये प्रगतीनगर, धरमपेठ झोनमधील प्रभाग क्रमांक १४ मधील डब्ल्यूसीएल रोड, भारत नगर, राजभवन, हनुमान नगर झोन मधील प्रभाग क्रमांक ३२ मधील दुर्गानगर शाळा, धंतोली झोन मधील प्रभाग क्रमांक १७ मधील भुरा मैदान हाजरी स्टॅंड, नेहरूनगर झोन मधील प्रभाग क्रमांक २८ मधील धनवंतरी नगर , गांधीबाग झोन मधील प्रभाग क्रमांक १८ मधील चंदनीपुरा, तरंजीपुरा झोन मधील प्रभाग क्रमांक २० मधील नाईक तलाव, महात्मा ज्योतीबा शाळेजवळ, लकडगंज झोन मधील प्रभाग क्रमांक ४ मधील भरतवाडा रोड, नेताजी नगर नागपूर स्कूलच्या जवळ, आशीनगर झोन मधील प्रभाग ७ मधील आवळे बाबू चौक, मंगळवारी झोन मधील प्रभाग १ मधील मंगळवारी बाजार मध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांनी स्वच्छता केली.

**नागरिकांना आवाहन**

नागरिकांना पावसाळ्याच्या दृष्टीने विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. याशिवाय नागरिकांना हाताची स्वच्छता राखणे, घराची स्वच्छता राखणे, परिसर स्वच्छ ठेवणे, शौचालयाची स्वच्छता राखणे, नाल्या व सांडपाण्याची जागा स्वच्छ ठेवणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता राहणार नाही, याची काळजी घेण्याच्या संदर्भात जनजागृती करण्यात आली.

# नागपूर-इटारसी चौथ्या रेल्वे मार्गाला मंजुरी

## मध्य भारतातील रेल्वे वाहतुकीची गती वाढणार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

### ही वैशिष्ट्ये

* २९७ किलोमीटर लांबीचा प्रकल्प
* ट्रॅकची लांबी ३३९ किलोमीटर
* दिल्ली-चेन्नई हाय डेन्सिटी नेटवर्कचा भाग आहे
* नागपुरात मुंबई-हावडा हाय डेन्सिटी नेटवर्कला जुळतो
* वाहतूक अधिक वेगवान आणि कार्यक्षम होईल
* रेल्वे कॉरिडोरची क्षमता आणि कार्यक्षमता वाढेल

**नागपूर, दि. २ :** केंद्र सरकारने नागपूर-इटारसी चौथ्या रेल्वे मार्गिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. सुमारे ५ हजार ४५१ कोटी रुपये अंदाजित खर्च असलेला हा प्रकल्प आगामी चार वर्षांत अर्थात २०२९ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे



नागपूर-इटारसी प्रकल्प हा उत्तर- दक्षिण रेल्वे कॉरिडोरमधील अतिशय महत्त्वाचा मार्ग असून, नव्या प्रकल्पात ३७ स्थानके, ३६ मोठे पुल, ४१५ लहान पुल, दोन रोड ओव्हर ब्रिज, ७४ रोड अंडर ब्रिज, चार बोगदे आणि दोन रेल ओव्हर ब्रिज यांचा समावेश असेल. रेल्वेची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार असून, उशिरा प्रवासाचे प्रमाण कमी होणार आहे. हा प्रकल्प अतिरिक्त १० दशलक्ष टन मालाची वाहतूक होणार असल्याने लॉजिस्टिक्स खर्चात १ हजार २०६ कोटी रुपयांची बचत अपेक्षित आहे. धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन हा मार्ग मध्य प्रदेशातील महाकालेश्वर आणि ओंकारेश्वर, आंध्र प्रदेशातील श्रीशैलम आणि तामिळनाडूतील रामेश्वरम या चार ज्योतिर्लिंग मंदिरांना जोडेल. यामुळे धार्मिक पर्यटनसह स्थानिक उद्योगांना मोठी चालना मिळेल. रोजगार निर्मिती सदर प्रकल्पामुळे बांधकामादरम्यान सुमारे २२९ लाख मनुष्य-दिवस प्रत्यक्ष रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. महाराष्ट्रातील नागपूर जिल्हा तसेच मध्य प्रदेशातील नर्मदापुरम, बैतुल आणि पांढुर्णा जिल्ह्यांना या प्रकल्पाचा थेट फायदा होणार असल्याचे रेल्वे सूत्राने म्हटले आहे.

# औद्योगिक ग्राहकांसाठी महावितरणचा 'स्वागत कक्ष'

## नवीन वीजजोडणी ते तक्रार निवारणापर्यंत सर्वकाही एकाच ठिकाणी; दीड वर्षांपासून उपक्रम कार्यान्वित

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. २ :** औद्योगिक ग्राहकांच्या समस्या तातडीने सोडवण्यासाठी आणि त्यांना जलद सेवा देण्यासाठी महावितरणने सुरु केलेला 'स्वागत कक्ष' आता औद्योगिक जगतासाठी वरदान ठरत आहे. नागपूर शहर आणि ग्रामीण मंडळासाठी कार्यान्वित झालेला हा विशेष कक्ष, औद्योगिक ग्राहकांना नवीन वीजजोडणीपासून ते बिलिंग आणि वीजपुरवठ्याच्या तक्रारींपर्यंतच्या सर्व समस्यांचे तत्पर निराकरण करीत आहे.

राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औद्योगिक ग्राहकांना दर्जेदार आणि तत्पर सेवा देण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशानुसार महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी स्थानिक पातळीवर स्वतंत्र सेवा यंत्रणा उभारण्याची सूचना केली. यातून 'स्वागत कक्षा'ची निर्मिती झाली असून, प्रमुख म्हणून कार्यकारी अभियंता (प्रशासन) कार्यरत आहेत. या कक्षाद्वारे नागपूर जिल्ह्यातील औद्योगिक ग्राहकांसाठी नवीन वीजजोडणीसाठी अर्ज आणि प्रक्रिया, वाढीव वीजभाराची मागणी, वीजपुरवठा खंडित होणे किंवा इतर तांत्रिक तक्रारी आणि बिलिंगसंबंधीच्या तक्रारी किंवा प्रश्न याबाबत मदत केल्या जाते.

महावितरणचे नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या अध्यक्षतेखाली कक्षाच्या नियमित बैठका होतात. या बैठकांमध्ये औद्योगिक ग्राहकांशी थेट संवाद साधला जातो आणि त्यांच्या शंकांचे निरसन केले जाते. या संदर्भात आयोजित बैठकीला अधीक्षक अभियंता अमित परांजपे, कार्यकारी अभियंता राहुल जीवतोडे, समीर टेकाडे, स्वप्नील गोतमारे, धम्मदीप फुलझेले आणि संतोष क्षीरसागर यांच्यासह बुटीबोरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, महाराष्ट्र इंडस्ट्रियल असोसिएशन, विदर्भ इंडस्ट्रियल असोसिएशन, विदर्भ प्लास्टिक इंडस्ट्रियल असोसिएशन, वांजरा इंडस्ट्रियल असोसिएशन, विदर्भ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौंसिल, लघु उद्योग भारती आणि इतर औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. नागपूर ग्रामीण मंडळाच्या बैठकीला अधीक्षक अभियंता संजय वाकडे, कार्यकारी अभियंता आणि कक्षाचे प्रमुख महेश चतुर्वेदी यांच्यासह इतर अभियंते आणि औद्योगिक ग्राहक प्रतिनिधींची उपस्थिती होती.

### वेळेची बचत

**दीड वर्षांपासून कार्यान्वित 'स्वागत कक्ष' औद्योगिक ग्राहकांना आधीपासून उपलब्ध असलेल्या सर्व सेवांसोबत एक अतिरिक्त आणि अत्यंत महत्त्वपूर्ण सेवा देत आहे. या कक्षाशी संपर्क साधताच महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी थेट ग्राहकांच्या दारी पोहोचतात. कागदपत्रांची पूर्तता, ऑनलाईन अर्ज भरणे आणि आवश्यक शुल्क जमा करणे आदी कामे जलद गतीने पूर्ण केली जातात. यामुळे औद्योगिक ग्राहकांचा वेळ आणि कष्ट दोन्ही वाचतात.**

# बेलतरोडीत घरफोडी

**नागपूर, दि. २ :** बेलतरोडीत घरफोडीची घटना घडली असून, ५,५६,८०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे. बेलतरोडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नगरविकास सोसायटीमधील सुधाकर राजाराम दुबे (वय ७२ वर्षे) यांच्या बहिणीने विदेशात (दुबई) जाण्यापूर्वी आपले दागिने त्यांच्याकडे ठेवले होते. त्यांच्या घरात चोरी झाल्याचे त्यांना आढळून आले. ३० जुलै २०२५ रोजी रात्री आठ ते १ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी अडीच वाजताच्या दरम्यान फिर्यादी आणि त्यांचे कुटुंब मुलीच्या घरी गेले होते हीच संधी साधत चोरट्याने घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून बेडरूममधील कपाटातून १ लाख २० हजार रोख रक्कम तसेच सोने-चांदीचे दागिने असा एकूण ५,५६,८०० रुपयांचा किमतीचा मुद्देमाल चोरून नेला.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, रविवार, दि.३ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

**महत्त्वाचे**

## काटेपूर्णा व वान प्रकल्प अर्ध्यापर्यंत भरले, निर्गुणा १०० टक्के भरला

अकोला : जिल्ह्यात काल कोणत्याही प्रकल्पात पाऊस न झाल्यामुळे बहुतांश धरणांत पाणीसाठा स्थिर असून, साठवण क्षमता अजूनही समाधानकारक टप्प्यावर पोहोचलेली नाही. शनिवारी सकाळी ७ वाजेपर्यंतच्या पाटबंधारे विभागाच्या अहवालानुसार फक्त निर्गुणा प्रकल्प १०० टक्के भरलेला असून उर्वरित धरणे अद्याप ५०-७० टक्क्यांच्या दरम्यान आहेत. काटेपूर्णा धरणात सध्या ४३.४४७ दशलक्ष घनमीटर (मिमी३) इतका साठा असून, तो एकूण क्षमतेच्या ५०.३१ टक्के इतका आहे. एकूण २२१ मिमी पावसाची नोंद असून, शनिवारी पावसाची नोंद झालेली नाही. गेट बंद असून विसर्गही शून्य आहे. वान प्रकल्पात ४३.३१ मिमी३ साठा असून ५२.८४ टक्के क्षमतेने भरले आहे. ३०८ मिमी एकूण पाऊस झाला असून, विसर्ग किंवा गेट उघडण्याची स्थिती नाही. मोर्णा प्रकल्प ७३.०३ टक्के भरला असून ३०.२८ मिमी साठा आहे. मात्र, आज पाऊस न झाल्यामुळे सांडवा व विसर्ग बंदच आहे.

## 'पैसा कोणाच्या बापाचा नाही'
# मंत्री शिरसाटांच्या विधानावरून पुन्हा खळबळ
### महायुतीमधील नेत्यांच्या वादग्रस्त वक्तव्याची मालिका सुरूच!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २ : कामासाठी कितीही पैसा मागा, पैसा कोणाच्या बापाचा नाही! अकोल्यात मंत्री संजय शिरसाटांच्या या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. सामाजिक न्याय भवनाच्या उद्घाटनावेळी त्यांनी केलेल्या या आक्रमक भाष्यामुळे पुन्हा एकदा महायुतीतील नेत्यांच्या वादग्रस्त विधानांची मालिका चर्चेत आली असून, विरोधकांकडून टीकेची झोड उठण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



राज्यातील महायुतीतील काही नेते सध्या कामापेक्षा अधिक त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असून, त्यात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट आघाडीवर असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले. शनिवारी अकोल्यातील निमवाडी परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या नूतन वास्तूच्या उद्घाटन सोहळ्यात त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा खळबळ उडण्याची चिन्हे आहेत. या कार्यक्रमात बोलताना मंत्री शिरसाट म्हणाले की, कामासाठी कितीही पैसा मागा, पैसा कोणाच्या बापाचा नाही! पण तो योग्य ठिकाणी आणि नियमानुसार खर्च झाला पाहिजे. त्यांचा हेतू विकासकामांसाठी निधी उपलब्ध असल्याचा

मुख्यमंत्र्यांनी कडक तंबी दिल्यानंतरही राज्यातल्या महायुती सरकारमधल्या मंत्र्यांच्या वादग्रस्त विधानं काही केल्या थांबता थांबत नाहीयेत. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणतात, वस्तीगृहासाठी ५, १०, १५ कोटी असे कितीही पैसे मागा. आपण लगेच मंजूर करू. सरकारचा पैसा आहे. आपल्या बापाचं काय जातंय

विश्वास जनतेला देण्याचा असला, तरी त्यांच्या भाषेतील आक्रमक शब्दसंपदा अनेकांच्या भुवया उंचावणारी ठरली. लोकप्रतिनिधींनी आपली मते प्रभावीपणे मांडणे अपेक्षित असते; मात्र मंत्रीपद भूषवणाऱ्या व्यक्तीकडून आलेले हे विधान सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. एकीकडे सरकारमधील मंत्री जनतेच्या हितासाठी निधीवर स्पष्ट भूमिका घेत आहेत, हे स्वागतार्ह असले तरी अशा शैलीतील मांडणीमुळे विरोधकांनादेखील सरकारवर टीका करण्याची संधी मिळू शकते. दरम्यान, उद्घाटन प्रसंगी सामाजिक न्याय भवनाच्या माध्यमातून मागासवर्गीयांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या योजनांची माहिती देण्यात आली. नवी इमारत अत्याधुनिक सोयींनी सुसज्ज असून, याचा लाभ विविध समाजघटकांना होणार आहे. एकंदरीत, मंत्री शिरसाटांनी विकासनिधीसंदर्भातील स्पष्टता मांडली असली तरी त्यांची शब्दांची धार पुढील काही दिवस राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरणार यात शंका नाही.

## निलंबनाची कारवाई, पण पुढील नियोजन शून्य!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी





अकोला, दि. २ : जिल्हा स्त्री रुग्णालयातील निविदा प्रक्रियेतील त्रुटींवरून नुकतीच तीन अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. ही कारवाई संबंधित प्रकरणाच्या चौकशीनंतर आरोग्य विभागाच्या उच्च पातळीवरून आदेशित करण्यात आली असून, त्यामागे पारदर्शकता सुनिश्चित करण्याचा उद्देश आहे. मात्र, सद्यस्थितीत या निलंबनानंतर पुढील व्यवस्था अद्याप स्पष्ट न झाल्यामुळे रुग्णालयाच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक, वैद्यकीय अधीक्षक व प्रशासकीय अधिकारी अशी तीन महत्त्वाची पदे सध्या रिक्त आहेत. त्यामुळे काही विभागांत नियोजनात अडथळा येत आहे. नवजात बालकांची निगा, औषध व्यवस्थापन आणि प्रशासकीय नोंदी यांसारख्या कामांमध्ये सुसंगत नेतृत्वाची आवश्यकता जाणवते.

आरोग्य सेवांचे पूर्ववत संचालन सुरळीत राहावे, यासाठी रुग्णालय प्रशासनाकडून तात्पुरत्या जबाबदाऱ्या विभागणीवर विचार सुरू असल्याचे सूत्रांकडून कळते. तसेच, आरोग्य विभागाकडून नव्या जबाबदारीसाठी अधिकारी नियोजन लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. या प्रकरणात होणाऱ्या नियोजनांवर नागरिक, रुग्ण व कर्मचाऱ्यांचे लक्ष असून, सद्यस्थिती लवकर पूर्ववत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आरोग्य सेवांच्या संदर्भात प्रशासन सकारात्मक असल्याचेही सूत्रांचे म्हणणे आहे. दरम्यान, निविदा प्रक्रियेतील पारदर्शकता जपण्यासाठी विभाग पावले उचलत असून, या पार्श्वभूमीवर रुग्णसेवा बाधित होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

## अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

अकोला : राष्ट्रीय चर्मकार महासंघ अकोला व बी.आर. सी.एफ.संघटना अकोला यांच्या विद्यमाने आयोजित साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५वी जयंती शुक्रवारी ( ता. १ ) रोजी महारुद्र हनुमान मंदिर खेडकर नगर अकोला येथे साजरी करण्यात आली. या जयंती कार्यक्रमाला अध्यक्ष पांडुरंग वाडेकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मधुकर वानेडकर, प्रमुख वक्ते पी. जी. भामोदे, पी.के. रेवास्कर, राम शेगोकार, आर. के. ताजने, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण चोपडे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित प्रसंगावर व त्यांनी लिहिलेल्या साहित्यावर, काव्यांवर भरपूर व वैशिष्ट्यपूर्ण माहिती कार्यक्रमात दिली.

## वीज पुरवठा खंडित झाल्याने महावितरण कार्यालयात तोडफोड

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २ : अकोट फाईल परिसरातील नागरिकांना आज सकाळी ८ वाजल्यापासून कोणतीही पूर्वसूचना न देता महावितरण कंपनीने वीज पुरवठा खंडित केल्याने मोठा त्रास सहन करावा लागला. तब्बल ९ तास वीज न मिळाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती.

या प्रकाराबाबत प्रभागातील काँग्रेसचे पदाधिकारी रवि शिंदे यांनी संबंधित महावितरण अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र फोन न उचलल्यामुळे आणि कोणतीही माहिती न दिल्यामुळे ते संतप्त झाले. सायंकाळी ५ वाजता त्यांनी आपातापा रोडवरील महावितरणच्या सब स्टेशन कार्यालयात जाऊन संतापाच्या भरात तोडफोड केली.

या तोडफोडीनंतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी हालचाल सुरू केली आणि तब्बल ९ तासांच्या खोळंब्यानंतर अकोट फाईल परिसराचा वीजपुरवठा रात्री पूर्ववत करण्यात आला.

वीजपुरवठा खंडित करताना नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना न देणे, तक्रारीकडे दुर्लक्ष करणे आणि नंतर उशिराने सेवा पूर्ववत करणे या प्रकारामुळे महावितरणवरील लोकांचा रोष वाढत आहे. याप्रकरणी अधिकाऱ्यांनी खुलासा करावा आणि जबाबदाऱ्यांची निश्चिती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांतून होत आहे.

## अर्धवट रस्ता धोक्याची घंटा...



अकोला जुन्या शहरातील भांडपुरा पोलीस चौकी ते बाळापूर नाका पर्यंत सिमेंट रस्त्याचे एका साईडने काम अर्धवट झाले असून दुसऱ्या साईटची बाजू आतापर्यंत बनवण्यात आली नाही या सिमेंट रस्त्यावरून एकाच साईडने वाहने घेऊन ये जा करणाऱ्या वाहनधारकंना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.
( छाया. संजय ताथुरकर)

## बस स्थानक चौकात शिवसैनिक आक्रमक

**अकोला** : मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी निर्दोष सुटल्याच्या पार्श्वभूमीवर भगवा दहशतवाद या संज्ञेचा उल्लेख चर्चेत आला आहे. या मुद्द्यावरून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी हिंदू दहशतवादी असा उल्लेख केल्याचा दावा शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. या कथित विधानाच्या निषेधार्थ शनिवारी अकोल्यातील मध्यवर्ती बसस्थानक चौकात शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करीत चव्हाण यांच्या प्रतिकात्मक फोटोला जोडे मारले. यावेळी जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली. कार्यकर्त्यांनी आरोप केला की, अशा वक्तव्यांमुळे देशातील बहुसंख्य हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या जात आहेत. त्यामुळे चव्हाण यांनी देशवासीयांची माफी मागावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. दरम्यान, पृथ्वीराज चव्हाण यांनी नेमकं काय वक्तव्य केलं, याबाबत अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. मात्र या प्रकरणामुळे स्थानिक राजकीय वातावरण तापले असून विविध स्तरांवर चर्चा सुरु आहे.

## अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

अकोला : अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अकोला शहरातील स्टेशन चौकात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे पूजन, हारार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस कृष्णा अंधारे हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मातंग समाजाचे नेते बाळासाहेब तायडे होते. उपस्थितानी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाचे लोकार्पण
### राज्यात १२० वसतिगृहे उभारणार: संजय शिरसाट यांची घोषणा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २ : गोरगरीब व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दर्जेदार सुविधा मिळाव्यात, यासाठी राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून १२० नवी वसतिगृहे उभारण्यात येणार असून, त्यासाठी १,२०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, अशी घोषणा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केली. शहरातील निमवाडी परिसरात उभारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार हरीश पिंपळे, आमदार अमोल मिटकरी, आमदार साजिद खान पठाण, सत्यपाल महाराज,



समाजकल्याण आयुक्त बाबासाहेब बेलदार, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, समाजकल्याण उपायुक्त माया केदार, सहायक आयुक्त अनिल वाठ यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री शिरसाट म्हणाले की, मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सर्वप्रथम राज्यातील वसतिगृहांची पाहणी केली. शिक्षणासाठी खेड्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची सुविधा अत्यंत आवश्यक असून, ती शहराजवळ असावी, याकडे शासनाचे लक्ष आहे. विभागाची सर्व कार्यालये एका ठिकाणी येणार असल्याने नागरिकांना सुलभ सेवा मिळणार आहे. यावेळी आमदार हरीश पिंपळे यांनी वसतिगृहे शहरालगत असावीत, अशी मागणी मांडली, तर आमदार अमोल मिटकरी यांनी अकोला शहरात बार्टीचे उपकेंद्र व्हावे, अशी मागणी केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त माया केदार यांनी केले. कार्यक्रमाला नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली.

## ग्रामीण भागातील ४५० अतिक्रमिकांचे अतिक्रमण नियमानुकूल
### सीईओ अनिता मेश्राम यांच्या हस्ते लाभार्थ्यांना नमुना ८- अ वाटप

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २ : महसूल सप्ताहानिमित्त शासनाने ठरवून दिल्यानुसार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील अतिक्रमण नियमानुकूल करण्यात आलेल्या ४५० लाभार्थ्यांना नमुना ८ वाटप करण्यात आले.

अकोला तालुक्यात आमदार रणधीर सावरकर, उपविभागीय अधिकारी शरद जावळे, गटविकास अधिकारी, तहसीलदार यांच्या हस्ते नमुना नंबर ८ चे वाटप केले. त्याचप्रमाणे ज्ञानरंजन सभागृह भाऊसाहेब लहाने जुनिअर कॉलेज पिंजर येथे



अतिक्रमण नियमानुकूल करून पात्र असलेल्या ११३ कुटुंबास पट्टे / नमुना नंबर ८ वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य/पंचायत ) दिगंबर लोखंडे, गट विकास अधिकारी रविकांत पवार, तहसीलदार राजेश वजिरे, सरपंच शारदा ठक, उपसरपंच शेख व ग्रामपंचायत महानचे सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या लाभार्थी यांना नमुना ८ चे वाटप करण्यात आले. तसेच यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. मूर्तिजापूर तालुक्यातील अतिक्रमण नियमानुकूल करण्यात आलेल्या २८ लाभार्थी यांना गटविकास अधिकारी मोरे, उप विभागीय अधिकारी अपार यांच्या हस्ते, अकोट तालुक्यातील ११३ लाभार्थी यांना आमदार प्रकाश भारसाकळे, गटविकास अधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्या उपस्थितीमध्ये वाटप करण्यात आले. तसेच बाळापूर तालुक्यातील ५० लाभार्थी व पातूर तालुक्यातील १८ लाभार्थी यांना नुमना ८ गट विकास अधिकारी , उप विभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्या उपस्थितीमध्ये वाटप करण्यात आले, तसेच तेल्हारा तालुक्यातील ११७ लाभार्थी यांना सिरसोली येथे गट विकास अधिकारी बांगर, तहसीलदार यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. जिल्ह्यातील एकूण ४४९ लाभार्थी त्यांचे अतिक्रमण नियमानुकूल करून नमुना ८ वाटप करण्यात आले आहे.

## पत्रकारासह कुटुंबावर तलवारीने जीवघेणा हल्ला!
### पत्रकार संघटनांचा तीव्र संताप, पोलीस अधीक्षकांकडून गुन्हेगारी प्रवृत्तींना कडक इशारा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २ : दैनिक सुफ्फाचे मुख्य संपादक सज्जाद हुसेन आणि त्यांच्या कुटुंबीयांवर तलवार, चाकू, भाले अशा धारधार शस्त्रांनी करण्यात आलेल्या जीवघेण्या हल्ल्यामुळे अकोला जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. पत्रकारांच्या सुरक्षिततेला सुरुंग लावणाऱ्या या घटनेच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यातील सर्व पत्रकार संघटना एकत्र आल्या असून, जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांची भेट घेऊन त्यांनी तत्काळ आणि कठोर कारवाईची मागणी करीत लेखी निवेदन सादर केले. या वर्षात पत्रकारांवर सुमारे सात ते आठ हल्ले झाले असून,



चौथ्या आधारस्तंभावर ही परिस्थिती निर्माण होत असेल तर सर्वसामान्यांचे काय, असा गंभीर प्रश्नही यानिमित्त समोर येत आहे. २९ जुलै २०२५ रोजी अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेंतर्गत अकोला व बाळापूर तालुक्यातील दोन गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना तडीपार करण्यात आल्याची अधिकृत माहिती देण्यात आली होती. ही बातमी दैनिक सुफ्फा मध्ये प्रसिद्ध करण्यात आली; मात्र या बातमीमुळे संतप्त झालेल्या आरोपींनी मुख्य संपादक सज्जाद हुसेन यांना जिवे मारण्याची धमकी दिली होती. काही दिवसांनंतर आरोपींनी त्यांच्या साथीदारांसह सुफ्फा कार्यालयात येऊन थेट हल्ला चढविला. या हिंसक हल्ल्यात चार पत्रकार गंभीर जखमी झाले. या घटनेनंतर पत्रकार संघटनांनी निषेध व्यक्त करीत एकत्रितपणे पोलीस अधीक्षक कार्यालयावर धडक दिली.

**माहिती द्या, मिळवा १ लाख बक्षीस!** | एकूण ११ गुन्हे, ५ स्टिंग ऑपरेशन

# गर्भलिंग निदान व अवैध गर्भपाताविरोधात धडाकेबाज कारवाई!

। शरद शेगोकार ।

**अकोला, दि. २:** कन्याभ्रूण हत्या रोखण्यासाठी अकोला जिल्ह्यात प्रशासनाने गेल्या काही वर्षांत धडक आणि परिणामकारक मोहीम राबवून अनेक कारवाया केल्या आहेत. पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्यांतर्गत गर्भलिंग निदान व बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्यांविरोधात जिल्हा शल्य चिकित्सक व औषध प्रशासन विभागाच्या संयुक्त कारवायांनी आता वेग घेतला आहे.

२०१७ ते २०१९ दरम्यान प्रतिबंधित गर्भपात गोळ्यांच्या विक्रीसंबंधी एकूण ६ एफआयआर, तर पाच बोगस डॉक्टरांविरोधात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले. अलीकडे ३ जुलै २०२५ रोजी अकोटमध्ये एफडीएच्या मदतीने एका मेडिकलवर छापा टाकण्यात आला, ही कारवाईही ठळकपणे यशस्वी ठरली.

सध्या जिल्ह्यात जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कार्यक्षेत्रात ३८ सोनोग्राफी आणि १८ गर्भपात केंद्रे नोंदणीकृत असून, त्यावर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. २०२४-२५ मध्ये जिल्ह्यात व वाशिमसह मिळून एकूण ५ स्टिंग ऑपरेशन्स राबवण्यात आले, यामध्ये एका प्रकरणात न्यायालयीन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या मोहिमेंतर्गत नागरिकांनी जर कोणतीही माहिती पुरवली, तर शासनाकडून १ लाख बक्षीस देण्याची तरतूद आहे. तसेच, स्टिंगमध्ये सहभागी महिलेला प्रोत्साहनपर १ लाखाची रक्कम दिली जाते.या कायद्याचे उल्लंघन झाल्याची शंका असल्यास http://amchimulgimaha.in] (http://amchimulgimaha. in किंवा टोल फ्री १८००२३३४४७५ / १०४ वर संपर्क साधावा.



### कन्याभ्रूण हत्या रोखण्यासाठी पुढे या!

अवैध गर्भलिंग निदान व गर्भपात ही गंभीर समस्या असून अकोल्यातील प्रशासनाची कारवाई स्तुत्य आहे. मात्र समाजाचा सक्रिय सहभागही तितकाच आवश्यक आहे. माहिती देणाऱ्यांना १ लाख बक्षीस देण्यामागे चुकीविरुद्ध उभं राहण्याचा संदेश आहे. ''मुलगी वाचवा'' हे घोषवाक्य कृतीत उतरवणं गरजेचं असून डॉक्टर्स, पत्रकार, बचतगट, आणि नागरिकांनीही ही जबाबदारी अंगीकारली पाहिजे.

**लिंग गुणोत्तरात सुधारणा**

सन २०२२ - ९०२
सन २०२३ - ९१९
सन २०२४ - ९४०

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, रविवार, दि.३ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


# जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्तीचा पालकमंत्र्यांनी घेतला आढावा

## अधिकाऱ्यांना दिले वस्तुस्थिती मांडण्याचे आदेश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२ :** जिल्ह्यातील पावसामुळे झालेल्या नुकसानीची गंभीर दखल घेत राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानग्रस्त नागरिकांना तातडीची मदत पोहोचवण्याचे व पंचनामे तत्काळ पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे,, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते. पालकमंत्री मकरंद पाटील म्हणाले, ''नैसर्गिक आपत्ती ही अनपेक्षित असली, तरी नागरिकांवर त्याचे परिणाम गंभीर असतात. अशावेळी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने प्रतिसाद द्यावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आणि नागरिकांना कुठलाही अडथळा न होता शासकीय मदत तातडीने पोहोचली पाहिजे. नुकसानीचे वर्गीकरण करुन पंचनाम्याचे काम झपाट्याने पूर्ण करा. जिल्हाधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रातील नुकसानीचे मदत तातडीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावावी. तसेच शासन स्तरावरील प्रस्ताव सादर करावा, जेणेकरून अनुदान व भरपाई तत्काळ मंजूर होऊ शकेल. बैठकीत पूरस्थितीग्रस्त, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेली शेती, घरांचे नुकसान, रस्ते वाहतूक तसेच वीज आणि पाणीपुरवठा या बाबींची सविस्तर माहिती घेण्यात आली. यावेळी अधिकारी खरी वस्तूस्थिती समजून मांडावी अश्या सुचना त्यांनी दिल्या. तसेच एप्रिल ते जून २०२५ या कालावधीत अवेळी पाऊस, गारपीठ व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे मदत येत्याा आठ दिवसात लाभार्थ्यांना मिळेल यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश पालकमंत्री ना.पाटील यांनी यावेळी दिले.

## महत्त्वाचे

### रस्त्यांची दुरुस्ती करा, अन्यथा आंदोलन

**खामगाव :** तालुक्यातील मेरा बु. ते पिंपळगाव सोनारा, तपोवन देवी मार्ग रोहडा, रोहडा भालगाव तसेच कवठळ या रस्त्यांची अत्यंत बिकट अवस्था झाली असून नागरिकांना प्रवास करण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. तातडीने, रस्त्यांची दुरुस्ती करा, अन्यथा आंदोलन करणार, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे गजानन वायाळ यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदनाद्वारे दिला आहे. पावसाळ्यामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, आजारी रुग्ण, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. १५ ऑगस्टपूर्वी दुरुस्ती झाली नाही, तर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. सदरचे निवेदन मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, जिल्हाधिकारी आणि कार्यकारी अभियंता यांच्याकडेही पाठवण्यात आले.

### पालखीत विवाहितेची पोथ लंपास

**खामगाव :** येथून शेगावकडे निघालेल्या पालखीसोबत लाखो भाविक सहभागी झाले होते. दरम्यान तालुक्यातील पोरज येथील सौ. सीमा शिवलाल बोराडे ही महिलाही सहभागी झाली होती. सवर्णा फाटा ते यश हाच्यादरम्यान १९ हजार रुपये किंमतीची सोन्याची पोथ अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील लंपास केल्याची घटना ३१ जुलै रोजी घडली. सौ. सीमा बोराडे यांनी शेगाव ग्रामीण पोलिसात दिलेल्या तक्रारीवरुन, पोलिसांनी आज २ ऑगस्ट रोजी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एएसआय मोबीन शहा हे करीत आहेत.

### घरातील पैसे खर्च केल्याने तरूण बेपत्ता

**खामगाव :** २ हजार ५०० रुपयाची रक्कम घेवून घराचा किराणा माल आणण्यासाठी गेले. मात्र सदरची रक्कम ही मित्रांसोबत हॉटेल आर्यामध्ये जेवण करुन खर्च केली. आता घरी कसे जाऊ, या भीतीपोटी १९ वर्षीय तरुण काही न सांगता रेल्वेतून नांदुरा येथून भुसावळकडे बसून बेपत्ता झाल्याची घटना घडली. नांदुरा तालुक्यातील बाबावाडी येथील सुमित संतोष बोडखे असे त्या तरुणाचे नाव आहे. सदर तरुण हा नाशिक येथे जातो, असे सांगून काल १ ऑगस्ट रोजी बेपत्ता झाला. त्याचे मित्रांकडे चौकशी केली असता मित्रांना रोज हॉटेलात पार्टी देत असल्याचे त्यांनी सांगीतले. पैशे अवाजवी खर्च झाले आणि आई वडील रागावतील याच कारणाने तरून घर सोडून गेला असावा असा अंदाज वर्तविल्या जात आहे. त्याचे नातेवाईकांडे सुध्दा चौकशी केली असता मिळून आला नाही नांदुरा पोलिसांनी संतोष बोडखे यांच्या फिर्यादवरुन आज २ ऑगस्ट रोजी हरविल्याची नोंद घेतली आहे.

# शेतकरी पुत्राची आत्महत्या

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.२ :** तालुक्यातील भरोसा येथील शेतकरी दांपत्य- गणेश थुट्टे आणि रंजना थुट्टे यांनी हुमणी अळीने सोयाबीन पीक उद्ध्वस्त झाल्याने आणि बँकांचे असलेले कर्ज यामुळे दि. २४ जुलै रोजी शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्म हत्याा केली होती. ही घटना ताजी असतानाच तालुक्यातील पिंपळ- गाव सराई येथील नवयुवक शे- तकरी पुत्राने आत्महत्या केल्याची घटना दि. १ ऑगस्ट रोजी घडली.

यााबाबत सविस्तर वृत असे की, पिंपळगाव सराई येथील अल्पभूधारक शेतकरी राजेंद्र गुंड ( वय ५० वर्ष ) यांचा मुलगा शंकर राजेंद्र गुंड ( वय २५ वर्षे ) हा नेहमीप्रमाणे दि.१ ऑ- गस्ट रोजी सकाळी गाईचे दुध काढण्यासाठी गोठ्यात गेला, दुध काढल्यानंतर त्याने दुधा-



चे भांडे गोठ्याच्या ठेवले आणि गोठ्याच्या आडोशाला जाऊन गळफास घेऊन आत्महत्याा केली. बराच वेळ झाल्याने शंखर घरी दुध घेऊन न आल्याने त्याचे वडील त्याला पहायला गेले असता शंकर हा गळफास घेऊन लटक- लेला दिसला, त्याानंतर त्याांनी आरडाओरडा केला असता आ- जूबाजूचे लोक तिथे आले, त्यांना शंकरचे प्रेत लटकलेले दिसले. या घटनेची माहिती पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा करून प्रेत खाली उतरवून रुग्णालयात पाठवीले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त काँग्रेसकडून अभिवादन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२ :** साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या जनसेवा कार्यालयात दि.१ ऑगस्ट रोजी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




सर्वप्रथम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी खामगाव विधानसभा मतदार संघ समन्वयक ज्ञानेश्वरदादा पाटील यांनी दोन्ही महाप- रूषांच्या कार्यावर प्रकाश टाकला व सर्वांनी त्यांचे विचार आत्मसात करून जिवनाची वाटचाल करावी असे सांगितले. यावेळी कृउबास संचालक राजाराम काळने, खामगाव तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहान, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, धनंजय देशमुख, काँग्रेस अनुसुचित जाती विभागाचे सरिचटणीस गौतम गवई, खामगाव शहर अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, अनंतराव ताठे, सतीष चव्हाण, विजय इंगळे, गजाननराव वाकुडकर, संतोष चव्हाण, माणिकराव देशमुख, ॲड. अशोक इंगळे, बबलु भाई, पाडुरंग राखोंडे, ॲड.अविनाश इंगळे, युवक काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष अमित तायडे, मनोज बोद- डे, रवी नितोने, साहील देशमुख, सौरभ रिछारिया, चंद्रकांत मुंडीवाले, विशाल कवठेकर यांच्यासह काँ- ग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रधानमंत्री पीक विमा काढण्यासाठी मुदतवाढ

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि. २ :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी केंद्र शास- नाने मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचा पिक विमा काढण्याचा बाकी होता अशा शेतकऱ्यांनाही आता या योज- नेत सहभागी होता येणार आहे.

या योजनेत सहभा- गी होण्यासाठी अंतिम मुदत ३१ जुलै, २०२५ अशी होती. तथ- ापि, गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी सहभाग, ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी नसणे, तसेच पीएमएफबीवाय, आधार, सीएससी सर्व्हर आणि राज्याच्या भूमी अभिलेख पोर्टल- वरील तांत्रिक अडचणींमुळे शे- तकऱ्यांच्या सहभागावर परिणाम झाला. त्यामुळे, केंद्र शासनाने या योजनेत सहभागी होण्यास- ाठी मुदतवाढ दिली आहे.

आता, बिगर कर्जदार शे- तकऱ्यांसाठी योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत १४ ऑ- गस्ट, पर्यंत वाढवण्यात आली आहे. तर, कर्जदार शेतकऱ्यांसाठी ही मुदत ३० ऑगस्ट पर्यंत असेल. या वाढीव कालावधीत जिल्ह्या- तील सर्व शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घ्यावा. नोंदणी करताना कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता संबंधित विमा कंपनी व बँक यांनी घ्यावी, असे निर्देश शासनाने दिले आहे.

# दे.माळी येथे सेवापूर्ती सत्कार व निरोप समारंभ

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**दे.माळी दि.२ :** महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय दे.माळी येथे सेवाप- ुर्ती सत्कार व निरोप समारंभ सो- हळा संपन्न झाला.

शंकर भीमराव राठोड, व सुधा- कर विठोबा काळुसे या दोन शिक्षकांनी आपल अवघड आयुष्य ज्ञानदानासारख्या पवित्र ज्ञान देण्यात घातले. आणि त्यांच्या या ज्ञान दानाचेच सेवापूर्ती सोहळा व विद्यालयाकडून निरोप व सत्कार सोहळा दोन ऑगस्ट रोजी संपन्न झाला. राठोड यांनी विज्ञान, इंग्रजी या विषयातून विद्यार्थी घडवले. तर काळुसे यांनी अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या दोन विषयाचे डोज विद्यार्थ्यांना दिले. अनेक विद्यार्थी यांच्या हातून घडून चांगल्या पदा- वर कार्यरत आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष दि.स.अंभोरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्या- लयाचे माजी प्राचार्य भाऊसाहेब झोरे, एस.बी. गाभणे, आर.टी.



वानखेडे, एकनाथ बाहेकर, रा- ऊत, रघुनाथ भराड, एन.टी.मगर, सरपंच किशोर गाभणे, संचालिका प्रमिला गाभणे, स्वप्निल गाभणे, संचालक राजेश मगर, महाविद्या- लयाचे सर्व आजी-माजी प्राचार्य शिक्षक व आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते. यावेळी सत्काराला उत्तर देताना प्रा.काळुसे, व प्रा.रा- ठोड यांनी आतापर्यंत जी सेवा दिली तशीच सेवा भविष्यातही आम्ही द्यायला तयार आहोत अशा प्रकारची ग्वाही यावेळी त्यांनी दिली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना कुठल्याही अडचणी आल्या तर आम्ही सदैव मरेपर्यंत त्यांना मार्गदर्शन करू अशी सुद्धा ग्वाही विद्यार्थ्यांना दिली. व दोघांनीही गहिवरल्या पानावलेल्या डोळ्यांनी शब्दांना विराम दिला. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल कलोरे, व वाय.बी.गिरे यांनी केले तर आभार प्रदर्शन पर्यवे- क्षक अरुण फिस्के यांनी मानले. सदरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षके- तर कर्मचारी, व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# वाईज एकोकेअरतर्फे पालखी मार्गावर प्लास्टिक कचरा संकलन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२ :** दरवर्षीप्रमाणे यंदाही संत गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्यानिमित्त लाखो भाविक खामगाव ते शेगाव पायी म ार्गक्रमण करीत असताना पर्यावरणपूरक उपक्रम राबवित वाईज एकोकेअर या सामाजिक संस्थेने संचालक हर्षद हेंड पाटील यांचे म ार्गदर्शनात एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला.

पालखी मार्गावर हजार- ो भाविकांच्या वावरामुळे प्लास्टिकसारख्या पर्यावरणासाठी घातक कचऱ्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढते. ही बाब लक्षात घेऊन वाईज एकोकेअरच्या स्वयंसेवकांनी पालखी मार्गावर प्लास्टिक कचरा संकलन मोहीम राबवली. या उपक्रमात मोठ्या संख्येने तरुण स्वयंसेवक, म हिला, तसेच पर्यावरणप्रेमींनी सहभाग घेतला.



संस्थेचे स्वयंसेवक पालखी मार्गावरील विविध ठिकाणी उपस्थित राहून पाण्याच्या बाटल्या, थर्माकोल प्लेट्स, प्लास्टिक पिशव्या, कप यांसारखा एकत्रित प्लास्टिक कचरा गोळा करत होते. संकलित कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याचे योग्य प्रकारे विलगीकरण आणि नंतर पुनर्वापर प्रक्रियेस पाठवले जात आहे. वाईज एकोकेअरचे संचालक हर्षद जनार्दन हेंड पाटील म्हणाले की, ''आमचा उद्देश केवळ स्वच्छता राखण्यापुरता मर्यादित नसून पर्यावरण संवर्धन व भाविकांमध्ये जनजागृती घडवणे हा आमचा मूळ हेतू आहे. भाविकांनीही आमच्या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.'' संतांच्या पालखी मार्गावर स्वच्छता राखणे, पावित्र जपणे हे प्रत्येक भाविकाचे कर्तव्य आहे. वाईज एकोकेअर संस्थेचा हा उपक्रम इतर संस्थांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या मोहिमेसाठी स्थानिक प्रशासन, पोलीस विभाग, नगरपरिषद आणि स्थानिक ग्रामस्थ- ांनी सहकार्य केले. संत गजानन महाराजांच्या पालखी यात्रेप्रमाणेच या पर्यावरणपूरक सेव- ाभावी उपक्रमाचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १५०० - २३५० |
| गहू | १७५० - २५७५ |
| तुर | ५२०० - ६६२५ |
| हरभरा | ४६०० - ६२५० |
| सोयाबीन | ३८०० - ४६५० |
| भुईमुग | ४१०० - ५४०० |
| उडीद | ५४२५ - ५४२५ |
| मुंग | ६२०० - ६५०० |
| मक्का | २१५१ - २१५१ |
| तीळ | ७५६५ - ७६६५ |






अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, रविवार, दि.३ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


# पालकमंत्र्यांच्या गळ्यात १० प्रश्नांची माळ; डॉ. गोपाल बछीरे यांचा अनोखा निषेध

## शेतकऱ्यांच्या समस्या ऐकण्यासाठी प्रशासन गंभीर आहे का?

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि.२ :** बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या अतिवृष्टीग्रस्त लोणार तालुक्यातील पाहणी दौऱ्यात एक वेगळाच प्रसंग पाहायला मिळाला. विश्रामगृहात त्यांचे स्वागत करताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे यांनी त्यांच्या गळ्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नांची ''लेबल'' लावलेली माळ घालून अनोखे आणि मुद्देसूद आंदोलन केले.

या पुष्पमाळेत थेट १० गंभीर प्रश्नांची टॅग लावलेली होती, जे सध्याच्या शेतकरी समस्या आणि सरकारी उदासीनतेवर बोट ठेवणारे होते. पालकमंत्र्यांना घेरत त्यांनी हे प्रश्न जनतेसमोर मांडले.

**डॉ. बछीरे यांनी विचारलेले १० ज्वलंत प्रश्न:**



१. पश्चिम महाराष्ट्रप्रमाणे विदर्भातील शेतकऱ्यांना सरसकट अग्रीम नुकसानभरपाई कधी मिळणार?
२. गेल्या दोन वर्षांची गारपीट नुकसानभरपाई कधी मिळणार?
३. अतिवृष्टीग्रस्त क्षेत्रांना मदत कधी दिली जाणार?
४. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा कधी होणार?
५. ३ वर्षांपासून थकीत पीक विमा कधी वितरित होणार?
६. शेतकऱ्यांना पीक कर्जमुक्ती कधी मिळणार?
७. शेतकऱ्यांची वीज बिले माफ कधी होणार?
८. २०२५ च्या अतिवृष्टीची नुकसानभरपाई कधी जाहीर होणार?
९. राज्य शासन शेतकऱ्यांना कधी दिलासा देणार?
१०. घर-घर नल मे जल या योजनेतील भ्रष्टाचार थांबवून स्वच्छ पाणीपुरवठा कधी सुरू होणार?

**पालकमंत्र्यांची प्रतिक्रिया:** या सर्व प्रश्नांचे निवेदन मिळाल्यानंतर पालकमंत्री मकरंद पाटील यांनी जनसमुदायासमोर आश्वासन दिले की, ''लवकरच या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळतील, सरकार या प्रश्नांबाबत गंभीर आहे.''

यावेळी मेहकर-लोणारचे आमदार सिद्धार्थ खरात, शिवसेना (उबाठा) जिल्हा उपप्रमुख प्रा. आशिष रहाटे, तालुकाप्रमुख राजू बुधवत, शहरप्रमुख गजानन जाधव, महिला तालुका संघटिका तारामती जायभाये, संजीवनी वाघ, लूकमान कुरेशी, श्रीकांत मदनकर, तानाजी मापारी, सुदन अंभोरे सर, तानाजी अंभोरे, कैलाश अंभोरे, ज्ञानेश्वर दूधमोगरे, अशपाक खान, फहीम खान, रामभाऊ मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

ही अभिनव पद्धतीने केलेली आंदोलने शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे सरकारचं लक्ष वेधत असून, सरकार यावर फक्त प्रतिक्रिया न देता कृती करतील का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

---

## महत्त्वाचे

### बाबासाहेबांच्या पुतळ्या जवळील परिसरात पत्रकारांच्या हस्ते वृक्षारोपण

**मलकापुर :** येथील रेल्वे स्टेशन जवळील भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरामध्ये पत्रकारांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले आहे. येथील रेल्वे स्टेशन जवळील महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ स्वच्छ व सुंदर परिसरासाठी विविध प्रकारचे वृक्षारोपण कार्यक्रम समतेचे निळे वादळ संस्थापक अध्यक्ष भाईअशांत वानखेडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनामध्ये सामाजिक कार्यकर्ते डॉ. अशोकराव सुरडकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पत्रकारांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले त्यावेळी पत्रकार सतीश दांडगे, पत्रकार व प्रहार घटना बुलढाणा जिल्हा उपप्रमुख अजय टप, समतेचे निळे वादळ जिल्हा प्रसिद्धीमुख दिलीपभाऊ इंगळे ,पत्रकार गणेश तायडे, कैलास काळे, शेख निसार, यांच्यासह सतीश येवले ,गजानन ठोसर , छननुसिंग ठाकूर,अजय नरवाडे यासह आधी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### क्षुल्लक कारणावरून महिलेस जीवे मारण्याची धमकी

**नांदुरा :** नातेवाईक असलेल्या तिघांनी अश्लिल शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार नांदुरा नगर पालिकेच्या महिला कर्मचारी बेबी राजेश पांडे यांनी पोलिसात दिली. काल १ ऑगस्ट रोजी घडलेल्या घटनेप्रकरणी पोलिसांनी तक्रारीवरुन वैष्णवी अंबुसकर, विठ्ठल अंबुसकर व शोभा अंबुसकर रा. नांदुरा या तिघांविरुद्ध विविध कलमान्वये आज २ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोहेकॉ भीमराव वानखडे हे करीत आहेत.

### जुन्या वादातुन युवकाचा चाकूने भोसकून खून

**बुलडाणा :** जुन्या वादातून एका १९ वर्षीय युक्काचा चाकूने भोसकून निर्गुण खून झाल्याची घटना १ ऑगस्ट रोजी दुपारी चिखली रोडवरील नंगारा हटिलजवळ घडली. सनी सुरेश जाधव असे मृतकाचे नाव असून तो धामणदरी येथील रहिवासी आहे. मृतक सनी जाधव याचा काही दिवसापुर्वी काही युवकांसोबत वाद झाला होता. गेल्या तीन दिवसांपासून आरोपी सनीच्या मागावर होते. दरम्यान शुक्रवारी आरोपींनी त्याला चिखली रोडवरील नंगारा हॉटेलजवळील संजीवनी मार्बलच्या बाजूला सुरू असलेल्या एका कंस्ट्रक्शन साईटवर पाच आरोपींनी त्याला गाठले व चाकुने त्याच्या पोटात, बरगडीत, उजव्या पायावर व मांडीवर चाकूने सपासप वार केले. त्यामुळे रक्तबंबाळ अवस्थेत तो जागेवरच कोसळला. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. गंभीर जखमी अवस्थेत सनीला जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आणले मात्र रक्तस्त्राव अधिक झाल्याने त्याचा मृत्यू झाला.

### मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**खामगाव :** घंटागाडी व ट्रक्टर कंत्राटी सफाई कामगार व ड्रायव्हर यांच्या विविध मागण्या संदर्भात अखिल भारतीय सफाई मजदुर कामगार संघटना युवा प्रकोष्ठ खामगाव शाखेच्या वतीने मुख्याधिकारी नगरपरिषद खामगाव यांना निवेदन देण्यात आले. यावेळी युवा प्रकोष्ठचे जिल्हाध्यक्ष विकी का. सारवान, खामगाव शहराध्यक्ष विकी टाक, सुरेश सारवान, रोहित तंबोले, चेतन सारसर, कृष्णा पिवाल, पवन आटवले यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

---

## श्रावण सोमवारी नवनाथ पारायण सोहळाचे आयोजन



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.२ :** पवित्र श्रावण महिन्यानिमित्त श्री भुलेश्वर संस्थान व स्वामीसमर्थ केंद्र मलकापूर यांच्या संयुक्त विद्यमाने नवनाथ पारायण सोहळ्याचे आयोजन २८ जुलै ते ५ ऑगस्ट दरम्यान गजानन महाराज मंदीर गांधी-चौक मलकापूर येथे करण्यात आले. या अंतर्गत गायत्री मंत्राचा ६ लाख व स्वामी समर्थांच्या १२ लाख जप शहरातील अनेक भक्तांकडून करण्यात येत आहे. आदरणी गुरूमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आज्ञेने व आशिवर्दिाने गांधी चौक येथील गजानन महाराज मंदिराच्या नव्याने तयार करण्यात आलेल्या पारायण हॉलमध्ये हा सोहळा २८ जुलैपासून सुरू असून ५ ऑगस्टपर्यंत शहरातील अनेक भक्तगण या पारायण सोहळ्यात व नाम जप सोहळ्यात भाग घेत असून भक्तीमय वातावरणात श्री भुलेश्वर संस्थान व श्री स्वामी समर्थ केंद्र मलकापूरच्या सेवेकऱ्यांच्या सहकार्याने हा सोहळा पार पडत असून यामुळे सर्वत्र भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

## ओला दुष्काळ जाहीर करा- पांडुरंग पाटील

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.२ :** जून व जुलै महिन्यांत झालेल्या ढगफुटीसरख्या अतिवृष्टीमुळे मेहकर व लोणार तालुक्यांतील शेतजमिनी खरडून गेल्या असून, अनेक भागांमध्ये दुसऱ्यांदा व तिसऱ्यांदा पेरणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. परिणामी, यावर्षीच्या सरासरी उत्पन्नात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या दोन्ही तालुक्यांना ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष व शेतकरी नेते पांडुरंग पाटील यांनी केली आहे.

बुलढाणा येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत पांडुरंग पाटील यांनी संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी व शेतकऱ्यांसह पालकमंत्री मकरंद पाटील यांच्याशी विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. या वेळी त्यांनी प्रलंबित पिकविमा, येलो मोझॅक व डिसीज यामुळे रिजेक्ट झालेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीतही पाठपुरावा केला. तत्कालीन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी या शेतकऱ्यांना मंजुरी देण्याचे आदेश दिले होते, तरीही आजही मेहकरसह जिल्ह्यातील १,५९,००० शेतकरी वंचितच आहेत, असे पाटील यांनी निदर्शनास आणले. पाटील यांनी त्या वेळीचे आदेशपत्र व विमा कंपन्यांची आकडेवारी पालकमंत्र्यांसमोर सादर करत कारवाईची मागणी केली. यावर पालकमंत्री मकरंद पाटील यांनी निवेदनाची विशेष नोंद घेत लवकरच कृषीमंत्री दत्ता भरणे यांच्याकडे हा विषय मांडण्याचे आश्वासन दिले. याशिवाय, तुषार सिंचन, ठिबक सिंचन व फळबाग योजनेतील रखडलेले अनुदान तत्काळ देण्यात यावे, अशीही मागणी यावेळी करण्यात आली. सर्व विषयांवर लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री पाटील यांनी दिले.



या बैठकीला संभाजी ब्रिगेड नांदुरा तालुकाध्यक्ष दिलीप कोल्हे, मेहकर तालुका कार्यकारिणी सदस्य भारत दांदडे, रमेश चनखोरे, माजी सरपंच दीपक शिंदे, आशिष आंबेडकर, मिलिंद खंदारे, विवेक बाजड, दिलीप जाधव, हर्षल गिर्हे आदींसह जिल्हाभरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. पालकमंत्र्यांच्या सकारात्मक प्रतिसादावर पांडुरंग पाटील यांनी समाधान व्यक्त केले.

## पालखी सोहळ्यामध्ये सेवार्थ आकस्मित कक्ष व प्रथोमपचार केंद्र

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि. २ :** ''श्री संत गजानन महाराज'' यांच्या पालखी सोबत आज दि. ३१ जुलै २०२५ रोजी हजारो भाविकांनी पायी वारी केली यावेळी पालखी मार्गावर लासुरा फाटा येथे सिल्वरसिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, क्रिटिकल केअर व ट्रामा सेंटर, जलंब रोड, खामगाव तर्फे ''श्री संत गजानन महाराज'' यांच्या पालखी सोहळ्यामध्ये सेवार्थ आकस्मित कक्ष व प्रथोमपचार केंद्र दर वर्षी प्रमाणे याही वर्षी ठेवण्यात आला होता.

सर्व प्रथम ''श्री'' च्या प्रतिमेला वंदन करून शिबिराला सुरवात करण्यात आली, डॉ. गौरव लदधा, डॉ. निलेश टीबडेवाल, डॉ. सौ. मंजुश्री टीबडेवाल, डॉ. गणेश महाले , डॉ. गौरव गोयनका, डॉ. आनंद राठी यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला. आर. एम. ओ. डॉ. डॉ. यशोधरा , डॉ. शृती काळे , सिस्टर सुरेखा चव्हाण वार्डबोय गोपाल वाशीमकर यांनी आपली सेवा दिली .याचा लाभ हजारो भाविक भक्तांनी घेतला. हा कार्यक्रम यशस्वी व्हावा याकरिता नकुल साबळे व सुपरवाझर राजेश साटोटे यांनी परिश्रम घेतले . अशी माहिती हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी निलेश बैरागी यांनी दिली.

---

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती वृक्षारोपणाने साजरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.२ :** तालुक्यातील गट ग्राम पंचायत कालखेड- गोळेगाव खुर्द येथील ग्रामपंचायत कार्यालयात दि.१ आगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात आली. ही जयंती केवळ त्यांच्या फोटोला हार व पुष्प वाहून साजरी न करता या निमीत्त वृक्षरोपणा सारगा अनोख्या उपक्रमाने जयंती साजरी करण्यात आली.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती दिनाचे औचीत्य साधत कालखेड येथे विवीध ठिकाणी वृक्षरोपण करण्यात आले. आज दि. १आगस्ट रोजी कालखेड येथील ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच पवन बरींगे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतीमेचे पुजन करण्यात येऊन माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर कालखेड येथील प्राथमीक शाळेच्या प्रागणात पिंपळ व वडाची झाडं लावण्यात आली. तसेच अंगणवाडी एक व दोन परीसरात व स्मशानभूमी लगत सुद्धा वृक्ष लागवड करण्यात आली. या वृक्षरोपणात पिंपळ,वड,फणस व अंजीर कडूनिंब आदी. अकरा झाडांचा समावेश आहे. जयंती अभिवादन कार्यक्रमाला व वृक्षरोपणाला उपसरपंच पंडीत परघरमोर ,सचिव सुषमा सावरकर, मुख्याध्यापिका माया मसने,शिक्षक आशिष नाचने अंगणवाडी सेविका भारती हेलोडे,शुद्धमती गणेश,ज्योती शेगोकार,सत्यभामा चोखंडे आदींसह शालेय विद्यार्थ्यांची उपस्थीती होती.

## जैन समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न- ललित गांधी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**देऊळगाव राजा दि.२ :** जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून उपेक्षित असलेल्या जैन समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय जैन अल्पसंख्यांक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केले.

राज्य शासनाने जैन समाजासाठी संपूर्ण अधिकार व निधीसह महामंडळ स्थापन करून अध्यक्षपदी ललित गांधी यांची नियुक्ती केली. त्यांचा राज्यव्यापी दौरा सुरू असताना देऊळगाव राजा शहरात सकल जैन समाजाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना देशात व राज्यातील सकल जैन समाजापैकी ३० टक्के समाज हा अजूनही अल्पभूधारक असून अनेक भागात मजुरी करून उदरनिर्वाह करीत आहे. सर्व सकल जैन समाज हा आर्थिक सक्षम आहे हा समाजाचा भ्रम असल्याचे मत महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मांडले. जैन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ काम करणार असून केंद्र व राज्य सरकारच्या जैन समाजासाठी ज्या ज्या योजना आहे त्या शेवटच्या जैन समाजापर्यंत पोहोचवण्याचे काम सर्वांनी करण्याचे आवाहन केले.देऊळगाव राजा येथे त्यांनी धावत्या भेटीत समाज बांधवांना सांगितले की राज्यातील जैन समाजाचे कल्याण व विकास सामाजिक सक्षमीकरण करणे,अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देणे, साधनसामग्री आणि तांत्रिक व साधने पुरवणे समाजाच्या कल्याणासाठी योजना सुरू करणे, प्राचीन जैन तीर्थांचे संरक्षण व संवर्धन करने,कायम पायी विहार करणाऱ्या जैन साधुसंतांच्या विहारासाठी सुरक्षा, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व शैक्षणिक कर्ज व्यवस्था,जैन समाजाच्या विधवा व परितक्त्या महिलांसाठी विशेष योजनांचा सहभाग असल्याची त्यांनी सांगितले. यावेळी सकल जैन समाजाच्या वतीने त्यांचा यथोचीत सन्मान करण्यात आला.यावेळी त्यांच्यासोबत ऋषिकेश कोंडेकर व सकल जैन समाज बांधव उपस्थित होते.



---

## पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव व शैक्षणिक किटचे वाटप

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२ :** व्हॉइस ऑफ मीडिया खामगाव तालुका व शहर शाखेच्या वतीने ता.२६ जुलै रोजी स्थानिक पत्राकार भवन येथे तालुक्यातील पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव व शैक्षणिक किट वाटप तसेच खामगाव प्रेस क्लबच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार शरद देशमुख होते तर प्रमुख अतिथी म्हणून खामगाव पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी गजानन गायकवाड, नगर परिषदेचे उपमुख्य अधिकारी आनंद देवकते, खामगाव प्रेस क्लबचे अध्यक्ष तथा व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष किशोर आप्पा भोसले, ज्येष्ठ पत्रकार जगदीश अग्रवाल, प्रा.मोहम्मद फारुख, अनिल खोडके, योगेश हजारे उपस्थित होते. सर्वप्रथम महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आद्य पत्राकार बाळशास्त्री जांभेकर, आद्य महिला पत्रकार तानुबाई बिर्जे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून व्हॉईस ऑफ मिडियाच्या उपक्रमाचे कौतुक केले. त्यानंतर खामगाव प्रेस क्लबचे नवनियुक्त पदाधिकारी किशोरआप्पा भोसले, नितेश मानकर, मोहन हिवाळे, आकाश पाटील, किरण मोरे, मुबारक खान यांचा संघटनेकडून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदीप अनिल खोडके, अयान मुबारक खान, देवांशी सुनील गुळवे, स्वराज चंद्रकांत मुंडीवाले, जानवी गजानन तायडे या विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट वाटप करण्यात आले तसेच इय्यता दहावी, बारावीच्या परिक्षेत उत्तीर्ण गौरी शांताराम तायडे, लकी मोहन हिवाळे, देवम बबलू देशमुख, मयूर राजेंद्र निरपगार, कृष्णकांत चंद्रकांत मुंडीवाले, पुनम अनिल मुंडे, समीक्षा पंकज गमे, प्रणील गिरीश राऊत या विद्यार्थ्यांचा बक्षीस व प्रमाणपत्रा देऊन गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाचे संचालन संभाजीराव टाले, प्रास्ताविक नाना हिवराळे तर आभार सिद्धांत उंबरकार यांनी मानले. यावेळी तालुकाध्यक्ष मंगेश तोमर, शहर अध्यक्ष सुमित पवार, तालुका सचिव सिद्धांत उंबरकार, शहर सचिव पंकज गमे, धनंजय वाजपे, राहुल खंडारे, आनंद गायगोळ, अमोल गावंडे, सैय्यद अकबर, गणेश पानझाडे, संतोष करे, सचिन बोहरपी, निखिल देशमुख, शांताराम तायडे, सुनिल गुळवे, रूपेश कलंत्री, अजय लोखंडे, संतोष आटोळे, यांच्यासह पत्रकार बांधव व विद्यार्थी, त्यांचे पालक उपस्थित होते.

## उकळी बु.येथे अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**संग्रामपुर दि.२ :** संग्रामपूर तालुक्यातील जवळच असलेले उकळी बु। येथे अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात व थाटामाटाने साजरी करण्यात आली. सविस्तर वृत्त असे की, जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा उकळी बु। येथे महान साहित्याक, प्रबोधनकार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती थाटामाटात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विनोद गव्हाळे (अध्यक्ष,शाळा व्यवस्थापन समिती उकडी बु.) हे होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये रामेश्वर पोहेकर (ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त, तेल्हारा) रवींद्र विरघट तेल्हारा, अनिल गवई शाळा व्यवस्थापन समिती (अध्यक्ष, जि. प. शाळा उकळी बाजार) के. एम. डाबेराव (मुख्याध्यापक) पंकज गोमासे (ग्रंथपाल) आशिष तायडे, शंकर बगाडे, भिमराव परघरमोल यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यानंतर कु. कोमल पिंजरकर व कु. दिशा पवार या विद्यार्थिनींनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन गजेंद्र सुलतान (शिक्षक) यांनी केले, तर कार्यक्रमाला कोकिळा बोपटे, हिरुताई अंभोरे, स्नेहा व्यवहारे या शिक्षीकांसह गावातील तुकाराम गवई, बाळू पवार, तुकाराम वानखडे, शंकर गवई यांची उपस्थिती होती.

अजिंक्य भारत
# आपलं वाशिम
अकोला, रविवार, दि.३ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांवर गुन्हा दाखल

**वाशिम** : मालेगाव येथील ३० वर्षीय विवाहितेचा हुंड्यासाठी शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरूद्ध मालेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, तिचा पती सिद्धांत गजानन हिंगे (रा. विमाननगर, पुणे), सासरे गजानन दयाराम हिंगे, सासू, नणंद व तिचा पती उदय प्रकाश गायकवाड यांनी ''तू फोर व्हीलर कार घेण्यासाठी हुंडा दिला नाहीस'', या कारणावरून तिला सतत शिवीगाळ करत शारीरिक व मानसिक छळ केला.

### बाजूला सरकण्यासाठी हॉर्न वाजविल्यावरून तरुणास मारहाण

रिसोड : वाहतूक मार्गावर मध्यभागी उभ्या असलेल्या तरुणास बाजूला होण्यासाठी सांगितल्याने वाद निर्माण झाला. त्याचे पर्यवसान मारहाणीत होऊन एका तरूणास मारहाण करण्यात आल्याची घटना लोणी (ता. रिसोड) येथे ३० जुलै रोजी घडली. रवी बाळासाहेब बारामतीकर (२८) या तरूणाच्या तक्रारीनुसार, तो दुचाकीने जात असताना शुभम हरी लष्कर रस्त्यामध्ये उभा होता. त्याला हॉर्न देत बाजूला होण्यास सांगितले असता त्याने रागाच्या भरात वाद घालत वार केला.

### सोयाबीन पिकाच्या पेरणी क्षेत्रात लक्षणीय घट

मालेगाव : तालुक्यात यावर्षी पारंपरिक समजल्या जाणाऱ्या सोयाबीन पिकाच्या पेरणी क्षेत्रात लक्षणीय घट झाली असून, दुसरीकडे हळद लागवडीत सरासरी २० टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. खरीप हंगामात सोयाबीन हे तालुक्यातील प्रमुख पीक असून, गेल्या अनेक वर्षांपासून ७० ते ८० टक्के शेतीमध्ये याच पिकाची पेरणी केली जात होती. कमी खर्चात अधिक उत्पन्न देणारे पीक म्हणून शेतकऱ्यांचा सोयाबीनकडे कल होता. मात्र, मागील तीन ते चार वर्षांपासून सोयाबीन उत्पादनात घट आणि बाजारभावातील अस्थिरता यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

### मालेगावात पोलिसांचे मॉक ड्रिल!

वाशिम : आगामी सण-उत्सव व गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना म्हणून मालेगाव पोलिस स्टेशन येथे मॉक ड्रिल घेण्यात आली. जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनानुसार आदेशानुसार ही कवायत दिनांक ३० जुलै रोजी पार पडली. या प्रशिक्षणासाठी वाशिम जिल्हा पोलिस मुख्यालयातील प्रशिक्षित कवायत पथकाच्या प्रशिक्षकांनी मालेगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांना दंगा नियंत्रणासाठी ~~आवश्यक कौशल्ये व उपाययोजना~~ प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे समजावून सांगितल्या.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत चार बकऱ्या जागीच ठार

मानोरा : तालुक्यातील कुपटा घाटात ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजताच्य सुमारास भरधाव अज्ञात वाहनाने बकऱ्यांना चिरडल्याची घटना घडली. य अपघातात चार बकऱ्या जागीच ठार झाल्या. ही घटना मानोरा-कुपटा मार्गाव घडली असून, संबंधित वाहन चालक अपघातानंतर घटनास्थळावरून पसार झाला.

# दारु विक्रीला ‘खाकी’चा आशीर्वाद?

## अल्पवयीन मुले नशेच्या आहारी: पोलिसांनी लक्ष द्यावे

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

रिसोड, दि. २ : तालुक्यातील कुऱ्हा येथील ग्रामपंचायत हद्दीत मागील काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात अवैध दारूची विक्री होत असल्याने वादविवाद, भांडण तंटे वाढले असून, महिलावर्गही मोठ्या प्रमाणात त्रस्त झाला आहे. अनेक तरुण या व्यसनाकडे वळल्याने अनेकांचे संसार उद्ध्वस्त तसेच उघड्यावर पडले आहे. यामुळे गावातील महिलांनी एकत्र येत अवैधरीत्या दारू विक्री बंद करावी, अशी मागणी रिसोड पोलिसांकडे करण्यासाठी १ ऑगस्ट रोजी मोर्चा काढला होता.



तालुक्यातील रिसोड स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कुऱ्हा गावामध्ये सरकारमान्य परवानाधारी दारू दुकान नसतानाही अवैध दारु विक्री होत आहे. काही जवळपासच्या गावात किराणा दुकानात, हॉटेलमध्ये दारुची विक्री होत आहे. दारु ही पार्सल करून विक्री केल्या जात आहे. अनेकांचे संसार दारूमुळे उद्ध्वस्त झाले आहेत. दारु कुठे व कशी मिळते, हे गावातील लहान मुलांनाही माहिती आहे; मात्र बिटमधील जबाबदारी असलेले पोलीस व संबंधित विभागाच्या अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे हा अवैध दारू विक्रीचा गोरखधंदा राजरोस चालू आहे. अवैध दारू साठा गावांमध्ये मिळत आहे; मात्र बीट प्रमुखांचे याकडे दुर्लक्ष होत असून, ग्रामीण भागातील गावांना दारू विक्रीची सूट दिली की काय, अशी चर्चा होत आहे. त्यामुळे अवैध दारुचा साठा या छोट्याशा गावांमध्येही होत असताना दारुच्या आहारी तरुण मुले तरुण वयात येण्याच्या अगोदर दारुचे प्राशन करून अनेक संसार उघडे पडले असून, काही महिलांचे मुलं, पती व्यसनाधीन झाले आहेत. मात्र याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. कुऱ्हा गावातील अवैध दारू विक्रीमुळे होणाऱ्या रोजच्या किटकिटी, भांडण, तंटे व व्यर्थ खर्च, यामुळे गावातील महिला वैतागलेल्या आहे. दारूमुळे अल्पवयीन मुलेसुद्धा नशेच्या आहारी जात आहेत. यामुळे मुलांच्या अभ्यासावर परिणाम होत असून त्यांच्या भविष्याच्या परिणामाबद्दल पालकांना चिंता आहे.या दारूमुळेच अनेक संसार उद्ध्वस्त होऊन अनेक संसार उद्ध्वस्तीच्या मार्गावर आहेत. महिलांनी आपली दैनंदिन कामे करायची व रात्री दारूमुळे घरातील माणसाच्या किटकिटी ऐकायच्या, या सर्व बाबीला कंटाळल्या. यामुळे रिसोड तालुक्यातील कुऱ्हा येथील महिला १ ऑगस्ट रोजी संध्याकाळी रिसोड पोलीस स्टेशनला धडकल्या. या ठिकाणी ठाणेदार व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे गावातील दारू बंद करण्यासंदर्भात मागणी केली. या व्यतिरिक्त गावात कोण कोण दारू विकत आहे. याबद्दलही महिलांनी पोलीस अधिकाऱ्यांना सांगितले. रिसोड तालुक्यातील कुऱ्हा येथे दारूचा अक्षरशः महापूर आला असल्याचे महिलांनी सांगितले. या ठिकाणी बिनधास्तपणे अवैध दारू विक्रेते हे विक्री करत असून, कोणाचीही ऐकण्याच्या मनस्थितीत ते नाही व त्यांचे मनोबल खूप वाढले असल्याचे कुऱ्हा येथील महिलांचे म्हणणे आहे. आपली व्यथा मांडण्यासाठी रिसोड पोलीस स्टेशनला आलेल्या महिलांसोबत पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी चर्चा केली व लवकरच गावात येऊन अवैध दारू विक्रेत्यांचा बंदोबस्त करणार, असे सांगितले. यावेळी कुऱ्हा येथील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

> “ गावातील अवैध दारू विक्रीचा विषय अत्यंत गंभीर असून, याचा महिला व मुलांवर वाईट परिणाम होत आहे. दारूमुळे होणारे दुष्परिणाम बघता ग्रामसभेत ठराव घेऊ. गावातील दारू कायमचीच बंद करण्यासाठी पोलीस अधीक्षकांना विनंती करू.
>
> \- भारत देविदास नागरे
> सरपंच, कुऱ्हा ता. रिसोड.

### व्हॅक्सिन बॉक्स चोरीप्रकरणी तीन अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

कारंजा, दि. २ : समृद्धी महामार्गावर एका ट्रकमधून २ कोटी ४३ लाख रुपयांच्या व्हॅक्सिन चोरीची घटना २३ जुलै रोजी घडली होती. याप्रकरणी ३१ जुलै रोजी कारंजा ग्रामीण पोलिसांत तीन अज्ञात चोरट्यांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(एमएच ०४ जेके ७०५४) क्रमांकाचा कार्गो ट्रक ४ कोटी ५८ लाख रुपये किमतीच्या व्हॅक्सिन भिवंडी येथून समृद्धी महामार्गाने नागपूर-रायपूर मार्गे कोलकाता येथे घेऊन जात होता. या ट्रकमधील २३ जुलै रोजी सायंकाळी ७ ते ८ वाजताच्या दरम्यान, डोणगाव पेट्रोल पंप ते कारंजा हद्दीतील पेट्रोल पंपादरम्यान या ट्रकमधील २ कोटी ४३ लाख ८७ हजार ६८४ रुपये किमतीच्या ४६ व्हॅक्सिन लंपास झाल्याचे चालकाच्या निर्दशनास आहे. त्यामुळे त्याने तत्काळ ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना घटनेची माहिती दिली. फिर्यादी मनोज कुमार शर्मा यांच्या फिर्यादीवरून याप्रकरणी कारंजा ग्रामीण पोलिसांनी अज्ञात तीन व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करून प्रकरण तपासात घेतले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार प्रवीण शिंदे यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक संतोष इंगळे करीत आहेत.

## १८ महसूल अधिकारी, कर्मचारी सन्मानित!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. २ : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही
वाशिम तहसील कार्यालयात महसूल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १८ महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला, तसेच मागील वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला.
तहसील कार्यालयाच्या नव्या सभागृहात उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांच्या अध्यक्षतेखाली महसूल दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाला तहसीलदार निलेश पळसकर, गटविकास अधिकारी रविंद्र सोनुने, भूमी अभिलेख उपअधीक्षक प्रवीण कुंजीर, वर्ग १ दुय्यम निबंधक विजय सूर्यवंशी आणि नायब तहसीलदार कैलाश देवळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्याप्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. यानंतर तहसीलदार निलेश पळसकर यांनी प्रास्ताविक, तर उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले. या कार्यक्रमात मागील वर्षभरात सेवानिवृत्त झालेल्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

## महसूल विभाग प्रशासनाचा कणा: जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. २ : योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचावा, शासकीय सेवेचा पारदर्शक आणि वेळेवर पुरवठा व्हावा, हेच या अभियानाचे ध्येय आहे. प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जनतेच्या सेवेसाठी कर्तव्य भावनेने काम करावे, हीच अपेक्षा व्यक्त करते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी केले.

१ ऑगस्ट रोजी महसूल दिन सप्ताहाचा शुभारंभ जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानावरुन बुवनेश्वरी बोलत होत्या. प्रमुख



अतिथी म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे,मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, वाशिमच्या उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, कारंजाचे उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, वाशिमचे तहसीलदार निलेश पळसकर,कारंजाचे तहसीलदार कुणाल झाल्टे, मालेगावचे तहसीलदार दीपक पुंडे, रिसोडच्या तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर,मानोराचे तहसीलदार डॉ.संतोष येवलीकर आदीची प्रमुख उपस्थिती होती. बुवनेश्वरी पुढे म्हणाल्या, महसूल विभागाच्या कामाची तुलना इतर विभागांशी होवू शकत नाही. मोठे कामे करण्याची जबाबदारी महसूल विभाग सातत्याने पार पाडतो. महसूल विभागाकडून विविध कामे केली जातात. काम अधिकाधिक चांगले कसे होईल यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी प्रयत्न करावा. वाशिम जिल्हा प्रशासनाने गेल्या काही काळात अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत, त्यामध्ये जलतारा, चिया अभियान आणि पंतप्रधानांच्या दौऱ्याचे नियोजन ही उल्लेखनीय उदाहरणं आहेत. या सगळ्या यशोगाथा केवळ माझ्या किंवा काही अधिकाऱ्यांच्या कामामुळे नाहीत त्या आपल्या सगळ्यांच्या सामूहिक प्रयत्नांनीच शक्य झाल्या आहेत. असे गौरवोद्गार जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. यावेळी साहेबराव नप्ते , ज्ञानेश्वर अवधूत ,पुनम इंगोले , विशाल डुकरे, तहसीलदार कुणाल झाल्टे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यामध्ये कारंजाचे उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली देवकर, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, तहसीलदार संतोष येवलीकर आदिंचा समावेश आहे.

## सेवानिवृत्त संघटनेची उद्या सभा; उपस्थित राहण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. २ : जिल्ह्यातील महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून कोणत्याही विभागातील सेवानिवृत्त झालेल्या आणि निवृत्ती वेतन घेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची एक समविचारी सभा बैठक रविवार दि.३ ऑगस्ट रविवार दुपारी २ वाजता श्री शिवाजी हायस्कूल वाशिम च्या ''आप्पासाहेब सरनाईक सभागृह'' या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.
या सभेला महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष आणि अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ सत्यनारायण बाहेती अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष रामभाऊ बिरकड तसेच सचिव एकनाथराव उके हे उपस्थित राहणार आहेत. अलीकडेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अनेक बातम्या आणि सोशल मीडियावर पोस्ट सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मनात धडकी भरवत आहेत. पेन्शन मध्ये अनेक बदल शासन करू पाहत आहे असे अनेकांचे मत आहे. आणि सेवानिवृत्तांच्या अनेक समस्या आहेत पण त्यावर भांडणारे कोणी नाही ही गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेले सरकारी निमसरकारी कर्मचारी यांची एक संघटना स्थापन करण्यात आली आहे त्या संघटनेची शाखा वाशिम जिल्ह्यामध्ये निर्माण करायची असून यामध्ये शिक्षण विभाग आरोग्य विभाग महसूल विभाग अशा अनेक महाराष्ट्राच्या विभागातील कर्मचारी तसेच माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक ,प्राथमिक शिक्षक, जिल्हाधिकार्यालयातील अधिकारी, कर्मचारी जिल्हा परिषद कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, नर्सेस, लिपिक वर्गीय कर्मचारी, शिपाई वर्ग, या सभेमध्ये सेवानिवृत्त सदस्यांच्या असणाऱ्या समस्या त्यावर चर्चा आणि मार्गदर्शन करण्यात येईल.

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्साहात

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. २ : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती १ ऑगस्ट रोजी शहरात सामाजिक सलोखा जपत हर्षोल्लासात साजरी करण्यात आली. विविध फुलांनी सजविलेली अण्णा भाऊ साठे यांची प्रतिमा वाहनात विराजमान करून मुख्य मार्गावरून काढण्यात आलेल्या मिरवणुकीत ढोल-ताशांच्या गगनभेदी निनादावर थिरकत तरुणाईने मोठा जल्लोष केल्याचे दिसून आले.
अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुका रात्री उशिरापर्यंत सुरू होत्या.




मिरवणुकीची सुरुवात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून झाली. यावेळी राम बाजड, उपाध्यक्ष कैलास थोरात, सचिव रवि कांबळे, कोषाध्यक्ष गजानन वैरागडे, सहसचिव मोहनराज दुतोंडे, दिलीप जोशी आदींनी हजेरी लावून अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर, मिरवणूक मार्गस्थ झाली. यावेळी व्यासपीठावर साहित्यरत्न डॉक्टर अण्णाभाऊ साठे जिल्हास्तरीय उत्सव समिती संस्थापक अध्यक्ष राम बाजड, उपाध्यक्ष कैलास थोरात, सचिन रवी कुमार कांबळे, कोषाध्यक्ष गजानन वैरागडे, सहसचिव मोहनराज दुतोंडे, सदस्य शंकर पाटील खंडारे, पद्मश्री नामदेवराव कांबळे, आमदार शामभाऊ खोडे व आमदार सई डहाके, प्रा. दिलीप जोशी , संत गोपाल बाबा, भाजपा शहराध्यक्ष मनीष भाऊ मंत्री, माजी उपाध्यक्ष बंटी वाघमारे, श्रीमती शांताबाई हनवते, आनंद सुतार, डॉ. काळे व डॉ. देवळे, राहुल तुपसांडे, उमेश मोहळे, संतोष भाऊ शिंदे, मनसे जिल्हाध्यक्ष राजूभाऊ किड्से, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कैलास थोरात, उपाध्यक्ष बाळासाहेब जोगदंड, सचिव गणेश उफाडे, कोषाध्यक्ष वासुदेव गायकवाड , कार्याध्यक्ष दीपक लगड, पांडुरंग वैरागडे, संतोष भालेराव, कैलास रणशिंगे, सुनील दळवी, संतोष माऊली खंडारे , रमेश गायकवाड, गोपाल जोगदंड आदिंची उपस्थिती होती.

**निवेदन** | मशिद विश्वस्ताची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

## कायदेशीर आवाजात भोंग्याला परवाना द्या!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

रिसोड, दि. २ : पोलीस प्रशासनाने लाऊडस्पिकर काढण्याची कारवाई न करता, योग्य अटी व शर्तीचे अधीन राहून लाऊडस्पीकर वापरण्यासाठी आवश्यक परवानग्या त्वरित आणि सुलभपणे उपलब्ध करून देण्यासाठी कारवाई करावी, अशी मागणी वाशिम जिल्ह्यातील मस्जीद ट्रस्टी यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.
महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालकांनी लाऊड स्पीकर वापर आणि विहित ध्वनी पातळीच्या उल्लंघनावर तत्काळ कारवाई करण्यासाठी सर्व आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांना व्यापक स्टँडिंग ऑपरेटिंग प्रोसिजर जारी केली आहे. यामध्ये फील्ड स्तरावरील अधिकाऱ्यासाठी महाराष्ट्र पोलीस कायदा आणि पर्यावरण संरक्षण कायदा



अंतर्गत जबाबदाऱ्या तपशीलवार नमूद केल्या आहेत. ही प्रक्रिया विशेषत: धार्मिक किंवा सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या आवाजाच्या नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी आहे. त्यात ‘लाऊड स्पीकर वापरण्यास संपूर्ण बंदी’ असे कुठेच नमूद नसूनसुद्धा वाशिम जिल्हा पोलीस प्रशासनाने धार्मिक स्थळावरील लाऊड स्पीकर काढण्याची कारवाई सुरू केली आहे. पोलीस महासंचालक यांचे मार्गदर्शक तत्त्वानुसार तथा माननीय सर्वोच्च न्यायालय यांचे ध्वनी विनियमन व नियंत्रण नियम २००० चे परिशिष्ट नियम ३(१) व नियम ४(१)) अन्वये मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिवस म्हणजे सकाळी ६.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत ध्वनीच्या संदर्भात अंबिअंट एअर क्वालिटी स्टँडर्डनुसार डेसिबलची मर्यादेबाबतच्या क्षेत्रनिहाय ठरवून दिलेल्या आवाजाच्या मर्यादेत लाऊड स्पीकर वापरण्यास परवानगी असतानाही तो हटविण्याची कारवाई केली जात आहे, हे उचित नाही. यामुळे धार्मिक सलोख्यावर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे, तसेच जनतेमध्ये गैरसमज निर्माण होत आहे. उच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिकेच्या ३४०१ ऑफ २०२५ ची सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने अशी टिपणी केली की ‘ प्रार्थनेसाठी अजान हे उपासकांना मस्जिद मध्ये आमंत्रित करण्याचे एक साधन आहे जर लाऊड स्पीकर भोंगे काढून टाकले तर मस्जिद प्रशासन नमाज पठणासाठी कसे आमंत्रित करेल. आपणांस लक्षात आणून देतो की मस्जिद मध्ये लाऊड स्पिकर फक्त अजान पठणासाठी व मय्यतीच्या घोषणेसाठी वापरण्यात येते आणि दिवसात फक्त पाच वेळा त्याचा वापर करण्यात येतो. एक वेळचे अजानसाठी फक्त आणि फक्त दोन ते तीन मिनिटे लागतात तेही आम्ही शासनाचे निर्देशानुसार ठरवून दिलेल्या आवाजाच्या मर्यादेतच वापरत असून, त्यामुळे ध्वनी प्रदूषण नाही होणार, याची काळजी स्वतः मस्जिदचे विश्वस्त घेतात.

## निर्भया पथक कार्यान्वित करा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मानोरा, दि. २ : व्यापारी संघटना मानोरा यांनी २ ऑगस्ट रोजी मानोरा पोलीस स्टेशन ठाणेदार नयना पोहेकर यांना निवेदन देऊन निर्भया पथक स्थापन करण्याची मागणी केली.

निवेदनामध्ये म्हटले की, मानोरा शहरात मातोश्री सुभद्राबाई पाटील महाविद्यालय, एलएसपीएम हायस्कूल, इंदिरा गांधी कन्या हायस्कूल, वसंतराव नाईक हायस्कूल, रहेमानिया उर्दू हायस्कूल,सुलेमानिया उर्दू हायस्कूल, चिंतामणी शाळा, जिल्हा परिषद शाळा, अनेक कॉन्व्हेंट, अनेक कॉम्प्युटर सेंटर आहेत. शहर व तालुक्यातील असंख्य गावे, तांडे व पाढ्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन तथा तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थिनी शहरातील खासगी व शासकीय शिक्षण संकुलांमध्ये दररोज येत असतात. विद्यार्थिनींना शाळांमध्ये जाण्यासाठी बस स्टॅन्ड, रिक्षा स्टॅन्डपासून पायी जावे लागत असल्याने उडानटप्पू व विकृत मानसिकता असणाऱ्यांचे फावत असल्यामुळे विद्यार्थिनी तथा महिलांना अशा उपद्रवी लोकांचा त्रास सहन करावा लागतो.

वाईट मानसिकता असणाऱ्यांचे अपकर्म थोपण्यासाठी निर्भया पथकाची स्थापना करून नियमित गस्त घातल्या गेली तर विद्यार्थिनी व पोरीबाळींच्या सुरक्षेची खात्री निर्माण होणार असल्याचे व्यापारी मंडळाच्यावतीने दिलेल्या निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे. बस स्टॅन्ड या सर्व ठिकाणी निर्भया पथकाच्या गस्तची मागणी केली. यावेळी राजू गुल्हाने अध्यक्ष व्यापारी संघटना मानोरा, श्याम हेडा उपाध्यक्ष व्यापारी संघटना आदी उपस्थित होते.

# आता पर्यटन विशेष गाड्या सवलतीसह प्रवासी सेवेत

## प्रवासी सवलती योजनेसह दर रविवारी चिखलदरा बस झाली सुरू

। सिद्धार्थ तायडे ।

अकोला, दि. २ : राज्यातील धार्मिक व भाविक पर्यटकांची मोठी गर्दी असते. पर्यटनस्थळांना व सुट्याच्या कालावधीत प्रवासी अशास्थळी जाणे पसंत करतात. एसटी महामंडळाच्या यात्रा बस उपक्रमांना नेहमीच प्रतिसाद असतो. याच धर्तीवर प्रवास सवलती योजनेसह कायमस्वरुपी धार्मिक पर्यटनस्थळ टूर पॅकेज उपक्रम राबविण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. पॅकेज टुर्स उपक्रमांतर्गत अकोला आगार क्रमांक २ मध्यवर्ती बसस्थानक येथून प्रत्येक रविवारी सकाळी ७ वाजता अकोला ते चिखलदरा बस सुरू करण्यात येत आहे. पर्यंटन प्रेमी आणि सवलतधारक प्रवाश्यांनी लाभ घेण्याचे एसटी प्रशासनाने आवाहन केले आहे.

मागील वर्षी एसटी महामंडळाने नवरात्रीच्या काळात देवी दर्शन स्पेशल गाड्या सोडून भविकांच्या राज्य शासनाने दिलेल्या सवलतीसह एसटी गाड्या उपलब्ध करून दिल्या होत्या. त्याच धर्तीवर आता किमान ४० प्रवासी पर्यटनांसाठी असल्यास एसटी बस जिथे असतील तिथे पोहोचून पर्यटन स्थळी पोहोचविणार आहे, तर नियमितपणे चिखलदरासह इतर पर्यटन स्थळी एसटी गाड्या उपलब्ध करून दिल्या जात आहेत. यामध्ये राज्य



शासनाच्या सवलती लागू होतील. या धार्मिक व पर्यटनस्थळासाठी ३५ ते ४० प्रवाश्यांच्या गटाने मागणी केल्यास बस उपलब्ध करून देण्यात येणार असून, टूर पॅकेज उपक्रमाचा प्रवाश्यांनी लाभ घ्यावा,असे आवाहन महामंडळाच्या अकोला विभागीय कार्यालयाने केले आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात पकेज टुर्स वाहतूक करण्याबाबत सूचना एसटी महामंडळाच्या धार्मिक मध्यवर्ती कार्यालयाने सर्व विभागांना दिल्या. त्यानुसार विभागातील प्रवासी सवलती जसे अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक व महिला सन्मान योजना या सर्व सवलती टूर पॅकेज अंतर्गत समाविष्ट असल्याबाबत माहितीचा प्रसार करण्यात येत आहे. एसटी आगारांतर्गत भागातील ३५ ते ४० प्रवाशांचा गट असल्यास महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे जसे की, अष्टविनायक दर्शन, ४ ज्योतीलिंग मंदिर, देवीची साडे पर्यटनस्थळी जाण्या साठी बस सुरू करण्यात येत आहे. सन २०२४-२५ या कालावधीत नवरात्रोत्सवदरम्यानअकोलाआगार १, अकोला२ व मुर्तिजापुर या आगारांद्वारे अकोला जिल्हयातील,अमरावती जिल्ह्यातील भाविकांसाठी देवीदर्शनाकरिता फेऱ्या चालविण्यात आलेल्या आहेत. यात्रा बसेस उपक्रमातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त झाले आहे. पँकेज टूर्स उपक्रमात विभागातील सर्व आगारांनी राज्यातील असलेल्या धार्मिकस्थळी आणि प्र्यटनस्थळी टूर्स पैकेज अंतर्गत वाहतृक सेवा सुरु करण्यात येत आहे.

तीन शक्तीपीठ,पंढरपूर, अक्कलकोट, शिर्डी ,शेगाव इत्यादी व महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे जसे ताडोबा, चिखलदरा, भंडारदरा, अजिंठा,वेरूळ, महाबळेश्वर इत्यादी ठिकाणी सेवा उपलब्ध आहे.

पॅकेज टुर्स उपक्रमांतर्गत अकोला आगार क्रमांक २ मध्यवर्ती बसस्थानक येथून प्रत्येक रविवारी सकाळी ७ वाजता अकोला ते चिखलदरा बस सुरू करण्यात येत आहे, ही बस १.३० वाजता चिखलदरा येथे पोहोचणार त्यादिवशी सायंकाळी ५.३० वाजता चिखलदरा ते अकोला अशा परतीच्या प्रवासासाठी बस निघणार आहे. तिकीटदरांमध्ये महामंडळाच्या प्रवासी सवलती योजनेचा लाभ मिळणार आहे. चिखलदरा पर्यटनस्थळाला भेट देण्यासाठी या विशेष उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आगार व्यवस्थापक सुभाष भिवटे व बसस्थानक प्रमुख नरेश खंडारे यांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### महसूल सप्ताहानिमित्त नमुना आठ-अ वाटप



अकोट : तालुक्यातील बांबर्डा बुद्रुक येथे महसूल सप्ताहानिमित्त २ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या रहिवाशांना ग्राम पंचायत नमुना आठ-अ चे वाटप करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून गाव पातळीवर असलेल्या अतिक्रमित जागा शासनाने नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतला आहे. अकोट उपविभागामध्ये १ ऑगस्ट ते ७ ऑगस्टपर्यंत हा महसूल सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. महसूल सप्ताह समोर ठेवून अकोट महसूल विभागाच्यावतीने गावातील अतिक्रमित जागा नियमानुकूल करण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. बांबर्डा बुद्रुक येथे आयोजित कार्यक्रमांमध्ये सरपंच संदीप धर्माळे, मंडळ अधिकारी व्ही.पी.शेरेकर, ग्राम महसूल अधिकारी मंगेश कोरडे, ग्राम पंचायत अधिकारी अतुल इंगळे व राऊत सर, आपोतीकर सर तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

### अण्णाभाऊ साठे जयंती आणि टिळक पुण्यतिथी

अडगाव बु. : येथील जिल्हा परिषद विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय येथे १ ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री चारूदत्त मेहरे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयातील सर्वच शिक्षक आणि प्राध्यापक हे प्रामुख्याने उपस्थित होते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण करण्यात आले.

### अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

बाळापूर ता.प्र.: लोकशाहीर अण्णा साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या आनंदात तालुक्यात मिरवणूक काढून साजरी केली तसेच ग्राम पंचायत वाडेगाव येथे गजानन डोंगरे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन पटावर प्रकाश टाकत अण्णा भाऊंनी शोषित पीडित समाजाच्या व्यथा आपल्या लेखनीतून जगाच्या वेशीवर मांडल्या आणि समाज हितासाठी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे पोवाडे डफावर गायले, असे आपल्या भाषणात सांगितले व पंचायत समिती, शाळेत सुद्धा साजरी करण्यात आली. मिरवणूक काढताना डीजे तसेच ढोल ताशाच्या गजराने वाडेगाव नगरी दणदणली अण्णाभाऊना अभिवादन केले.

## जय बजरंग विद्यालय चान्नी येथे स्काऊट गाईड - जागतिक स्कार्फ दिन साजरा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

चान्नी, दि. २ : १ ऑगस्ट हा दिवस जागतिक स्कार्फ दिन' म्हणून जगभर उत्साहात साजरा केला जातो. जय बजरंग विद्यालय चान्नी येथील लोकमान्य टिळक स्काऊट यूनिट व अहिल्याबाई होळकर गाईड युनिट तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले गाईड यूनिटच्यावतीने स्कार्फ दिन उत्साहात साजरा केला गेला. सर्वप्रथम स्काऊट-गाईड प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्कार्फ हा स्काऊट-गाईडचा स्वाभिमान तथा सन्मान आहे. याशिवाय स्कार्फसोबत विश्व बंधुत्वाची पवित्र भावनादेखील जोडलेली आहे. स्काउट्स आणि गाईड्सनी स्कार्फ परिधान करून चळवळीचे जनक लॉर्ड बेडेन पॉवेल आणि लेडी बेडेन पॉवेल यांना अभिवादन केले. यानिमित्ताने स्काऊटस आणि गाईडसनी परस्परांना स्कार्फ देऊन तसेच स्कार्फची आदलाबदल



करुन परस्परांचा सन्मान केला. यानंतर स्काऊट मास्टर वसंत ढोकणे यांनी स्कार्फचे महत्त्व व त्याचे वेगवेगळे फायदे सांगितले. प्रथमोपचार करण्यासाठी स्कार्फचा कसा उपयोग होतो. याविषयी विस्तृत सांगितले. त्यानंतर स्काऊट्सनी स्कार्फपासून वेगवेगळे बँडेज व स्ट्रेचर तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक , सर्व स्काऊट्स व गाईड्स उपस्थित होते.

## महसूल सप्ताह निमित्ताने मुंडगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोट, दि. २ : महसूल विभागामार्फत राज्यात-१ ऑगस्ट २०२५ रोजी महसूल दिन व १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत महसूल सप्ताह २०२५ साजरा करण्याबाबत. शासन निर्णय महसूल व वन विभाग संकिर्ण-२०२५/प्रक्र/आस्था-०१ (ई-०१) -२९ जुलै २५ नुसार निर्देशींत करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने अकोट तालुक्यामधील मौजे मुंडगाव मंडळामध्ये महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, सप्ताहाबाबत संपूर्ण माहिती देण्यात आली. तसेच ०१/०८/२०२५ रोजी सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मनोज मानकर प्र. तहसीलदार अकोट यांच्या प्रमुख उपस्थितीत सरपंच ग्रामपंचायत सरपंच मुंडगाव तुषार पाचकोर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले असून, त्यामध्ये नागरिकांना नमुना ८ अ तसेच ७,१२ शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले. यावेळी महसूल मंडळातील मंडळ अधिकारी एम.एन.अढाऊ व ग्राम महसूल अधिकारी परमार्थ, बंकेवार, अग्रवाल, केळकर, रावणकर, गावंडे उपस्थित होते तसेच गावातील नागरिक व शेतकरी सरपंच रौंदळा व समस्त प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती.

## तहसील कार्यालय व पंचायत समिती बार्शीटाकळी येथे महसूल दिन

### घरकुल लाभार्थ्यांना ८-अ चे वाटप

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

बार्शीटाकळी , दि. २ : शासनाच्या निर्णयानुसार महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या या सेवा आणि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ देता यावा, तसेच त्याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता वाढवावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबदल नागरिकांचा विश्वास वृद्धींगत व्हावा, यासाठी १ ते ७ ऑगस्ट महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

या सप्ताह अंतर्गत ०२/०८/२०२५ रोजी महसूल दिनानिमित्त पिंजर येथे नागरिकांना



दैनंदिनीरीत्या निर्गमित येणारे अतिक्रमण नियमानुकूलीत करून पात्र असलेल्या कुटुंबास अतिक्रमित जागेचे पट्टेवाटप / नमुना नं. ८ वाटप मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, अनिता मेश्राम जिल्हा परिषद, अकोला, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे जिल्हा परिषद अकोला, तहसीलदार राजेश वझीरे,गटविकास अधिकारी रमाकांत पवार पंचायत समिती बार्शीटाकळी,इंजि. अनिता भगत, इंजि. आसावरी ढोके मंडळाधिकारी श्रावण भराडी ,ग्राम महसूल अधिकारी, राजेश धामणीकर, मनिष हळदे, सुनील गायगोळ, सतीश चोथमल, राहुल चव्हाण, पिंजर ग्रामपंचायतचे सरपंच शारदा पांडुरंग ठक, उपसरपंच शेख वसीम शेख पीरमोहम्मद, ग्रामपंचायत अधिकारी विजय नवलकर, उपतालुका प्रमुख शिवसेना पांडुरंग ठक, संजय चौधरी, गजानन मानतकर, अशोक लोणाग्रे, चंद्रशेखर ठाकरे व सर्व ग्रामपंचायत सदस्य, गावकरी तसेच सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## बाल सुरक्षा व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

बार्शीटाकळी , दि. २ : जिल्हा परिषद उर्दू कन्या शाळा बार्शी टाकळी येथे आज सखी सावित्री समितीच्या माध्यमातून बाल सुरक्षा /महिला सुरक्षा व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष पुष्पा रत्नपारखी महिला अध्यक्ष तथा दक्षता समिती पोलीस स्टेशन बार्शीटाकळी होते प्रमुख पाहुणे म्हणून नुसरत जमाल माजी नगरसेविका रुतुजा घुले पोलीस कर्मचारी पोलीस स्टेशन बार्शीटाकळी सरगम दाभाडे रजनी कुरोडे आरोग्य कर्मचारी हे होते, यावेळी पुष्पा रत्नपारखी व पोलीस कॉन्स्टेबल रुतुजा घुले यांनी विद्यार्थ्यांना बाल सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन



केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते व विद्यार्थ्यांसोबत वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आले, तसेच विद्यार्थ्यांना फराळ, बिस्किट वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मोहम्मद शाकीर रिजवान काजी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापिका शमिमबानो मोहम्मद जाकीर तसेच सर्व महिला शिक्षक यांनी सहकार्य केले, तसेच व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती, मातापालक समिती सर्वांनी आपली उपस्थिती दर्शविली. सर्व पाहुण्यांनी सुंदर शाळा स्वच्छ परिसर, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त पाहून शाळेचे शिक्षकांचे कौतुक केले आणि अशी आशा व्यक्त केली की, याच्या पुढेही असेच वातावरण शाळेत राहील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहम्मद शाकीर यांनी तसेच आभार प्रदर्शन रिजवान काजी यांनी केले.

## 'कस्टडी डेथ' प्रकरणातील आरोपी पोलीस शिपायाचा जामीन फेटाळला

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोट, दि. २ : गेल्या वर्षी सन २०२४ मध्ये ठाणेदार तपन कोल्हे यांच्या कारकिर्दीत अकोट शहर पोलीस स्टेशनमध्ये घडलेल्या गोवर्धन हरमकार याच्या ''कस्टडी डेथ''अर्थात पोलीस कोठडी मृत्यू प्रकरणातील आरोपी निलंबित पोलीस शिपाई रवि सदांशिव याचा जामीन अर्ज अकोट सत्र न्यायालयाने आज फेटाळला आहे.

अकोट शहर पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आलेल्या अप.क्र. १६९/२०२४, कलम ३०२, १६६,२०१ भादंवि. या मधील आरोपी पोलीस शिपाई रवि सदांशिव, वय ३५ वर्षे अकोट शहर पोलीस स्टेशन याने मृत गोवर्धन हरमकार याचे पोलीस कोठडीमधील झालेल्या मृत्यू प्रकरणात दाखल केलेला जामीन अर्ज १.८.२०२५ रोजी अकोट येथील वि.अतिरिक्त जिल्हा व विशेष सत्र न्यायाधीश बी.एम.पाटील यांनी फेटाळला आहे. या प्रकरणात सी.आय.डी. चे पोलीस उपअधीक्षक तुकाराम निंबाळकर, अमरावती यांनी दोषारोपपत्र वि. न्यायालयात दाखल केलेले असून, हे आरोपी अकोला कारागृहामध्ये १६ ऑक्टोबर २०२४ पासून बंदीस्त आहेत. आरोपीने या प्रकरणातील गुन्ह्याशी माझा काहीही संबंध नसून व त्याला त्या गुन्ह्यात गोवण्यात आले. या मुद्यावर जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. या प्रकरणात सरकारी वकील अजित देशमुख यांनी वि.न्यायालयात युक्तीवाद केला. गुन्ह्यातील अर्जदार आरोपी १० ते १३ जानेवारी २४ व १५ ते १६ जानेवारी २४ रोजीपर्यंत गुन्हे प्रगटीकरण पथकामध्ये कार्यरत असल्याचे डयुटी तक्त्यावरुन दिसून येते. तसेच या प्रकरणात मृत गोवर्धनचे काका यांनी फिर्याद दिली आहे. त्यामध्ये या प्रकरणातील आरोपी असलेल्या पोलिसांनी मृत गोवर्धनला १५.०१.२०२४ रोजी अकोट शहर पोलीस स्टेशनला एका प्रकरणात संशयावरून अटक करून आणले होते. १६.०१.२०२४ रोजी गोवर्धनला रात्री ८ ते ९ वाजताच्या दरम्यान सुकळी या गावी आणले होते व १७.०१.२०२४ रोजी उपचारादरम्यान विघ्नहर्ता हॉस्पिटल येथे गोवर्धनचा मृत्यू झाला होता. फिर्यादी व इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी सदर प्रकरणातील आरोपी असलेल्या पोलिसांनी मयत गोवर्धन हरमकार यास मारहाण केल्याने बयानात सांगितले आहे. तसेच मृताच्या शवविच्छेदन अहवालामध्ये २५ जखमा मृताच्या शरीरावर असल्याबाबत उल्लेख असून, मरणाचे कारण हे या सर्व जखमांमुळे मृत्यू झाला, असे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे. तसेच अर्जदार आरोपी हा पोलीस कर्मचारी असल्याने त्याचे भीतीने नमुद गुन्ह्यातील साक्षीदार हे साक्ष देण्यास पुढे येणार नाहीत, तसेच आरोपी गुन्ह्यातील साक्षीदारांवर दबाव आणू शकतो. सदरचा खटला हा सर्व आरोपींना कारागृहात ठेवूनच सरकार पक्ष जलद गतीने चालविण्यास तयार आहे. म्हणून आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर करण्यात यावा, असा युक्तीवाद सरकार तर्फे सरकारी वकील अजित देशमुख यांनी केला. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर वि.कोर्टाने आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केला आहे.

## निधन वार्ता

### कमलाबाई देशमुख



रौंदळा: अकोट तालुक्यातील रौंदळा येथील प्रगतशील कास्तकार गजानन कौतुकराव देशमुख यांच्या मातोश्री तसेच पत्रकार सुरेश देशमुख यांची मोठी आई कमलाबाई कौतुकराव देशमुख यांचे १ ऑगस्ट रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८४ वर्षे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, बहीण, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

**उपक्रम** | कुरणखेड येथे 'धागा शौर्याचा' राखी अभियान

## प्रत्येक घरातून सीमेवरील सैनिकांसाठी मिळाली राखी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

कुरणखेड, दि. २ : आपल्या भारत मातेची सर्वोच्च सेवा करणाऱ्या भारतीय सैनिक याला दरवर्षी कुरणखेड या गावातून 'धागा शौर्याचा' राखी अभियानाचे आयोजन करण्यात येते. याच्या माध्यमातून सीमेवरील सैनिकांना राखी पाठविण्यात येते. यावर्षी सुद्धा गेल्या दहा दिवसांपासून गावात राखी जमा करण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. या आवाहानाला प्रतिसाद देत गावातील प्रत्येक घरातून आपल्या सैनिक भावासाठी राखी जमा झाली आहे. हा राखी संकल्पनेचा कार्यक्रम १ ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्याच बरोबर, बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त कुरणखेड गजानन महाराज विद्यालयात संपन्न झाला. गावचे भूमिपुत्र वीर सैनिक नितेश घाटे यांना काही दिवसांअगोदरच वीर मरण आले, त्यामुळे हा कार्यक्रम



प्रमुख पाहुण्यांना बाजूला ठेवून कुरणखेड गावात साध्या पद्धतीने करण्यात आला. यावेळी शहीद नितेश घाटे यांना श्रद्धांजली देऊन त्याच बरोबर महिलांनी जमा केलेल्या राखी गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या माध्यमातून पोस्ट अधिकारी यांना देण्यात आल्या. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. महिला स्वयंसहायता बचत गटाच्या महिला त्याचबरोबर गावातील गजानन महाराज विद्यालयातील विद्यार्थीसुद्धा उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुरणखेड येथील प्रतिष्ठित नागरिक अनंतराव बाळासाहेब देशमुख, प्रमुख पाहुणे बोरगाव मंजू पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक अनिल गोपाल, समाजसेविका कमलजीत कौर, माजी जिल्हा परिषद सदस्य छाया देशमुख, गजानन महाराज विद्यालय मुख्याध्यापक रंजित सोळंके, प्रशांत ठाकरे,युवा समाजसेवक केल्विन सुबी कार्यक्रमाला मंचावरती उपस्थित होते. प्रास्ताविक 'धागा शौर्य का 'राखी अभियान संयोजक,वीर भगतसिंग आपत्कालीन बचाव पथक प्रमुख योगेश विजयकर, संचालक शिक्षक अरविंद उगले, आभार गिरधर भोंडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता

योगेश विजयकर शिवशक्ती स्वयंसहायता महिला बचत गट, सावित्रीबाई फुले महिला बचत गट, बालाजी महिला बचत गट, जिजाऊ महिला बचत गट, समर्थ महिला बचत गट, गुरुकृपा महिला बचत गट, साईराम महिला बचत गट, महालक्ष्मी महिला बचत गट, कल्पवृक्ष महिला बचत गट, राधाकृष्ण महिला बचत गट, एकता महिला बचत गट, जय श्रीराम महिला बचत गट, चंडिका माता महिला बचत गट, प्रगती महिला बचत गट, अनेक गटातील महिलांनी सहभाग घेतला.

## सर्पमित्रांचा सन्मान करून साजरी केली आगळीवेगळी नागपंचमी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

पातूर, दि. २ : साप हा अन्नसाखळीतील घटकांपैकी एक महत्त्वाचा प्राणी आहे. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक प्राणी आणि त्याचे अस्तित्व महत्त्वाचे आहे. साप हा शेतकऱ्यांचा मित्र आहे, त्यामुळे त्याला न मारता, इजा न पोहोचवता त्याचे संरक्षण होणे गरजेचे आहे. हाच हेतू समोर ठेवून नागपंचमीचे औचित्य साधून एज्युविला पब्लिक स्कूल, पातूर येथे सापांविषयी जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सर्पमित्रांचा यथोचित सन्मान करून करण्यात आली. सर्पमित्र स्वप्नील सुरवाडे व प्रमोद कढोणे यांनी आपल्या मार्गदर्शनातून विविध प्रकारच्या सापांची माहिती दिली. त्याचबरोबर आपल्या परिसरात आढळणाऱ्या विषारी व बिनविषारी सापांची ओळख करून दिली. त्यांच्याविषयी असणाऱ्या भ्रामक कल्पना, अंधश्रद्धा यावर प्रकाश टाकला. सापांविषयी असलेली अनावश्यक भीती आणि गैरसमज दूर करून, त्यांच्याशी सुरक्षितपणे कसे वागावे, सर्पदंश झाल्यास कोणती खबरदारी घ्यावी तसेच सर्पमित्रांची भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देखील या कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि सर्पमित्रांना विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापिका विद्या गाडगे तसेच सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता शिक्षिका स्नेहल काळपांडे, नेहा अत्तरकार, नीता ढोणे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, रविवार, दि. ३ ऑगस्ट २०२५

डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.
डॉ. रविराज पांडे ( एम.डी. )
वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.
व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )
C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )
C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )
वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत
मो. 9890043911, 9372151186

# महिला पोलीस कर्मचाऱ्याची हत्या, पती अटकेत

## मित्रांना आमिष देवून पत्नीला संपविले | आरोपीचे पाच वर्षापासून प्रेमसंबंध





अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २ :** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात कार्यरत महिला पोलीस कर्मचारी आशा राहुल घुले यांची शुक्रवारी दुपारी त्यांच्याच घरी निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी पोलिसांनी संशयावरून मृतक आशाच्या पतीला, राहुल तायडे याला अटक केली आहे. राहुल एसआरपीएफ मध्ये पोलीस शिपाई म्हणून कार्यरत आहे. राहूल याचे गेल्या पाच वर्षापासून दुसऱ्या महिलेसोबत प्रेमसंबंध होते. त्यामुळे तो पत्नीला त्रास देत होता. याआधी मयत पत्नीने पती विरोधात पोलिसात दोन वेळा तक्रारी केल्या होत्या.

आशा राहुल तायडे घुले वडाळी परिसरातील गुरूकृपा कॉलनीत आपल्या खासगी निवासस्थानी राहत होती. आशा, तिचा पती राहुल आणि त्यांचे दोन मुलं एक १३ वर्षांचा मुलगा आणि ८ वर्षांची मुलगी हे सर्व एकत्र राहत होते. आशा घुले गेल्या काही वर्षांपासून फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात कार्यरत होती. मागील १० दिवसांपासून आजारी असल्यामुळे ती रजेवर होती आणि घरीच होती. घराच्या वरच्या मजल्यावर सहा खोल्यांमध्ये वेगवेगळे भाडेकरू देखील राहतात.

गुरुवारी सायंकाळी जेव्हा आशाचा मुलगा ट्यूशनहून घरी परतला, तेव्हा त्याला आई जमिनीवर पडलेली दिसली आणि त्याच वेळी दोन बुरखाधारी व्यक्ती पळून जात असल्याचे त्याने पाहिले. त्याने आरडा-ओरडा केला असता आजूबाजूचे लोक जमा झाले. पोलिसांनी त्वरित घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला. आशा यांचा मृत्यू झालेला होता. पोलिसांनी पंचनामा करून पुढील सखोल तपास सुरू केला आहे.

आशा आणि राहुल यांच्यात गेल्या काही काळापासून कौटुंबिक वाद सुरु होता. याआधी दोघांनीही एकमेकांविरोधात फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या होत्या. आशा यांचा मृत्यू झाल्यानंतर तिच्या बहिणीने राहुलवरच आशाच्या मृत्यूला जबाबदार असल्याचा आरोप करत तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी राहुलला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

> आरोपी याने गेल्या एक महिन्यापासून पत्नीला मारण्याचा कट रचला होता. आरोपी याने दाने मित्रांना प्रलोभन देवून मारण्याचे ठरविले होते. पती पत्नी गेल्या पाच वर्षापासून वारंवार वाद सुरू होते. त्यामुळे मृतक महिला पोलिस कर्मचारी माहेरी सुद्धा गेली होती. परंतु तिला १२ वर्षाचा मुलगा व पाच वर्षाची मुलगी असल्याने शाळेचा प्रश्न डोळ्यासमोर ठेवून ती पुन्हा घरी आली. मृतक महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी राहुल तायडे याला ताब्यात घेतले. आरोपीने गुन्हेची कबूली दिली असून पोलिस त्या दोघांचा शोध घेत आहे. दोन्ही आरोपीला लवकरच ताब्यात घेतले जाईल.
>
> **गणेश शिंदे**
> **पोलिस उपायुक्त**

# शिलोड गावात शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**पापळ, दि. २ :** गाव शिलोडा पोस्ट मोखड ता. नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती येथील रहिवासी शेतकरी श्री राजु भादुजी तिडके वय 38 वर्ष ह्या शेतकऱ्याने दि. १ ऑगस्ट रोजी राहत्या घरात सकाळी ९.३० वाजता च्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याला एक पत्नी शालू तिडके वय ३५ दोन मुली पूनम तिडके वय १७ सानिका तिडके वय 15 व एक मुलगा ऋतिक तिडके वय १३ असा छोटा असं परिवार आहे त्याचे तिन्ही मुले सध्या नाबालिक आहेत. राजु तिडके यांच्या कडे गावात दोन ऐकर शेत असून त्यांनी कर्जमाफी ची प्रतीक्षा करत होते. राजु हे शेती व गावात मजुरी काम करत होते ह्या वर्षी सुध्धा त्यांनी काही ओडखीच्या लोकांन जवळून कर्ज काढून शेतात पेरणी केली होती.



परंतु ह्या वर्षी शिलोड गावात आता पर्यंत पाहिजे तसा पाऊस झाला नाही. त्यांच्या कडे पहाडी भागाचे लाल मातीचे शेत आहे त्या शेतीला पाण्याची जास्त गरज असते परंतु कमी पाऊस झाल्या मुळे त्यांनी निर्णय घेतला असेल असे गावातील नागरिक श्री प्रज्वल अरुण चौधरकर यांचे मत आहे

# निलेश भेंडे हल्लाप्रकरणी पाच आरोपी अकोल्यातून अटक

## ऑनलाइन गेमिंगच्या वादातून हल्ला






अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २ :** युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी निलेश भेंडे यांच्यावर शुक्रवारी सायंकाळी झालेल्या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात अमरावती पोलिसांना यश आले आहे. अकोला येथून या आरोपींना ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये करण इटोरिया, नीतांशु इटोरिया, अनिकेत देशमुख, प्रथमेश अग्रवाल आणि साहिल मुस्तफा यांचा समावेश आहे. या प्रकरणातील आणखी एक आरोपी फरार असून, त्याचा शोध सुरू आहे.

**ऑनलाइन गेमिंग आयडीवरून निर्माण झाला वाद**

शंकर नगर परिसरात निलेश भेंडे यांचे कार्यालय आहे. शुक्रवारी सायंकाळी त्यांच्या कार्यालयाजवळच चाकूने त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रेडियंट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. उपचारानंतर शुद्धीवर आल्यानंतर भेंडे यांनी पोलिसांना दिलेल्या निवेदनात सांगितले की, अनिकेत देशमुखच्या फोनवरून प्रथमेश अग्रवालने त्यांच्याशी संपर्क साधून, तू ऑनलाइन गेमिंगची आयडी आमच्याकडूनच घे, अन्यथा तुला ठार मारू, अशी धमकी दिली.

फोन कॉलनंतर जेव्हा भेंडे आपल्या कार्यालयात पोहोचले, तेव्हा वादग्रस्त आरोपींनी त्यांच्यावर हल्ला चढवला. या हल्ल्यात त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी देखील हिसकावण्यात आली. निलेश भेंडे यांचे मित्र विलास परचाके यांनी त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल केले.

पोलिसांनी अटक करण्यात आलेल्या आरोपींना आज न्यायालयात हजर केले असता, त्यांना काही दिवसांच्या पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले. या प्रकरणाचा संबंध ऑनलाइन गेमिंग या बेकायदेशीर व्यवसायाशी असल्याची माहिती पोलिस तपासात पुढे आली आहे.

# शेअर मार्केटच्या नावावर १२.४० लाखांचा गंडा

## ऑनलाइन फसवणूक; सायबर ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती, दि. २ :** शहरातील रहिवासी असलेल्या 43 वर्षीय व्यक्तीचा शेअर मार्केटवरील विश्वास उडाला. त्यानंतर १२ लाख ४० हजार रुपयांच्या ऑनलाइन फसवणुकीचा गुन्हा उघडकीस आला. राजू पंजाबराव काळे (४३) यांच्या तक्रारीवरून सायबर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राजू काळे ३ जुलै रोजी फेसबुक ब्राउझ करीत होते. त्यावेळी एनजे ग्रुप नावाचा शेअर मार्केटशी संबंधित एक ग्रुप होता. त्यामुळे राजू त्यात सामील झाले. नंतर ते एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये जोडला गेला. जिथे त्यांनी ग्रुपवरील लिंकद्वारे फॉर्म भरला. नंतर त्याला एनएचएसी नावाचे ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. तसेच त्यावर ट्रेडिंग केल्यास जास्त नफा मिळेल, असे सांगण्यात आले. त्यानंतर काळे यांनी त्याच्या बँक खात्यातून ट्रेडिंग सुरू केले आणि काही पैसे



ऑनलाइन दिले. त्यानंतर,

जेव्हा त्यांना नफा झाला; तेव्हा त्याने त्यातून काही रक्कम काढली. त्यामुळे काळे यांना शेअर बाजारातील व्यवहारात विश्वास निर्माण झाला. त्यानंतर त्यांनी त्यांच्या दोन्ही बँक खात्यांमधून एकूण १२ लाख ४० हजार रुपये जमा केले. तेव्हाही त्यांना नफा दिसला, परंतु ते पैसे काढू शकले नाहीत. ऑनलाइन फसवणूक झाल्याचे लक्षात येताच, काळे यांनी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

# अंजनगाव बारीच्या श्रीनिवास पोकळे याला सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार

## ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारात मराठीचा डंका

अजिंक्य भारत | साहेबराव राऊत

**अंजनगाव बारी, दि. २ :** चित्रपटसृष्टीतील अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा शुक्रबारी (१ ऑगस्ट) करण्यात आली असून, या पुरस्कार सोहळ्यावर मराठी चित्रपटसृष्टीने पुन्हा एकदा आपली मजबूत मोहोर उमटवली आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांच्या अध्यक्षते खालील निवड समितीने जाहीर केलेल्या या पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा मान सुजय डहाके दिग्दर्शित 'श्यामची आई' ने पटकावला, तर बालकलाकार आणि तांत्रिक पुरस्कारांवरही मराठी कलावंतांनी आपले नाव कोरले.

नागराज मंजुळे दिग्दर्शित 'नाळ २' या चित्रपटाने राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये दुहेरी यश मिळवले आहे. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट बालचित्रपटाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. याच चित्रपटातील उत्कृष्ट अभिनयासाठी श्रीनिवास पोकळे, त्रिशा आणि भार्गव या तिन्ही बालकलाकारांना विभागून




सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. %नाळ २%ला सर्वोत्कृष्ट लहान मुलांचा सिनेमा घोषित करण्यात आलं आहे. 'नाळ २' या चित्रपटाचं दिग्दर्शन सुधाकर रेड्डी यक्कांती यांनी केलं आहे. या चित्रपटामध्ये मुख्य भूमिकेत अंजनगाव बारीतील श्रीनिवास पोकळे हा दिसला होता. या चिमुकल्यानं चित्रपटात खूप सुंदर अभिनय केला. या चित्रपटासाठी श्रीनिवासचं खूप कौतुक झालं आहे. याशिवाय 'नाळ २' चित्रपटामधील गाणी देखील खूप गाजली होती. या चित्रपटामध्ये नागराज मंजुळे यांनी विशेष भूमिका साकारली आहे. चित्रपटात ट्रीशा ठोसर, दीप्ती देवी, देविका दफ्तर, जितेंद्र जोशी आणि भार्गव जगताप यांनी विशेष भुमिका साकारल्या आहे.

# विलायतपुराच्या तरुणाची गळफास लावून आत्महत्या

## शारीरिक आजारपणातून उचलले पाऊल

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २ :** अचलपूर शहरातील विलायतपुरा भागात एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. मृताचे नाव गजानन कैलाश घोटकर (३६) असे आहे. गजाननने गुरुवारी (दि. ३१) रात्री घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. गजानन अविवाहित होता आणि तो मूर्ती बनवण्याचे काम करीत होता.

गेल्या काही दिवसांपासून तो मानसिक आजारी होता. बुधवारी रात्री त्याचे कुटुंबीय नागपंचमी यात्रेत सहभागी होण्यासाठी बाहेर गेले होते. त्यामुळे गजानन घरात एकटाच होता. रात्री त्याने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच, अचलपूर पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि पंचनामा तयार केल्यानंतर मृतदेह अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आला. डॉ. अन्सारी यांनी



शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला. सध्या तरी आत्महत्येमागील नेमके कारण समोर आलेले नाही. पोलिस या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करीत आहेत. या घटनेमुळे मृताच्या कुटुंबात, मित्रमंडळींमध्ये आणि परिसरात शोककळा पसरली आहे. या अनपेक्षित घटनेबद्दल सर्वांनीच तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. प्राथमिक तपासात मानसिक ताण हे आत्महत्येचे संभाव्य कारण मानले जात आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# रोजगाराचे नवे मॉडेल : जंगलातील गावात नवा 'रेशीम' उद्योग

## धारणीतील चित्री गावातून मेळघाटच्या पहिल्या रेशीम उद्योजकाची यशोगाथा!

Sunday Story
अजिंक्य भारत
भारत वरठे
८०८०२८२२१०

**धारणी :** मेळघाटातील चित्री या आदिवासी भागातील एका प्रयोगशील शेतकऱ्याने इतिहास घडवला आहे. धारणी तालुक्यातील उत्तम तुकाराम शेलके यांनी पारंपरिक शेतीपलीकडे जाऊन रेशीम शेतीचा पर्याय स्वीकारत मेळघाटातील पहिला रेशीम शेती उद्योग उभा केला आहे. ही कथा आहे आत्मविश्वासाची, प्रयोगशीलतेची आणि ग्रामीण रोजगार निर्मितीच्या नव्या दृष्टीकोनाची!

**रेशीम शेतीचा आदर्श प्रयोग**

शेलके यांनी जिल्हा रेशीम कार्यालय, अमरावती यांच्याशी सल्लामसलत करून अत्याधुनिक पद्धतीने रेशीम शेती सुरू केली. त्यासाठी त्यांना शासनाकडून 3.90 लाख रुपयांचे अनुदान मिळाले. या अनुदानाच्या मदतीने त्यांनी आपल्या शेतात तीन टप्प्यातील रेशीम शेड उभारले असून, ताज्या तुतीच्या पानांवर पोसलेल्या रेशीम कीटकांची संगोपन व्यवस्था केली आहे.

**शेती, विज्ञान आणि स्मार्ट योजनेचा मिलाफ**

उत्तम शेलके यांची योजना केवळ रेशीम उत्पादनापुरती मर्यादित नसून, ती एक समग्र शेती व उद्योजकतेचे मॉडेल ठरत आहे. नैसर्गिक प्रकाश, वायुवीजन, कीटकांसाठी सुसज्ज मांडणी अशा अनेक गोष्टींचा त्यांनी विशेष विचार केला आहे.

**शेकडो शेतकऱ्यांना नवा मार्ग**

त्यांचा प्रयोग पाहण्यासाठी धारणी तालुक्यातील अनेक शेतकरी त्यांच्या शेताला भेट देत आहेत. त्यांचे अनुभव घेऊन अनेकांनी रेशीम शेतीकडे वळण्याचा विचार सुरू केला आहे. जिल्ह्यात रेशीम उत्पादनाला नवा बूस्ट मिळवून देणारा हा पहिला प्रयोग ठरत आहे.

**रेशीम उद्योगातून आर्थिक सक्षमता**

रेशीम शेती ही पारंपरिक शेतीपेक्षा अधिक लाभदायक, शाश्वत आणि रोजगारनिर्मितीस अनुकूल ठरते, हे उत्तम शेलके यांनी त्यांच्या कृतीतून दाखवून दिलं आहे. त्यांच्या एका प्रयोगामुळे आता चित्री गावाचे नावही संपूर्ण तालुक्यात उजळले आहे.

**यशाचा धडा तरुण शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी वाट**

उत्तम शेलके यांचा आत्मविश्वास, शासकीय योजनांचा अभ्यासपूर्ण वापर आणि शाश्वत शेतीचा दृष्टिकोन हा आजच्या तरुण शेतकऱ्यांसाठी एक आदर्श रोहिणी तारा आहे. त्यांच्या यशातून ग्रामीण भारतात आधुनिक शेती व उद्योजकतेचा नवा सूर उमटू लागला आहे. जिथे जंगल, तिथे रोजगार नसे हा समज रेशीमाच्या धाग्याने मोडून काढणारा शेतकरी म्हणजे उत्तम शेलके!



# थोडक्यात

### दाभेरीतून चोरून नेली दुचाकी

**शिरखेड :** येथील पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या दाभेरी येथे अज्ञाताने घराच्या समोरील पोर्चमधून दुचाकी (एमएच २७-बीडब्ल्यू ०४९४) चोरून नेली. तिची अंदाजे किंमत ६० हजार रुपये आहे. याबाबत मनोज मोहनराव साबळे (२६, रा. धामणगाव काटपूर) यांनी शिरखेड पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### टिप्पर ट्रकचे दोन टायर लंपास

**दर्यापूर :** मागील दोन महिन्यांपासून घरासमोर उभ्या असलेल्या दहा चक्का टिप्पर ट्रकच्या (एकएच २७-बीएक्स १७७१) मागील दोन टायरसह डिक्स अज्ञाताने चोरून नेल्या. त्याची अंदाजे किंमत २५ हजार रुपये आहे. ही घटना बाळभी येथे घडली. नजीम बेग रहिम (३५) याच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास दर्यापूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली दर्यापूर पोलीस करीत आहे.

### मंदिरातील दानपेटीचे कुलूप तोडून रक्कम लंपास

**वरुड :** पाठक वाडीतील दुर्गा माता मंदिरामधील दानपेटी फोडून अज्ञाताने त्यातील अंदाजे ८ हजार रुपये चोरून नेले. याबाबत रमेश महादेवराव ढोरे (६४) यांच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी अज्ञात चारट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### चौघांनी केला वृद्ध महिलेचा विनयभंग

**माहुली जहाँगीर :** घराच्या पाठीमागील भिंतीला छपाई नसल्याने त्यातून पाणी झिरपत होते. म्हणून ६२ वर्षीय वृद्धा तेथे ताडपत्री लावत होती. त्याच वेळी काही परिचितांनी तिच्याशी वाद घालत तू या गल्लीत कशी काय आली म्हणत तिला ओढाताण केले. अश्लिल भाषेत शिवीगाळ करीत तिचा विनयभंग केला. याबाबत वृद्धेने दिलेल्या तक्रारीवरून माहुली पोलिसांनी रुपराव डिगांबर लंगडे (५०), रितेश रुपराव लंगडे (२५), अमोल उर्फ अंकित रुपराव लंगडे (२२) व एक महिला यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### ऑटो हिशोबाच्या वादातून मारहाण

**माहुली जहाँगिर :** लहान भावाने मोठ्या भावाला ऑटोच्या हिशेबाचे पैसे मागितले असता, मोठ्याने त्याला शिवीगाळ करीत लाकडी काठीने मारहाण केली. ही घटना यावली येथे घडली. शेख ईर्षाद शेख सत्तार सौदागर (३८) याच्या तक्रारीवरून माहुली जहाँगीर पोलिसांनी शेख अन्सार शेख सत्तार (४०) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दारूड्या पतीची पत्नीला मारहाण

**मोर्शी :** दारूडा पती नेहमीच पत्नीला शिवीगाळ व मारहाण करतो. दरम्यान ३० जुलै रोजी दारू पिवून त्याने पत्नीला कुऱ्हाडीच्या दांड्याने व काठीने मारहाण करीत जखमी केले ही घटना हिवरखेड येथे घडली. २४ वर्षीय पत्नीने दिलेल्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी उमेश रामराव सूर्यवंशी (३६) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### फावड्याने मारून जखमी केले

**अमरावती :** वडील व बहिणीसह दुचाकीने जाणाऱ्या युवकाच्या तोंडावर शेजारी राहणाऱ्या महिलेने पावड्याचा दांडा मारला. त्यात त्याचा एक दात पडला, तर दुसऱ्याला इजा झाली. ही घटना वलगाव पोलीस ठाण्यांतर्गत घडली. याबाबत वैभव राजेंद्र सदार (२०) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी महिलेविरुद्ध गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास वलगाव पोलीस करीत आहे.

## थोडक्यात

### प्रवाश्याची तब्येत खालावल्याने मृत्यू

**अमरावती :** औषाधोपचा साठी शहरात आलेल्या एका व्यक्तीचा गावाकडे परत जाताना बसस्थानकावरच चक्कर आल्याने मृत्यू झाला. त्याला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी मृत घोषित केले. ही घटना राजापेट बसस्थानकात घडली. भीमराव श्यामराव पवार (५५, रा, धोत्रा जहाँगीर, ता. कारंजा, जि. वाशिम) असे मृतकाचे नाव आहे. राजापेठ पोलिसांनी मर्ग नोंदवला.

### रॅली काढणाऱ्यांवर गुन्हे दाखल

**अमरावती :** परवानगी न घेता रॅली काढून घोषाणाबाजी काणाऱ्या १० ते १२ जणांवर फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हे दाखल केलेत. ही घटना यशोदा नगर चौकात धडली. प्रशिक संतोष बारसे (३०), विशाल धनराज गडलिंग (३०), शुभम मिथिलेश कैथवास (२८), कैलाश जगदिश कैथवास (३२), शिकम मिथिलेश कैथवास (२८) यांच्यासह अन्य पाच ते सहा जणांवरवर गुन्हे नोंदवले.

### रसवंतीची मशीन चोरून नेली

**अमरावती :** खुल्या जागेवर ठेवलेल्या रसवंतीच्या मशीनसह अज्ञाताने एकूण ६५ हजारांचे साहित्य चोरून नेले. त्यामध्ये उसाचा रस काढण्याची मशीन, रस साफ करण्याच्या दोन मशीनसह अन्य साहित्याचा समावेश आहे. गिरीश विठ्ठलदास हेडा (३७) यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी गुन्हा नोंदवला.

### शस्त्र बाळगणाऱ्यावर पोलिसांची कारवाई

**अमरावती :** तडीपार असतानाही अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या भारत राजेश मगरे (२४) याच्यावर बडनेरा पोलिसांनी मपोका दाखल केला. त्याच्या ताब्यातून चाकूसह अन्य साहित्य जप्त केले.

### क्षुल्लक वादातून महिलेला शिवीगाळ

**अमरावती :** भातकुली येथे क्षुल्लक वादातून एकाने महिलेला शिवीगाळ व मारहाण करीत जखमी केले. महिलेने भातकुली पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अमोल बाळूभाऊ चारथळ (५०) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### दंडे प्लॉटमधून दुचाकी लंपास

**अमरावती :** दंडे प्लॉट परिसरात असलेल्या नातेवाईकाला भेटायला आलेल्या अभिजित विनायकराव इंगोले (४४) यांची दुचाकी (एमएच २७-एटी ३०५१) अज्ञाताने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत ३० हजार रुपये आहे. राजापेठ पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ

**अमरावती :** विहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सासरच्या एकूण आठ जणांवर गाडगेनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### क्षुल्लक वादातून युवकास मारहाण

**अमरावती :** क्षुल्लक वादातून एका महिलेस पुरुषाने नातेवाईकाला मारहाण करीत जखमी केले. त्याच्या तोंडात जबरीने विषारी द्रव्य ओतले. त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमी अरविंद चरणदास नानवटकर (४९) यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी एका महिलेसह पुरुषाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

# सावकाराकडे नाही व्याजदर आकारणी सूचना फलक!

## दामदुप्पट आकारणीने शेतकऱ्यांचे शोषण; 'एआर'द्वारा कारवाई का नाही?

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती :** जिल्ह्यातील बहुतेक परवानाधारक सावकारांद्वारा अवैध सावकारी होत आहे. यामध्ये शेतकऱ्यांना व्याज आकारणीचा वार्षिक ९ टक्के दर ठाऊकच नाही. त्यामुळे अनेक सावकारांद्वारा महिन्याचे ३ टक्के म्हणजेच वार्षिक ३६ टक्के व्याज आकारणी होत आहे. अशा परिस्थितीत एकाही सावकाराकडे व्याज आकारणीचा सूचना फलक लावला नसल्याने शेतकऱ्यांची फसवणूक व आर्थिक शोषण होत असल्याचे वास्तव आहे.



जिल्ह्यात परवानाधारक ६६७ आहेत. यापैकी ९९ टक्के सावकारांकडे शेतकरी व नागरिकांना कर्ज वितरण व व्याजाची आकार, या साठीचे फलक लावण्यात आलेले नाही.

> सर्व 'एआर' यांना २० मे रोजी पत्र देऊन परवानाधारक सावकारांनी सूचना फलक लावण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबत पुन्हा पाहणी करून कारवाई करू.
>
> **शंकर कुंभार, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था)**

याबाबत सावकारी अधिनियम, शासनाचे राजपत्र व प्रधान सचिव (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली १६ मे रोजीच्या बैठकीनुसार प्रत्येक परवानाधारक सावकाराने माहितीचा फलक लावण्याचे निर्देश देण्यात आले आहे. प्रत्यक्षात जिल्ह्यातील सावकारांनी मात्र शासन निर्देशाला हरताळ फासला आहे. राज्यात अवैध सावकारीबाबत सर्वाधिक कारवाया अमरावती जिल्ह्यात झालेल्या आहेत. यामध्ये परवानाधारक सावकारदेखील अवैध सावकारी करीत असल्याचे अधोरेखीत झाले आहे.

### अमरावती, अचलपूरमध्ये मोठ्या प्रमाणात सावकारी

जिल्ह्यात ६६७ परवानाधारक सावकार आहेत. यामध्ये सर्वाधिक २४९ सावकार एकट्या अमरावती तालुक्यात तर १५३ अचलपूर तालुक्यात आहेत. भातकुली ९, अंजनगाव २४, धामणगाव २३, वरुड ४४, धारणी २१, नांदगाव १४, चांदूर रेल्वे ११, चांदूरबाजार ४३, तिवसा १९ व दर्यापूर तालुक्यात १४ सावकार आहेत. पेसा कायद्याने चिखलदरा तालुक्यात सावकारी परवाना नाही.

### सूचना फलकात असा मजकूर अनिवार्य

सहकार विभागाच्या माहितीनुसार प्रत्येक परवानाधारकाने माहितीचा सूचना फलक लावणे अनिवार्य आहे. यामध्ये सावकाराचे नाव, फर्मचे नाव, परवाना क्रमांक, वैधता दिनांक, परवाना कार्यक्षेत्र, सावकारी व्यवसायाचे ठिकाण, कर्जाचा प्रकार शेतकऱ्यांकरिता तारण कर्ज ९ टक्के प्रतिवर्ष, विनातारण कर्ज १२ टक्के प्रतिवर्ष, शेतकरी व्यतिरिक्त इतर व्यक्तींना तारण कर्ज १६ टक्के प्रतिवर्ष व विनातारण कर्ज १८ टक्के प्रतिवर्ष, ही माहिती सूचना फलकावर अनिवार्य आहे.

## स्वाभिमानचा उद्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**अमरावती, दि. २ :** शहरातील हॉकर्सच्या न्यायहक्कासाठी युवा स्वाभिमान पार्टी प्रेरित स्वाभिमान हॉकर्स युनियनतर्फे सोमवार, दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता इर्विन चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या भव्य मोर्चात शहरातील हजारो हॉकर्स धारकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन युनियनचे जिल्हाध्यक्ष व मनपा पथविक्रेता समिती सदस्य गणेश मारोडकर यांनी केले आहे.



महापालिकेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेचा दोन दिवस आधीच स्वाभिमान हॉकर्स युनियनने निषेध करत पावसात आंदोलन केले होते. मात्र मनपाने कोणतीही दखल न घेता कारवाई सुरुच ठेवली. ही मोहीम फेरीवाला धोरण २०१४ चे उल्लंघन असून, टाऊन वेंडिंग कमिटीची बैठक न घेता कारवाई करणे नियमबाह्य आहे. मोर्चाद्वारे शासनाने नक्षलवाद्यांसारखेच हॉकर्स व्यावसायिकांच्या कुटुंबियांनाही सन्मानाने पुनर्वसन करावे, अशी मागणी केली जाणार आहे. हातात बंदूक घेण्याऐवजी व्यवसाय करणाऱ्या हॉकर्सना संरक्षण मिळावे, असा युनियनचा आग्रह आहे. हॉकर्सच्या कुटुंबीयांसह मोठ्या प्रमाणात नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शैक्षणिक क्षेत्रातील शिक्षण परिषद व सेवानिवृत्ती सत्कार सोहळा

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**बेनोडा, दि. २ :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेनोडा शहीद येथे दि. ३१ जुलै रोज गुरुवारला शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले. शिक्षण परिषदेमध्ये केंद्राचे केंद्रप्रमुख देशमुख यांनी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचा दृष्टीने प्रत्येक शाळेमध्ये घ्यावयाच्या उपक्रमा संबंधी मार्गदर्शन केले. तसेच शासनाच्या नवीन योजना ची माहिती सर्व शिक्षकांना दिले. यावेळी दि. ३१ जुलै रोज गुरुवार ला सौ.रेखा सुधाकर मानकर सहाय्यक शिक्षिका या नियत वयोमर्यादेनुसार सेवानिवृत्त झाल्या.त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता .या सत्कार समारंभात गावाच्या सरपंच सौ.



कुबडे ताई उपसरपंच उत्तमराव पोटोडे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील पुंड व शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्यगण उपस्थित होते. तसेच बेनोडा केंद्रातील सर्व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी मंजुश्री निकम सहाय्यक शिक्षिका बेनोडा यांनी केले.

तर आभार प्रदर्शन कुमारी रोशनी घोगरे सहाय्यक शिक्षिका बेनोडा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता शाळेचे मुख्याध्यापक श्रीराव सर व सर्व शिक्षक शिक्षिका यांनी परिश्रम घेतले व नाश्ता व चहा पाणी देऊन वंदे मातरम राष्ट्रगान घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## भारतीय बौद्ध महासभा जिल्हा कार्यकारिणी घोषित

**अमरावती :** भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.राजरत्न आंबेडकर यांच्या सुचनेनुसार अमरावती जिल्हा कार्यकारिणीची घोषणा राज्य अध्यक्ष रविंद्र गुरचल आणि राज्य महासचिव विजय बनसोड यांनी नुकतीच केली. पदाधिकारी निवडी संदर्भात राज्य सहायक सचिव हेमंत जाधव, राज्य उपाध्यक्ष विजय वासे, सदस्य प्रोग्राम समन्वयक सचिन कवाडे, अमरावती विभाग प्रभारी महादेव तायडे,अनिल वानखेडे ,राज्य सदस्य रामदास घेवंदे,राज्य सदस्य निरंजन जाधव,कोकण विभाग प्रभारी महेंद्र जाधव, यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. अध्यक्ष सिध्दार्थ मुंद्रे ,उपाध्यक्ष रविकांत गवई, उपाध्यक्ष सुखदेवराव इंगोले, महासचिव संदीप मेश्राम, सहसचिव गोपाल पाटील,कोषाध्यक्ष संदीप चक्रनारायण





,सहकोषाध्यक्ष सुभाष खाकसे,मुख्य संघटक राजेंद्र छापाने, सहसंघटक सतीष प्रधान,संस्कार समन्वयक नंदकुमार वानखडे,विहार समन्वयक चंद्रपाल रंगारी,मीडिया समन्वयक शुभम चव्हाण,सदस्य सीमा मोहोड याप्रमाणे अमरावती जिल्ह्यातील पदाधिका-यांची निवड करण्यात आली.

## घराजवळ बसण्यास हटकल्याने मारहाण

**अमरावती :** घराजवळ बसू नको म्हटले असता आरोपी व फिर्यादीमध्ये वाद झाला. आरोपीने काठीने मारून जखमी केले. घराजवळ बसण्यास हटकल्याचा राग आल्याने गणेश रामचंद्र भालेराव (४८) याने लाकडी बल्लीने फिर्यादी अमोल चंद्रभान नेमाळे (३२) मारले. ही घटना नांदगाव पेठ येथे घडली. जखमीच्या तक्रारीवरून पोलिसांनी मारहाण करणाऱ्याविरुद्ध गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास नांदगाव पेठ पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

## संचमान्यता अंतिम दिनांक संभ्रम दूर!

### ३० सप्टेंबरची पटसंख्या संच मान्यतेसाठी ग्राह्य धरली जाणार!

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २ :** राज्यातील सर्व शाळा ,विद्यार्थी व शिक्षकांची माहिती यु-डायस प्लस प्रणाली, सरल प्रणाली, मध्ये दिनांक ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत अद्यावत करून अंतिम करण्यात यावे असे आदेश संजय जाधव, प्रकल्प संचालक महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी दिले आहेत. राज्यातील काही जिल्ह्यातील शिक्षण अधिकारी यांनी पत्र काढून ३१ जुलै २०२५ पर्यंत माहिती अद्यावत करणे संदर्भात आदेशित केले होते. त्यामुळे राज्यातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक, शाळांमध्ये संभ्रम निर्माण झालेला होता त्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे वतीने शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना भेटून यासंदर्भात सर्व माहिती देऊन निवेदन देण्यात आले होते माननीय शिक्षण मंत्री यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना आदेशित केले. तसेच सर्व माहिती अद्यावत करून अंतिम करणे बाबत केंद्र शासनाकडून ३० सप्टेंबर २०२५ अंतिम मुदत देण्यात आलेली आहेत. याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर सांगितले की,संचमान्यता २०२५-२०२६ च्या निर्धारण ३० सितंबर २०२५ राहील. या वेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या आभार मानले आहेत.तसेच संच मान्यता करतांना आधारवर न करता प्रत्यक्ष शाळेच्या पटावर आणि प्रत्यक्ष उपस्थित असणाऱ्या विद्यार्थांच्यावर करण्यात यावी तसेच भेटी दरम्यान इतर मागणी पण करण्यात आल्या आहेत त्या सर्व मागण्यांच्या पाठपुरावा सुरू आहेत.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

## श्री गणेशदास राठी विद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**अमरावती, दि. २ :** श्री गणेशदास राठी विद्यालयात 1 ऑगस्ट रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्री भट्टड होते. उपप्राचार्य मालाणी मॅडम, पर्यवेक्षक सुताणे सर, प्रमुख वक्ता शीतल गांधी मॅडम व प्रमुख अतिथी व्हाडपांडे मॅडम यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर भाषणे सादर केली. गांधी मॅडम यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील संघर्षमय घटनांचे वर्णन केले. व्हाडपांडे मॅडम यांनी



टिळकांच्या बालपणातील प्रेरणादायी प्रसंग कथन करत अन्यायाविरुद्ध लढण्याचे महत्व पटवून दिले.

मालाणी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना वाचन व लेखनासाठी प्रेरित करत वाचाल तर वाचाल हा संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात भट्टड सरांनी अपयशावर मात करून यशाच्या दिशेने प्रयत्न करण्याची प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परी दाभाडे व श्रुती टाकळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दिशिका डेंगळे हिने केले. डेंगळे सरांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

## जुगार अड्ड्यावर पोलिसांच्या धाडी

**अमरावती :** दि. १ वलगाव पोलिसांनी वेगवेगळया ठिकाणी सुरू असलेल्या पाच जुगारांवर एकाच दिवशी कारवाई करीत एकूण २ हजार ३९५ रुपयांचे साहित्य जप्त केले, तर पाच जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली. खारतळेगाव येथील आठवडी बाजारात सुरू असलेल्या जुगारावर कारवाई करीत पोलिसांनी एकूण ६४० रुपयांचे साहित्य जप्त करीत ताब्यात घेतलेल्या किशोर लक्ष्मणराव पुनसे (४२) याच्यावर गुन्हा दाखल केला. दुसरी कारवाई चांदूर बाजार मार्गावरील एका जिमच्या मागे करण्यात आली. या वेळी पोलिसांनी विवेक विठ्ठलराव लांडे (३९) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून एकूण ६९० रुपयांचे साहित्य जप्त केले.

## जि.प. माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना सायकल आणि पुस्तकाचे वाटप

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**भातकुली, दि. २ :** जिल्हा परिषद माध्यमिक शाळा उत्तमसरा पं.स.भातकुली येथे पाच वर्षापासून शाळेमध्ये बाहेरगावावरून येणाऱ्या गरजू विद्यार्थीसाठी दरवर्षी सायकलीचे वाटप केले जाते. या स्तुत्य उपक्रमाचे सातत्य ठेवत यावर्षीही शाळेचे मुख्याध्यापक श्री. लोमेश खैरकर यांचे मोर्शीतील मित्रमंडळ यांचे माध्यमातून पाच सायकलीची मदत मिळाली ही मदत स्व. युगंधर तिखे, स्व. मेघराज यावले व स्व. संदीप महाजन यांच्या स्मृतीप्रित्यर्थ करण्यात आली. या उपक्रमासाठी मित्र चैतन्य बेले, डॉ. गौरव पाठक आशिष अढाऊ व Octago Advisory Solutions LLP चे संचालक अजय तलवारे आणि संजय ठाकरे शास्त्रज्ञ (गोवा) यांचे विशेष सहकार्य लाभले. सायकल



वाटपासोबत जि. प. समन्वय कोविड १९ समिती अंतर्गत प्राप्त पुस्तकांचे वाटप सरपंच श्री. धर्मेंद्रजी मेहरे, स्थानिक उद्योजक विकास दहीकर, नवनिर्वाचित शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास दहीकर, उपाध्यक्षा शितल मोहन मांगे यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाळांतर्गत गठित विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती, शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती आणि महिला तक्रार समितीचे सदस्य कार्यक्रमाला उपस्थित होते. लाभार्थी विद्यार्थ्यांमध्ये अतिशय उत्साहाचे आणि समाधानाचे वातावरण होते. कार्यक्रमाला उपस्थित सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांना मदत करणारे मोर्शी मित्र मंडळ आणि जि.प.समन्वय कोविड १९ समिती यांचे आभार मानले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर, ज्येष्ठ शिक्षक संतोष कुहेकर, चंद्रशेखर ब्राम्हणकर, संजय मगर्दे, उमेश बसरे, शितल भोपाळे, अश्विनी झाडे, ज्योत्स्ना हायगले, भूषण बुरंगे, रेणुका केचे, प्राजक्ता भडके उपस्थित होते.

# महसूलमंत्र्याच्या पालक जिल्ह्यात शासन आदेशाला दिला फाटा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २ :** राज्याचे महसूलमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री शासन नियमाच्या बाबतीत काटेकोर आहेत. मात्र त्यांच्याच पालक जिल्ह्यात व त्यांच्याच महसूल विभागात शासनादेशाला फाटा देण्याचा प्रकार घडला आहे. निलंबन व त्यानंतर विभागीय चौकशी सुरू अधिकाऱ्यांना त्याच जिल्ह्यात पदस्थापना देण्यात येत नाही, तसा २० एप्रिल २०१३ चा शासनादेश आहे. मात्र असा नियमबाह्य प्रकार येथे एका नायब तहसीलदारासाठी करण्यात आलेला आहे.

### वरुडच्या नायब तहसीलदार

प्रतिभा चौधरी यांच्या निलंबनाचे आदेश तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले होते. त्यांच्याबाबत वरुड तालुका वकील संघाने गंभीर स्वरूपाची तक्रार २७ सप्टेंबर २०२२ रोजी केली होती. शिवाय तत्कालीन आमदार देवेंद्र भुयार यांनीदेखील १२ जानेवारी २०२१ रोजी विभागीय आयुक्तांकडे चौधरी यांची गंभीर तक्रार केली केली होती. यासह अनेक तक्रारी विभागीय आयुक्तांकडे झाल्याने त्यांना १ ऑक्टोबर २०२२ रोजी निलंबित करण्यात आले होते. निलंबित करण्यात आल्यानंतर चौधरी यांना १४ दिवसांत पुन्हा विभागीय आयुक्तांच्या आदेशाने वाशिम जिल्ह्यात वाशिम तहसील कार्यालयात नायब तहसीलदार (महसूल) या पदावर १४ सप्टेंबर २०२२ रोजी पुन:स्थापना देण्यात आली होती व त्यांची विभागीय चौकशी सुरू असतानाच आता त्यांची बदली २६ जून २०२५ च्या आदेशाने अमरावती तहसील कार्यालयात करण्यात आली आहे. मात्र ही पदस्थापना नियमबाह्य असल्याचा आरोप होत आहे.

### पद एक, दोन नायब तहसीलदार

अमरावती तहसील कार्यालयाच्या नायब तहसीलदार टीना चव्हाण प्रशासकीय बदलीस पात्र नाहीत व विनंती बदलीसाठी त्यांनी अर्जही केला नसल्याची माहिती आहे., तरीही त्यांची बदली भातकुली तहसील कार्यालयात करण्यात आली. यावर त्यांनी 'मॅट'मधून स्टे आणला आहे. त्यांच्या जागी प्रतिभा चौधरी यांची बदली करण्यात आल्याने त्यादेखील रुजू झाल्या आहेत. त्यामुळे येथील तहसील कार्यालयात एका पदावर सध्या दोन नायब तहसीलदार हा विषय जनचर्चेचा ठरला आहे.

### तत्कालीन आमदारांची होती तक्रार

यापूर्वी चौधरी तिवसा तहसीलला असताना त्यांच्याबाबत अनेक तक्रारी तत्कालीन आमदार यशोमती ठाकूर यांच्याकडे झाल्याने ठाकूर यांनी विभागीय आयुक्तांकडे तक्रार करून त्यांच्या बदलीची मागणी केली होती. त्यामुळे चौधरी यांची बदली वरुड़ तहसीलमध्ये झाली होती.

### काय आहे २० एप्रिलचा आदेश?

२० एप्रिल २०१३ च्या परिपत्रकानुसार डीईसाठी निलंबित अधिकारी यांची पुन:स्थापना मूळ महसुली विभाग व ज्या पदावर निलंबित केले आहे तो महसुली विभाग वगळून अन्यत्र अकार्यकारी पदावर करावी. त्यामुळे चौधरी यांची सुरू असलेली 'डीई' चर्चेचा विषय ठरली आहे

## थोडक्यात



### मांडवी येथील विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप

**झरी जामणी :** तालुक्यातील मांडवी येथील राजीव माध्यमिक विद्यालयात गरजू विद्यार्थिनींना नुकतेच सायकल वाटप करण्यात आले. आर्थिक परिस्थितीमुळे मुलींचे शिक्षण थांबू नये, या उदात्त हेतूने शाळेच्या मुख्याध्यापकांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाला. या शाळेतील अनेक विद्यार्थिनी पिवरडोल, गवारा यांसारख्या दुर्गम गावांमधून शिक्षणासाठी दररोज चार ते पाच किलोमीटरची पायपीट करतात. त्यांच्या शिक्षणातील हा अडथळा दूर व्हावा आणि 'मुली शिकल्या पाहिजे' ही संकल्पना प्रत्यक्षात यावी, यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक दरवर्षी शासनाकडे पाठपुरावा करून सायकली मिळवून देतात. यावर्षीही इयत्ता आठवी ते दहावीच्या गरजू विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ मिळाला. नवीन सायकली मिळाल्याने विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. आता शाळेत वेळेवर पोहोचणे शक्य होईल आणि शिक्षणासाठीचा आमचा प्रवास अधिक सोपा होईल, अशी भावना विद्यार्थिनींनी व्यक्त केली. मुख्याध्यापकांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे आणि दूरदृष्टीचे पालक वर्गातून कौतुक होत आहे.



### पत्रकार सतीश बाळबुधे यांचा सन्मान

**यवतमाळ :** पत्रकार सतीश बाळबुधे यांचा त्यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याबद्दल यवतमाळ येथे सत्कार करण्यात आला. विविध सामाजिक आणि तेली समाज संघटनांनी संयुक्तपणे हा गौरव सोहळा आयोजित केला होता. आपल्या अभ्यासू वृत्तीने आणि बातमीच्या अचूक जाणीवेने पत्रकारितेत स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या सतीश बाळबुधे यांचा हा सत्कार श्री संताजी जगनाडे महाराज चॅरिटेबल ट्रस्ट आणि विदर्भ तेली समाज महासंघासह पाच संस्थांनी मिळून केला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार बाळासाहेब मांगुळकर, संतोष ढवळे, लिलाधर वाघमारे, सुनिता विलास काळे, अनिल जिभकाटे, विलास काळे आणि ज्ञानेश्वर रायमल उपस्थित होते. मान्यवरांच्याहस्ते बाळबुधे यांना शाल, श्रीफळ आणि संताजी महाराजांच्या मूर्तीचे स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. आपल्या सत्काराला उत्तर देताना, सतीश बाळबुधे यांनी सर्वांचे आभार मानले, तसेच ज्ञानेश्वर रायमल आणि विलास काळे यांच्या सहकार्याचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या या सत्कारामुळे पत्रकारिता क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.



### शिक्षक शंकर पत्तीवार सेवानिवृत्त

**झरी जामणी** : आपल्या २८ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेतून जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते शंकर पत्तीवार हे सेवानिवृत्त झाले. झरी जामणी तालुक्यातील पिवरडोल येथे झालेल्या निरोप समारंभात विद्यार्थी, शिक्षक आणि गावकऱ्यांचे अश्रू अनावर झाले होते. त्यांच्या कार्यामुळे ते सर्वांचे आवडते बनले होते. ३१ जुलै रोजी झालेल्या या निरोप समारंभात संपूर्ण गाव लोटले होते. गेल्या दोन वर्षांपासून पिवरडोल येथे कार्यरत असलेल्या पत्तीवार यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अनुयायी असलेल्या पत्तीवार यांनी 'गुरुदेव सेवा भजनी मंडळ' स्थापन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या निरोपावेळी अनेकांना आपले अश्रू आवरता आले नाहीत. या कार्यक्रमाला शिक्षक हनमंतु रजनलवार, पांडुरंग पडलवार, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मंगला मोहुरले, सरपंच मोहन गुणूरले, पोलिस पाटील उत्तम भोयर यांच्यासह अनेक शिक्षक, पालक आणि संपूर्ण गावकरी उपस्थित होते. एका आदर्श शिक्षकाला निरोप देताना सर्वांचे मन हेलावून गेले.

### म्हसोला येथे आरोग्य शिबिर

**म्हसोला (का.) :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त, म्हसोला (का.) येथे आरोग्य व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिवसेना जिल्हा प्रमुख प्रवीण शिंदे यांनी आयोजित केलेल्या या शिबिरात शेकडो नागरिकांनी मोफत तपासणीचा लाभ घेतला. दिनांक ३० जुलै रोजी येथील विठ्ठल रुक्मिणी देवस्थानच्या सभागृहात हे शिबिर पार पडले. यात डॉ. अनिकेत मापारी, तन्मय ठोबरे, अनिल चव्हाण आणि संजय यादव यांच्या वैद्यकीय पथकाने नागरिकांची मोफत आरोग्य आणि नेत्र तपासणी केली. तपासणीनंतर अनेक गरजूंना केवळ २०० रुपये सवलतीच्या दरात चष्म्यांचे वाटपही करण्यात आले. या सामाजिक उपक्रमामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेना पदाधिकारी शत्रुघन गंथडे, हर्षल लांडगे, रोशन गंथडे, अभय शेंदरे, यज्ञेश लांडगे, प्रज्वल गंथडे, कुणाल गंथडे, निखिल चारमोडे, ओम गंथडे आणि अविनाश गंथडे यांनी अथक परिश्रम घेतले. या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल नागरिकांनी प्रवीण शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले.

# पावसाळ्यातही पाण्यासाठी वणवण

## संतप्त महिलांचा नगर परिषदेला 'घागर मोर्चा'चा इशारा, पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि. २ :** शहरातील गुरुनगर वॉर्ड क्रमांक ४ मध्ये गेल्या दोन महिन्यांपासून पाणीपुरवठा अनियमित असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. याप्रश्नी युवासेना उपजिल्हाप्रमुख अजिंक्य शेंडे यांच्या नेतृत्वात, महिलांनी उपमुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले. सात दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास नगर परिषदेवर 'घागर मोर्चा' काढण्याचा इशारा देण्यात आला आहे.



पावसाळा सुरू असूनही, वणी शहरातील गुरुनगरमधील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून येथील पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला असून, विशेषतः महिलांचे मोठे हाल होत आहेत. त्यांना पाण्यासाठी रात्री-अपरात्री उठावे लागत आहे. या गंभीर समस्येवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी, युवासेना उपजिल्हाप्रमुख अजिंक्य शेंडे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांच्या नेतृत्वात, गुरुवारी (दि. १) परिसरातील महिलांनी नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी जयंत सोनटक्के यांना निवेदन सादर केले. पाणी हा नागरिकांचा मुलभूत हक्क असून, प्रशासनाने याबाबत गांभीर्य दाखवावे, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. निवेदन देताना, चिंत्ता पिदुरकर, शितल कुबडे, जया एकरे, रोहिणी धोटे, शालू धोटे, कमलाबाई मोहोळे, शोभा देठे, शाहिस्ता शेख, माधुरी गोहणे, संगीता ताजणे आणि राधा महांगळे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. प्रशासनाने यावर तात्काळ तोडगा न काढल्यास, आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

### सहनशीलतेचा अंत पाहू नका'

'नगर परिषद नागरिकांकडून वेळेवर पाणीपट्टी वसूल करते. उशीर झाल्यास व्याजही आकारते, पण पाणी मात्र वेळेवर देत नाही. हा दुटप्पी आणि अन्यायकारक प्रकार आहे. वॉर्डातील महिलांना रात्री-अपरात्री पाण्यासाठी वणवण करावी लागते, ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे. प्रशासनाने नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. सात दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास, महिलांसह नगर परिषदेवर 'घागर मोर्चा' काढला जाईल,' असा इशारा युवासेना उपजिल्हाप्रमुख अजिंक्य शेंडे यांनी दिला आहे.

### पावसाळ्यात पाण्याची 'कोरड'

पावसाळा सुरू असूनही, गुरुनगरमधील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने, महिलांना पाण्यासाठी रात्री-अपरात्री उठावे लागत आहे. 'धरण उशाला आणि कोरड घशाला' अशी आमची अवस्था झाली आहे. पाणी हा आमचा मुलभूत हक्क असून, प्रशासनाने तो गांभीर्याने द्यावा, अशी संतप्त प्रतिक्रिया उपस्थित महिलांनी दिली. निवेदन देताना महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# आर्णी बसस्थानकाचे 'स्वच्छ-सुंदर' अभियानांतर्गत सर्वेक्षण

## स्वच्छता, वृक्षारोपण ते अवैध वाहतुकीपर्यंत विविध बाबींची तपासणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. २ :** 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक' अभियानांतर्गत, आर्णी बस स्थानकाचे शुक्रवारी (दि. १) सर्वेक्षण करण्यात आले. अकोल्याहून आलेल्या विशेष पथकाने तब्बल दोन तास बस स्थानकातील सोयी-सुविधा आणि समस्यांची पाहणी करून, विविध निकषांवर गोपनीय तक्तयात गुण दिले.



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून राज्यभरात राबवण्यात येत असलेल्या या अभियानाचा भाग म्हणून ही पाहणी झाली. या पाहणी पथकात अकोल्याचे विभागीय नियंत्रक राठोड, उपयंत्र अभियंता बोबडे आणि स्थानिक पत्रकार वीरेंद्र पाईकराव यांचा समावेश होता. यावेळी पथकाने बस स्थानक आणि परिसराची स्वच्छता, रंगरंगोटी, वृक्ष लागवड, पिण्याच्या पाण्याची सोय आणि प्रवाशांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन यांसारख्या बाबी तपासल्या. यासोबतच, बस स्थानकातून होणारी अवैध प्रवासी वाहतूक आणि त्यावर केलेल्या कारवाईचाही आढावा घेण्यात आला. बस स्थानकातून नियमित किती बस धावतात आणि प्रवाशांच्या तक्रारी आहेत का, याचीही माहिती घेण्यात आली. या सर्वेक्षणाच्या वेळी दारव्हा आगार व्यवस्थापक नितीन उजवने, वाहतूक निरीक्षक सोनाली पवार, बसस्थानक प्रमुख आर. एल. तळवटकर, देवेंद्र धारवाड, आलासिंग राठोड, स्वच्छक भगत, अजीस शेख आणि बस स्थानकातील परवानाधारक व्यावसायिक उपस्थित होते. यावेळी आगार प्रमुखांसोबत बस स्थानकातील विविध समस्यांवर चर्चाही करण्यात आली.

# 'ट्रॉमा केअर युनिट' दहा वर्षांपासून धूळखात

## आमदार तोडसाम यांनी वेधले सभागृहाचे लक्ष

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि.२:** पांढरकवडा येथील उपजिल्हा रुग्णालयातील 'ट्रॉमा केअर युनिट' केवळ एका तंत्रज्ञाअभावी गेल्या दहा वर्षांपासून बंद असल्याची धक्कादायक बाब आमदार प्रा. राजू तोडसाम यांनी विधानसभेत उघड केली. त्यांनी याप्रकरणी शासनाचे लक्ष वेधून तातडीने तंत्रज्ञ नेमण्याची मागणी केली आहे.

पावसाळी अधिवेशनात बोलताना आमदार तोडसाम म्हणाले की, राष्ट्रीय महामार्गावर वसलेल्या पांढरकवडा येथे दररोज अपघात होतात, मात्र सुसज्ज इमारत आणि यंत्रसामुग्री असूनही ट्रॉमा केअर युनिट धूळखात पडून आहे. त्यामुळे गंभीर जखमींना उपचारासाठी नागपूरला न्यावे लागते, ज्यात अनेकदा रुग्णांचा जीव जातो. काही दिवसांपूर्वीच रुग्णालयातील महाडायलिसिस सेंटरच्या उद्घाटनावेळी त्यांनी ही खंत व्यक्त केली होती आणि रुग्णालयाच्या अधीक्षक वैशाली सातुरवार यांच्याकडून माहिती घेतली होती. त्याच आधारावर त्यांनी सभागृहात हा गंभीर मुद्दा मांडला. कोट्यवधी रुपयांची ही आरोग्य सुविधा केवळ एका तंत्रज्ञाअभावी निरुपयोगी ठरली असून, शासनाने तातडीने या युनिटसाठी तंत्रज्ञ उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी तोडसाम यांनी केली आहे.

# जिल्ह्यातील लहान संस्थांमधील नोकरभरती पुन्हा अडचणीत

## 'बिंदू नामावली'ला नव्या जीआरचा खोडा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२:** राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने नुकत्याच काढलेल्या बिंदू नामावली तपासणीच्या शासन निर्णयामुळे यवतमाळ जिल्ह्यातील लहान संस्थांमधील नोकरभरती पुन्हा एकदा अडचणीत आली आहे. हा निर्णय केवळ मोठ्या पदसंवर्गासाठी लागू असल्याने लहान संस्थांची प्रक्रिया थांबली आहे.

हा नवीन शासन निर्णय फक्त ३२ पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या संस्थांनाच लागू होतो. त्यामुळे जिल्ह्यातील बहुसंख्य शाळा आणि इतर लहान संस्थांमधील बिंदू नामावलीची तपासणी थांबली आहे. मागास वर्ग तपासणी कक्षाने स्पष्ट केले आहे की, या लहान संस्थांसाठी आता स्वतंत्र शासन निर्णय काढावा लागेल. यापूर्वी आदिवासीबहुल जिल्ह्यांसाठी असाच निर्णय येण्यास १८ महिने लागले होते, त्यामुळे आता या नवीन निर्णयाला किती काळ लागेल, याबाबत मोठी अनिश्चितता आहे. या दिरंगाईमुळे जिल्ह्यातील हजारो पदे रिक्त राहण्याचा आणि त्याचा थेट परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या अनपेक्षित अडथळ्यांमुळे डी.एड, बी.एड. धारकांसह नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

# लोकशाही दिन येत्या सोमवारी

**यवतमाळ, दि. २ :** येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे सोमवारी, (दि. ४) सकाळी १० वाजता जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी होणाऱ्या तालुकास्तरीय लोकशाही दिनात ज्या अर्जांचे निराकरण होत नाही, केवळ तेच अर्ज जिल्हास्तरावर स्वीकारले जातील. जिल्हास्तरावर अर्ज दाखल करताना, तालुकास्तरावर अर्ज दाखल केल्याची मूळ पोच पावती जोडणे बंधनकारक आहे, अन्यथा अर्ज स्वीकारला जाणार नाही. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व अपील, सेवाविषयक बाबी, वैयक्तिक स्वरूपाच्या तक्रारी तसेच अपूर्ण कागदपत्रांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे देखील निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# वणी शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांची दुरावस्था

## शिवसेनेच्या (उबाठा) साकेत भुजबळरावांचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि.२:** शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांच्या दयनीय अवस्थेबाबत शिवसेनेच्या (उबाठा) साकेत भुजबळराव यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देत, सात दिवसांत पुतळ्यांची देखभाल-दुरुस्ती न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.



शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्यासह अनेक महापुरुषांच्या पुतळ्यांची २०१३ पासून देखभाल झालेली नाही. त्यामुळे पुतळ्यांभोवती अस्वच्छता आणि अतिक्रमण वाढले आहे, असे भुजबळराव यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यांनी पुतळ्यांच्या परिसरातील अनधिकृत बॅनर्स हटवून चबुतऱ्यांची दुरुस्ती करावी आणि नियमित स्वच्छतेसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, अशी मागणी केली आहे. या मागण्या सात दिवसांत पूर्ण न झाल्यास शिवसेना-युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) लोकशाही मार्गाने आंदोलन करेल, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदन देताना त्यांच्यासोबत अजय चन्ने, विलास भट, सुजल तिवारी, सुनील खडतकर, सागर सोनेकर, अनिकेत टिकले, अंकुश रावत, अरिहंत, आकाश खंडाळकर आदींसह शिवसेनेचे आणि युवासेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महागाव तालुक्यातील २१९ पांदणरस्ते अतिक्रमणाच्या विळख्यात

## 'समृद्धी' महामार्गाइतकेच पांदणरस्तेही महत्वाचे, अतिक्रमणमुक्त करण्यासाठी शेतकऱ्यांचा एल्गार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**महागाव, दि. २ :** एकीकडे समृद्धी आणि शक्तिपीठ महामार्गासारखे मोठे प्रकल्प साकारत असताना, दुसरीकडे शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी हक्काचे पांदणरस्तेही उपलब्ध नाहीत. महागाव तालुक्यातील २१९ अतिक्रमित पांदणरस्ते तात्काळ मोकळे करून पक्के करावेत, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गावंडे यांच्या नेतृत्वात तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.



राज्यात समृद्धी, कोस्टल रोड आणि शक्तिपीठ महामार्गासारख्या मोठ्या प्रकल्पांची कामे सुरू आहेत. मात्र, शेतकऱ्यांसाठी जीवनवाहिनी ठरणारे पांदणरस्ते आणि शेतरस्ते अतिक्रमणाच्या विळख्यात अडकले आहेत. महागाव तालुक्यात ही समस्या अत्यंत गंभीर बनली आहे. पावसाळ्यात चिखलातून वाट काढताना शेतकऱ्यांना अक्षरशः कसरत करावी लागते. बी-बियाणे, खते आणि शेतमाल ने-आण करणेही कठीण झाले आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी, उटी येथील शेतकरी तथा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गावंडे, शेतकरी नेते डी.बी. नाईक, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव देशमुख यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. यावेळी बोथा गावच्या सरपंच यशोदा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते अशोक तुमवार, संतोष मोरे, सुरेश खिल्लारे, राजू मोरे, सचिन मस्के, प्रल्हाद कवडे, विजय गायकवाड, गजानन लांडे, संतोष चिंचोलकर, हनुमान मदने, बालाजी बोखारे, शब्बीर खा पठाण, दिनेश डोंगरे, प्रकाश व्यवहारे आणि अमोल पाईकराव यांच्यासह उटी, बोथा, भांब, शिरपूर, कासारबेळ आणि सवना येथील शेतकरी उपस्थित होते.

### समृद्धी महामार्ग महत्वाचा

सरकार रस्ते विकासासाठी विविध कामांचे भूमिपूजन करत आहे. समृद्धी महामार्गानंतर आता महागाव तालुक्यातून शक्तिपीठ महामार्गही जाणार आहे. हे दोन्ही महामार्ग देशाच्या विकासासाठी महत्वाचे आहेत, तितकेच पांदणरस्ते शेतकऱ्यांच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासासाठी महत्वाचे आहेत. त्यामुळे सरकारने या रस्त्यांकडेही गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी निवेदनातून केली आहे.

### २१९ पांदणरस्ते अतिक्रमित

महागाव तालुक्यात एकूण २७५ पांदणरस्ते आहेत. त्यापैकी, केवळ ५६ रस्ते मोकळे करण्यात प्रशासनाला यश आले आहे. उर्वरित २१९ पांदणरस्ते अद्यापही अतिक्रमणाच्या विळख्यात आहेत. हे सर्व रस्ते तात्काळ मोकळे करून, त्यावर पक्की उपाययोजना करावी, जेणेकरून शेतकऱ्यांचा कायमस्वरूपीचा प्रश्न निकाली निघेल, अशी प्रमुख मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# काँग्रेसमधील बंड प्रदेशदरबारी

## समन्वयक म्हणून सुनील केदार यांची नियुक्ती; दुसऱ्या फळीच्या एल्गारानंतर तातडीची दखल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२: यवतमाळ जिल्हा काँग्रेसमधील बंडाळीची प्रदेश काँग्रेसने गंभीर दखल घेतली आहे. दुसऱ्या फळीतील नेत्यांनी ज्येष्ठांविरोधात पुकारलेल्या एल्गारानंतर, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी समन्वयक म्हणून माजी मंत्री सुनील केदार यांची नियुक्ती केली आहे. केदारांच्या दौऱ्यानंतर पक्षांतर्गत वाद शमणार की वाढणार, याकडे जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.**



यवतमाळ जिल्हा काँग्रेसमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून ज्येष्ठ नेत्यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी होती, मात्र ती कधीही उघडपणे समोर आली नव्हती. आठ दिवसांपूर्वी, जिल्ह्यातील दुसऱ्या फळीतील सुमारे अडीचशे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत, पहिल्यांदाच ज्येष्ठ नेत्यांच्या 'पुत्रप्रेमा'च्या आणि 'स्वार्थी' राजकारणाविरोधात एल्गार पुकारला. पक्ष रसातळाला गेला असून, वारंवार पराभव होऊनही ज्येष्ठ नेते तरुणांना संधी देत नाहीत, असा घणाघाती आरोप या कार्यकर्त्यांनी केला होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असताना, जिल्हा काँग्रेस कमिटीतील अनेक पदे प्रभारी असून, सक्षम नेतृत्व नाही, त्यामुळे कुणाच्या नेतृत्वात निवडणुका लढवायच्या, असा थेट प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. या अभूतपूर्व बंडाळीची आणि गंभीर आरोपांची प्रदेश काँग्रेसने तातडीने दखल घेतली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी, माजी मंत्री सुनील केदार यांची यवतमाळ जिल्ह्यासाठी समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. केदार लवकरच जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून, ते दोन्ही फळीतील नेते, पदाधिकारी, तालुकाध्यक्ष आणि प्रमुख कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्यांच्या भावना समजून घेणार आहेत. या दौऱ्यानंतर ते आपला अहवाल प्रदेशाध्यक्षांना सादर करतील, त्यानंतरच यवतमाळ जिल्हा काँग्रेसच्या भवितव्याची पुढील दिशा ठरणार आहे.

### बंडाची ठिणगी पडली कशी?

**ज्येष्ठ नेत्यांच्या 'पुत्रप्रेमा'मुळे आणि स्वार्थीपणामुळे पक्षाची वाताहत झाल्याचा आरोप दुसऱ्या फळीतील नेत्यांनी केला आहे. वारंवार पराभव होऊनही, ज्येष्ठ नेते तरुणांना संधी देत नाहीत आणि पदे स्वतःच्या कुटुंबातच ठेवतात. पक्ष जनतेच्या प्रश्नांवर लढत नसून, केवळ पदे भोगण्यासाठी राजकारण सुरू आहे, असा संतप्त सूर कार्यकर्त्यांनी चिंतन बैठकीत व्यक्त केला होता.**

### सुनील केदारांपुढील मोठे आव्हान

**माजी मंत्री सुनील केदार यांच्या नियुक्तीने प्रदेश काँग्रेसने 'डॅमेज कंट्रोल'चा प्रयत्न केला आहे. मात्र, दोन्ही गटांमधील दरी मोठी आहे. ज्येष्ठ नेते आपले वर्चस्व सोडण्यास तयार नाहीत, तर दुसरी फळी नेतृत्व बदलावर ठाम आहे. या दोन्ही गटांमध्ये समन्वय साधून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी पक्षात एकी घडवून आणण्याचे मोठे आव्हान केदार यांच्यासमोर असेल.**

# पालकमंत्री राठोड यांच्याहस्ते शीतल गावंडे यांचा सन्मान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. २ :** महसूल दिनानिमित्त, महसूल आणि पोलिस प्रशासनात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल दिग्रस तालुक्यातील धानोरा बुद्रुक येथील महिला पोलिस पाटील शितल गावंडे यांचा पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात त्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

महसूल विभागामार्फत १ ते ७ ऑगस्ट दरम्यान 'महसूल सप्ताह' साजरा केला जात आहे. याचाच एक भाग म्हणून, महसूल दिनी प्रशासनात उल्लेखनीय काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याची परंपरा आहे. गाव पातळीवर प्रशासनाचा महत्वाचा दुवा म्हणून काम करणाऱ्या पोलिस पाटलांच्या कार्याची दखल घेत, शितल गावंडे यांनी



२०२४-२५ या वर्षात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हास्तरावर त्यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली. पालकमंत्री संजय राठोड यांनी त्यांचे कौतुक करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी अनिल खंडाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे, तहसीलदार राहुल मोरे आणि अधीक्षक आदित्य शेंडे यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात

### प्लास्टिकच्या पाइपने हल्ला

**नेर :** 'तू तुझ्या आईला का मारले,' अशी विचारणा करत तीन नातेवाईकांनी संगनमत करून एका व्यक्तीला प्लास्टिकच्या पाईपने मारहाण करून जखमी केल्याची घटना ३१ जुलै रोजी येथे घडली. याप्रकरणी नेर पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मोहन लिमचंद शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी पवन लिमचंद शिंदे, खंडु रामा हटकर आणि तेजपाल भगवान हटकर यांनी त्यांच्या घरी येऊन वाद घातला. 'तू तुझी आई लिलाबाई लिमचंद शिंदे हिला का मारले,' या कारणावरून त्यांनी मोहन यांना शिवीगाळ केली. तसेच, जीवे मारण्याची धमकी देत, प्लास्टिकच्या पाईपने मारहाण करून त्यांना जखमी केले. या कौटुंबिक वादाचे पर्यवसान गंभीर मारहाणीत झाल्याने परिसरात चर्चा सुरू आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### रेती तस्करीचे ट्रॅक्टर पकडले

**लाडखेड :** येथे विनापरवाना गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टरवर पोलिसांनी कारवाई करून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तालुक्यात गौण खनिज माफिया पुन्हा सक्रिय झाल्याची चर्चा या कारवाईमुळे सुरू झाली आहे. अविपाल विश्वनाथ वानखडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी कलीमखान उर्फ छोटू आणि प्रदीप सहादेव मेश्राम हे एम.एच. २९ बी.व्ही. ११८८७ क्रमांकाच्या ट्रॅक्टरमधून कोणताही परवाना नसताना गौण खनिजाची चोरटी वाहतूक करत होते. त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, पोलिसांनी ट्रॅक्टरसह मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील कारवाई सुरू केली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

### दुचाकी लंपास

**राळेगाव :** येथील इंदिरा नगर परिसरातून अज्ञात चोरट्याने एक दुचाकी लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी राळेगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तुफेल जमील शेख यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी आपली एम.एच. ४९ ए.क्यु. २४६५ क्रमांकाची दुचाकी इंदिरा नगर परिसरात उभी केली होती. काही वेळाने ते परत आले असता, त्यांना दुचाकी जागेवर दिसली नाही. त्यांनी परिसरात शोधाशोध केली, परंतु ती मिळून आली नाही. अखेर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. शहरात वाहनचोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी अशोक बेले यांची फेरनिवड



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २ :** पांढरकवडा प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार अशोक बेले यांची पुन्हा एकदा एकमताने निवड करण्यात आली आहे. तर, सचिवपदाची जबाबदारी संदीप बाजोरीया यांच्यावर सोपवण्यात आली. येथील विश्रामगृहात झालेल्या विशेष सभेत ही निवड पार पडली.

ज्येष्ठ पत्रकार दामोदर बाजोरीया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या विशेष सभेला तालुक्यातील अनेक पत्रकार उपस्थित होते. यावेळी, विद्यमान अध्यक्ष अशोक बेले यांच्या कार्यावर विश्वास दाखवत त्यांची अध्यक्षपदी एकमताने फेरनिवड करण्यात आली, तर सचिवपदी संदीप बाजोरीया यांची निवड झाली. नूतन अध्यक्ष आणि सचिवांनी सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने पत्रकारांच्या हितासाठी काम करण्याचा विश्वास व्यक्त केला. या सभेला नरेश मानकर, अरुण डोंगशनवार, प्राध्यापक मंगेश होटे, संतोष सेंगर, सौरभ बेले आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. या निवडीबद्दल नूतन पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रेती वाहतूकीचा ट्रॅक्टर जप्त

**लाडखेड, दि. २ :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त परिसरात पेट्रोलिंग करत असताना, पोलिसांनी विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला. ही कारवाई १ ऑगस्ट रोजी करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक रामकिसन जायभाये यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते जयंतीच्या अनुषंगाने परिसरात गस्त घालत होते. यावेळी आरोपी भावेश पुरूषोत्तम इंगोले हा ट्रॅक्टरमधून विनापरवाना रेती चोरून नेत असल्याचे त्यांना आढळून आले. पोलिसांनी त्याला रंगेहाथ पकडून ट्रॅक्टर आणि रेती असा संपूर्ण मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी लाडखेड पोलिसांनी भावेश इंगोले याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे कष्टकऱ्यांचे प्रेरणास्थान

## मंत्री डॉ. अशोक उईके: अण्णाभाऊ साठे जयंती, अडीच कोटींच्या विकास निधीची घोषणा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२:** 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी वंचित, कष्टकरी समाजाला साहित्याच्या माध्यमातून आत्मभान दिले, त्यांचे हे योगदान कधीही विसरता येणार नाही,' असे प्रतिपादन आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी केले. राळेगाव येथे अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी प्रभागात सभागृहासह अडीच कोटी रुपयांच्या नवीन विकासनिधीची घोषणा केली.

राळेगाव येथील प्रभाग क्रमांक ५मध्ये हा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सायंकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली,



तर शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रफुल्ल चव्हाण यांनी अण्णाभाऊंच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमात, प्रभागाला निधी दिल्याबद्दल मंत्री उईके यांचा आणि जिल्हाध्यक्षपदी नियुक्तीबद्दल डॉ. चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. नगरसेवक शशिकांत धुमाळ यांनी, 'मंत्री उईके यांनी प्रभागाला आजवरचा सर्वाधिक निधी दिला आहे,' असे म्हणत त्यांचे आभार मानले. या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार अमित भोईटे, गटविकास अधिकारी केशव पवार, माजी सभापती प्रशांत तायडे, शहराध्यक्ष डॉ. कुणाल भोयर, नगरसेवक मंगेश राऊत, माजी नगराध्यक्ष बबन भोंगारे, महेश सोनेकर, संतोष कोकुलवार, संदीप पेंदोर, कुंदन कांबळे, गोपाल मशरूम, ठाणेदार शीतल मालटे आणि मुख्याधिकारी गिरीश पारेकर उपस्थित होते. जयंती उत्सव समितीचे आशीष आमटे, कार्तिक खडसे, राजन शेंडे यांच्यासह अनेकांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. प्रास्ताविक शशिकांत धुमाळ यांनी केले, तर संचालन मनीष काळे यांनी केले.

# माजी शिक्षणमंत्री प्रा. पुरके यांची काँग्रेसच्या प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी निवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. २ :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी शिक्षणमंत्री प्राध्यापक वसंतराव पुरके यांची पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या कार्याची आणि पक्षनिष्ठेची दखल घेऊन पक्षाने ही जबाबदारी दिल्याने, राळेगाव विधानसभा मतदारसंघात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने नुकतीच आपली प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली असून, त्यात राळेगाव विधानसभा मतदारसंघाचे जेष्ठ नेते प्राध्यापक वसंतराव पुरके यांचा समावेश करण्यात आला आहे. पुरके हे राज्याचे माजी शिक्षणमंत्री



असून, राळेगाव मतदारसंघावर त्यांची आजही मजबूत पकड आहे. मागील निवडणुकीत अल्पशा मतांनी पराभूत झाल्यानंतरही खचून न जाता, ते तात्काळ पक्षवाढीच्या कामाला लागले होते. त्यांच्या याच अविरत कार्याची आणि प्रामाणिकपणाची पावती म्हणून पक्षाने त्यांना प्रदेश कार्यकारिणीत स्थान दिले आहे, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे. या निवडीचे वृत्त कळताच, राळेगाव मतदारसंघातील काँग्रेसचे नेते, कार्यकर्ते आणि मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून या निवडीमुळे पक्षाला बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. प्राध्यापक पुरके यांच्या अनुभवाचा आणि जनसंपर्काचा फायदा पक्षाला राज्यपातळीवर होणार आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पक्ष वाढीसाठी आणखी बळ मिळेल, असे मत कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. या निवडीने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून, आगामी काळात पक्षवाढीसाठी नव्या जोमाने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# पोस्कोतील आरोपीस अटकपूर्व जामीन

**यवतमाळ, दि. २ :** अंजी नाईक येथील जिल्हा परिषद शाळेतील एका शिक्षकावर मुख्याध्यापिकेने केलेल्या तक्रारीवरून दाखल झालेल्या बुचर्चित पॉक्सो प्रकरणाला आता एक नवे वळण मिळाले आहे. याप्रकरणी आरोपी शिक्षक वसंत पत्रे यांना जिल्हा व सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. ९ जुलै रोजी घाटंजी पोलिस ठाण्यात पत्रे यांच्याविरुद्ध पॉक्सो व बीएनएस कायद्याच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल झाला होता. बचाव पक्षाचे वकील ॲड. ए.व्ही. चिरडे आणि ॲड. राहुल ढोरे यांनी न्यायालयात जोरदार युक्तिवाद केला की, पत्रे यांनी वर्षभरापूर्वी मुख्याध्यापिकेविरुद्ध शालेय पोषण आहार घोटाळ्याची तक्रार केली होती. याच आकसातून एका कर्तव्यदक्ष शिक्षकाला यात गोवण्यात आल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. हा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने वसंत पत्रे यांना अटी व शर्तीवर अटकपूर्व जामीन अखेर मंजूर केला.

# वणी-मुकुटबन मार्गावर ट्रक उलटला

## वाहतूक ठप्प, कायर गावाजवळील सैदाबाद फाट्याजवळील घटना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि. २ :** वणी-मुकुटबन मार्गावर शनिवारी, (दि. २) सकाळी सिमेंट वाहून नेणारा ट्रक पलटी झाल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली. हा ट्रक रस्त्याच्या मधोमध आडवा झाल्याने सुमारे सात तास वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

वणी तालुक्यातील कायर गावाजवळील सैदाबाद फाट्याजवळ सकाळी ८.३० वाजताच्या दरम्यान हा अपघात घडला. वणीच्या दिशेने जात असलेला ट्रक (क्र. एमएच ३४ एएच ०१९५) चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या मधोमध पलटी झाला. सकाळची वेळ असल्याने शाळेत जाणारे विद्यार्थी, शिक्षक आणि मुकुटबन येथील कंपन्यांमध्ये



कामावर जाणारे कर्मचारी या वाहतूक कोंडीत अडकून पडले. तासनतास एकाच जागी अडकून राहावे लागल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. या अपघातामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अखेर, सुमारे सात तासांच्या अथक प्रयत्नांनंतर हा ट्रक रस्त्यावरून हटविण्यात यश आले आणि वाहतूक हळूहळू पूर्ववत झाली. या घटनेमुळे सकाळच्या वेळी कामावर निघालेल्या सर्वांचेच मोठे हाल झाले.

# 'पीएम-किसान'योजना शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारी

## पालकमंत्री संजय राठोड; जिल्ह्यातील पावणेतीन लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ५९ कोटी रुपये जमा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२:** पंतप्रधान किसान सन्मान योजना ही देशातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी क्रांतिकारी योजना आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते, योजनेच्या २० व्या हप्त्यांचे वितरण शनिवारी झाले. याअंतर्गत, यवतमाळ जिल्ह्यातील पावणेतीन लाख शेतकऱ्यांना ५९कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे.

पंतप्रधान किसान सन्मान योजनेच्या २० व्या हप्त्याच्या वितरणानिमित्त, येथील कृषी विज्ञान केंद्रात आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री संजय राठोड बोलत होते.



यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. कचरे आणि शास्त्रज्ञ डॉ. कदम उपस्थित होते. पालकमंत्री म्हणाले की, शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून केंद्र सरकारने ही योजना सुरू केली. आता राज्य सरकारही 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेतून शेतकऱ्यांना साहाय्य करत आहे. शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा आणि मृद व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून आम्ही सिंचनासाठी शाश्वत व्यवस्थापन करत आहोत, असेही त्यांनी सांगितले. यावेळी रमेश डहाणे आणि रामदास पवार या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन राहुल चव्हाण यांनी, तर आभार डॉ. प्रमोद मगर यांनी मानले.




### जिल्ह्यातील पावणेतीन लाख शेतकरी लाभार्थी

**पंतप्रधान किसान सन्मान योजनेसाठी यवतमाळ जिल्ह्यातील दोन लाख ९३ हजार ९७७ शेतकरी पात्र आहेत. शनिवारी वितरित झालेल्या २० व्या हप्त्यामुळे, या सर्व शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट ५९ कोटी रुपयांची रक्कम जमा होणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळत असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. कार्यक्रमात रमेश डहाणे आणि रामदास पवार या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला.**

### वर्षाला मिळणार १२ हजार

**पीएम-किसान योजनेच्या धर्तीवर, राज्य शासनानेही 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजना सुरू केली आहे. या योजनेतूनही शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये दिले जातात. त्यामुळे, केंद्राचे सहा हजार आणि राज्याचे सहा हजार रुपये मिळून, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आता वर्षाला एकूण १२हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य उपलब्ध हो आहे, असे पालकमंत्री संजय राठोड यांनी सांगितले.**

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रशासन सज्ज

## पांढरकवड्यात पर्यवेक्षक, बीएलओंना प्रशिक्षण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि.२:** सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्याने, पांढरकवडा निवडणूक विभाग 'अॅलर्ट मोड'वर आला आहे. मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी आज, शुक्रवारी येथे पर्यवेक्षक आणि बूथ लेव्हल अधिकाऱ्यांसाठी (बीएलओ) विशेष प्रशिक्षण घेण्यात आले.

गेल्या दोन-तीन वर्षांपासून ओबीसी आरक्षणामुळे रखडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या बचत भवनात हे प्रशिक्षण पार पडले. दिल्ली येथून प्रशिक्षण घेऊन आलेले मास्टर ट्रेनर, सहायक शिक्षक लिखार यांनी पीपीटीद्वारे मार्गदर्शन केले. त्यांनी बीएलओंची कर्तव्ये, जबाबदाऱ्या, मतदार यादी अद्ययावत करणे, नवीन नावे नोंदवणे, नावे वगळणे आणि दुरुस्ती करणे याबाबत प्रत्यक्ष अर्ज भरून घेत माहिती दिली. तहसीलदार राजेंद्र इंगळे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाला नायब तहसीलदार चांदेकर यांच्यासह निवडणूक विभागाचे कर्मचारी, पर्यवेक्षक आणि बीएलओ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रशिक्षणामुळे मतदार यादी अचूक करण्याच्या कामाला गती मिळणार आहे.